म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ......
BVBK-0401098

प्रा॰ वा॰ पु॰
१०९८

बा-वा-
१०९८

# पंचतंत्राची म...

BVBK-0401098

## ...ककथांचा लोकप्रिय संग्रह

पंचतंत्र हा प्राचीन भारतीय लोककथांचा सर्वाधिक लोकप्रिय संग्रह आहे. यात संग्रहित केलेल्या लोककथा सत्तराहून अधिक आहेत. या कथा पाच तंत्रांत म्हणजे पाच भागांत विभागलेल्या आहेत. प्रत्येक भागातील संकलनाला एकेक विशिष्ट हेतूचे सूत्र आहे आणि ते सूत्र अबाधित अखंड राखण्यासाठी प्रत्येक भागाच्या प्रारंभी एकेक प्रास्ताविक कथा आहे या प्रास्ताविक कथेतील एक पात्र वक्ता आणि एक पात्र श्रोता बनवून, पुढे वक्त्याने आपल्या एकेका विधानाच्या स्पष्टीकरणा-स्तव एकेक दृष्टान्त सादर करण्यासाठी कथांमागून कथा गुंफल्या आहेत. प्राचीन भारतीय कथांच्या संकलनात सर्वत्र हीच क्लृप्ती प्राधान्याने वापरलेली दिसते. 'शुकबहात्तरी' मध्ये विदेश-...पनाला गेलेल्या मालकाच्या पत्नीला व्यभिचारापासून निवृत्त ...ण्याच्या हेतूने शुकमुखातून कथाकथन केले आहे; सिंहासन-...तशीमध्ये विक्रमाच्या सिंहासनावर आरूढ होऊ पाहणाऱ्या ...जराजाला बत्तीस पुतळ्यांच्या मुखातून विक्रमाच्या गुणांच्या ...था ऐकवल्या आहेत; 'वेताळपंचविशी'त विक्रमाच्या 'त्रिविक्रमसेना' च्या ? ) धैर्यशौर्याची व बुद्धिप्रकर्षाची ...क्षा घेण्याच्या हेतूने वेताळमुखातून कूटकथा प्रकटल्या आहेत. ...चतंत्रा' मध्ये तीन शास्त्रविमुख व विवेकरहित राजपुत्रांना ...णे करण्याच्या हेतूने प्रत्येक तंत्राच्या आरंभी वेगळा वक्ता ...जून नीतिकथांची गुंफण केली आहे.

लोकांत प्रचलित असलेल्या अथवा पूर्वी वेगवेगळ्या ग्रंथांत निमित्तानिमित्ताने कोठे कोठे समाविष्ट झालेल्या कथांना असे एखादे सूत्र प्राप्त करून देऊन, त्यांचा विशिष्ट हेतूच्या पूर्तीसाठी संग्रह करण्याची ही पद्धती भारतीय कथासंकलकांनी अत्यंत समर्थपणाने हाताळली आहे. बौद्धांच्या जातककथा, जैनांच्या 'चूर्णी', गुणाढ्याची 'बृहत्कथा' आणि त्या ग्रंथाची बृहत्कथा-श्लोकसंग्रह, बृहत्कथामंजरी व कथासरित्सागर ही संस्करणे, तसेच पूर्वनिर्दिष्ट 'सिंहासनबत्तिशी', 'शुकबहात्तरी' व 'वेताळपंचविशी' हे सारे कथासंग्रह याच पद्धतीने सूत्रबद्ध केले गेले आहेत. लोककथांचे पुरातन भांडार विस्कळीतपणे नष्ट होऊ न देता, ते चिरंतन स्वरूपात राखण्याची असामान्य कामगिरी या कथासंकलकांनी पार पाडली आहे.

**ग्रंथाचे नाम-रहस्य**

'पंचतंत्र' म्हणजे 'तंत्र' नामक पाच कथासमूहांचा संग्रह. पंचतंत्रात मित्रभेद, मित्रसंप्राप्ती, काकोलूकीय, लब्धप्रणाश आणि अपरीक्षितकारक अशी पाच तंत्रे आहेत. या कथासमूहांना अथवा भागांना 'तंत्र' अशी संज्ञा का वापरली, असा प्रश्न आहे. 'तन्त्रैः पंचभिरेतच्चकार सुमनोहरं शास्त्रम्'—पाच तंत्रांनी हे सुमनोहर शास्त्र (विष्णुशर्म्याने) सिद्ध केले, म्हणजे पाच भागांत हे 'पंचतंत्र' नामक नीतिशास्त्र रचले, असा अर्थ स्पष्ट आहे. 'तंत्र' या शब्दाचे अर्थ विस्तार, कार्यपद्धती, युक्ती इत्यादी आहेत. हर्टेल नावाच्या विद्वानाने यांपैकी 'युक्ती' हा अर्थ प्रस्तुत संदर्भात प्रमाण मानला आहे; आणि पंचतंत्रात राजनैतिक युक्तींचे स्वरूप विशद केलेले असल्यामुळे तोच अर्थ येथे समर्थित होतो, असे म्हटले आहे. हर्टेलचे हे म्हणणे

पटण्यासारखे आहे. कारण मित्रभेद तंत्र म्हणजे मित्रांमध्ये भेद निर्माण करण्याच्या युक्तींचे विवरण; मित्रसंप्राप्ति तंत्र म्हणजे मित्र मिळवण्याच्या युक्तींचे विशदीकरण. पंचतंत्रांत प्राधान्याने राजनीती आणि व्यवहारनीती यांचे स्पष्टीकरण कथारूपाने घडविलेले असल्यामुळे ते युक्तिप्रधान आहे, हे उघड आहे. अर्थातच त्याच्या या युक्तिप्रधान पंचखंडात्मक स्वरूपाला साजेलसे 'पंचतंत्र' हे नाव ग्रंथकाराने पूर्ण औचित्याने योजले आहे, यात शंका नाही.

**पंचतंत्राचे रचना-प्रयोजन**

पंचतंत्र हा नीतिकथांचा संग्रह आहे, हे आपण पाहिले आहे. पंचतंत्राच्या प्रारंभीच 'कथामुखा' मध्ये त्याचे रचनाप्रयोजन स्पष्ट केलेले आहे. अमरशक्ती राजाच्या तीन 'शास्त्रविमुख' आणि 'विवेकरहित' अशा पुत्रांना केवळ सहा महिन्यांच्या काळात नीतिशास्त्रज्ञ' बनविण्याचे आव्हान स्वीकारून विष्णुशर्म्याने हा नीतिबोधक कथांचा संग्रह एका सूत्रात गुंफला आहे. म्हणजे पंचतंत्राचे श्रोते आहेत तीन राजकुमार, जे शास्त्र–विमुख आणि विवेकरहित आहेत. त्यांना नीतीचे ज्ञान हवे आहे; पण ती नीती आहे ऐहिक जीवनाशी संबद्ध. धर्म, अर्थ आणि काम या त्रिविध पुरुषार्थांशी संबद्ध. मोक्षसाधनेशी त्यांना कर्तव्य नाही. त्याचमुळे मनू आदींनी सांगितलेले धर्मशास्त्र, चाणक्य आदींनी सांगितलेले अर्थशास्त्र आणि वात्स्यायन आदींनी सांगितलेले कामशास्त्र यांचे ज्ञान राजकुमारांना व्हावे, त्यांच्या ठायी बुद्धिप्रकाश फाकावा, अशी राजाची इच्छा आहे. परंतु जीविताची मर्यादा आणि ज्ञानाची असीमता व अनंतता ध्यानी घेता हे सारे ज्ञान संक्षेपाने, पण नेमकेपणाने प्राप्त झाले पाहिजे.

ते केवळ पुस्तकी न राहता व्यवहाराच्या, नाना जीवनप्रसंगांच्या संदर्भासह प्राप्त झाले पाहिजे, अशी राजाची स्वाभाविक अपेक्षा आहे. विष्णुशर्म्याने जो कथारूपाचा आश्रय केला आहे, तो या जीवनसंदर्भांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण पंचतंत्रातल्या कथासंभारांतून उमलून आलेले नीतिशास्त्र हे तत्त्व-जड राहिलेले नाही; केवळ सुभाषितभांडारासारखे बनलेले नाही; तर नाना प्रकारच्या जीवनसंदर्भांत विश्वासू सोबत करणाऱ्या मित्रासारखे बनले आहे.

पंचतंत्राचे श्रोते हे 'नीतिशास्त्रज्ञ' होण्याची अपेक्षा राखून अध्ययनाला प्रवृत्त झालेले आहेत, हे आपण कथामुखावरून पाहिलेच आहे. पंचतंत्रातील कथांमधून जी नीती परिस्फुटित होत आहे, ती नीती मोक्षप्रवण धर्माशी संबद्ध नसून इहप्रवण राजनीतीशी आणि व्यवहारचातुर्याशी संबद्ध आहे. हे इहलोकीचे जीवन वैयक्तिक आणि सामूहिक संदर्भात यशस्वी कसे करावे, त्यात सावधान कसे सांभाळावे, वंचना कशी टाळावी, विपरीत प्रसंगांवर मात कशी करावी आणि 'शठं प्रति शाठ्यम्' या तत्त्वाचा अवलंब करून जीवनसंघर्षात टिकाव कसा धरावा, याचाच बोध पंचतंत्रातल्या कथांतून उमलून येतो. म्हणजे पंच-तंत्रातल्या नीतिकथा या चातुर्यकथा आहेत; व्यवहार नीतिकथा आहेत. या कथा वाचताना 'येथ चातुर्य शहाणे झाले!' अशी जाणीव वाचकांच्या मनात जागल्यावाचून राहत नाही.

**नीतिकथा-गुणकथा आणि अद्भुत कथा**

मानवेतर प्राण्यांच्या कथांतून नीतिबोध घडविणाऱ्या कथा किती प्राचीन आहेत, हे निश्चित सांगता येणार नाही. तरीही

त्यांची प्राचीनता वेदकाळाइतकी मागे जाते, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. ऋग्वेदातील मंडूकसूक्तात (७.१०३) मंडूकांना म्हणजे बेडकांना 'ब्राह्मणा व्रतचारिणः' (व्रताचरण करणारे ब्राह्मण) म्हटले आहे. ब्राह्मणग्रंथांतही प्राण्यांच्या नीतिकथा आढळतात. छांदोग्य उपनिषदात सत्यकाम जाबालाने प्रथम एका वृषभाकडून, नंतर हंसाकडून आणि त्यानंतर जलचर पक्ष्यांकडून उपदेश प्राप्त केल्याची हकीकत पहायला मिळते. उद्‌गीथ श्वानाचे रूपकात्मक आख्यान आणि रैक्वाचे ध्यान आकर्षित करणाऱ्या दोन हंसांचे संभाषण उपनिषदांत आढळते. बोलणाऱ्या मानवेतर प्राण्यांच्या नीतिकथांचे स्पष्ट परिणत रूप मात्र आपणांस महाभारतात आढळते. अशा कथा महाभारताच्या केवळ शांतिपर्वातच नव्हे, तर अन्य पर्वांतही समाविष्ट आहेत. उंदरांचा विश्वास संपादन करुन त्यांना खाऊन टाकणारे ढोंगी मांजर, सोन्याची अंडी देणारी हंसी, लबाड कोल्हा, कावळा आणि घुबड यांचे वैर इत्यादी महाभारतातील कथाविशेष पुढे पंचतंत्रात समाविष्ट झालेले आहेत. बौद्धांच्या जातककथांत तर अशा किती तरी मानवेतर प्राण्यांच्या नीतिकथांचा समावेश आहे. बौद्ध जातककथा या नीतिकथाच आहेत. जातककथांच्या संदर्भात बुद्धघोष नामक बौद्ध आचार्याने 'जातकट्ठकथावण्णना' या ग्रंथात अशा कथांना 'गुणकथा' ही अन्वर्थक सुंदर पारिभाषिक संज्ञा वापरली आहे.

नीतिकथा आणि अद्‌भुत कथा या दोन्ही प्रकारच्या कथांत मानवेतर प्राणी वावरत असले, तरी या दोन्ही कथांत मूलभूत फरक असतो. नीतिकथांमध्ये मानवेतर प्राण्यांचा संचार असला, तरी ते प्राणी विशिष्ट प्रकृतीच्या, विशिष्ट विचा-

रांच्या, विशिष्ट हेतूंच्या मानवांचे प्रतिनिधी म्हणून येतात. म्हणजेच हे मानवेतर प्राणी नीतिकथांत रूपकस्वरूपात येतात. उंदरांना फसवून त्यांना फस्त करणारे ढोंगी मांजर हे ढोंगी मानवावरील रूपक असते. लबाड कोल्हा हे लबाड मानवावरील रूपक असते. हे विशिष्ट प्रकृतीचे मानव प्राणिरूपात अवतरले असल्यामुळे एक प्रकारची आकर्षक अद्भुतता श्रोत्याला अनुभवायला मिळत असली, तरी या कथांचे नीतिबोधक, उपदेशात्मक (Didactic) असे स्वरूप सतत जाणवतच राहते. कारण अशा कथांचा तोच जीवितहेतू असतो. शुद्ध अद्भुत कथांतील मानवेतर प्राणी हे मात्र मानवांचे प्रतिनिधी म्हणून येत नाहीत; मानवांना बोध घडविण्यासाठी येत नाहीत; तर कथेतील घटनांमध्ये ते स्वतंत्रपणाने मानवाइतकेच, किंबहुना आपल्या अतिमानवी वैशिष्ट्यांनी सहभागी झालेले असतात.

**पंचतंत्राचा रचनाकाळ व कर्ता**

पंचतंत्राची रचना शास्त्रविमुख राजपुत्रांना नीतिशास्त्रज्ञ बनविण्यासाठी झाली आहे, ही या ग्रंथाच्या निर्मितीमागची भूमिका आपण कथामुखावरून जाणली आहे. या भूमिकेला अनुसरूनच या ग्रंथाच्या कर्त्याने नीतिशास्त्रकारांना देवनमनानंतर नमन केले आहे–

> मनवे वाचस्पतये शुक्राय पराशराय ससुताय ।
> चाणक्याय च विदुषे नमोऽस्तु नयशास्त्रकर्तृभ्यः ।।

मनू, वाचस्पती शुक्र, पराशर, पराशरपुत्र व्यास व चाणक्य यांना नमन करणारा पंचतंत्रकार हा मनू-चाणक्यांनंतरचा म्हणजे इ. स. पूर्वी ३०० च्या नंतरचा आहे, हे उघड आहे.

पंचतंत्राचे पहिले भारताच्या बाहेर घडलेले पहलवी भाषेतील रूपांतर इ. स. ५५० मधील आहे. याचा अर्थ असा की, यापूर्वी शे-दोनशे वर्षे तरी हा ग्रंथ भारतात गाजत होता–भारताबाहेर त्याच्याविषयीचे कुतूहल निर्माण झाले होते. पंचतंत्रात ' दीनार ' या रोमन नाण्याचा उल्लेख येतो. इसवी सनाच्या प्रारंभकाळात भारतात रोमन संस्कृतीचा विशेष संपर्क घडलेला होता. या सर्व बाबींचा विचार करता पंचतंत्राची रचना ख्रिस्तोत्तर दुसऱ्या–तिसऱ्या शतकात झाली असावी, असे दिसते.

महिलारोप्य या दक्षिणेतील नगरीच्या अमरशक्ती राजाच्या राजसभेतील विष्णुशर्मा नामक विद्वान ब्राह्मणाने राजपुत्रांना शहाणे करण्यासाठी या कथा सांगितल्या, हे कथामुखातील कथन, कथेचा भाग असलेले कल्पित आहे, की सत्यनिदर्शक आहे, याचा निर्णय देता येत नाही.

## पंचतंत्राची भारतीय संस्करणे

' बृहत्कथा ' हा गुणाढ्याचा मूळ ग्रंथ जसा उपलब्ध नाही आणि त्याचे स्वरूप जसे आपण कथासरित्सागरादी उत्तरकालीन संस्करणांवरून समजावून घेतो, त्याचप्रमाणे पंचतंत्राचेही मूळ स्वरूप त्याच्या विविध संस्करणांवरूनच समजावून घेता येते. हर्टेल आणि एडगर्टन या दोन विदेशी विद्वानांनी पंचतंत्राच्या विविध संस्करणांचा सूक्ष्म अभ्यास करून त्याच्या मूळ रूपाची पुनःस्थापना करण्याचा विराट प्रयत्न केला आहे. या विविध संस्करणांपैकी तीन संस्करणे भारतीय असून एक पहलवी भाषेतील आहे. तीन भारतीय संस्करणांपैकी ' तंत्राख्यायिका ' या नावाने

हर्टेलने शारदा लिपीतील एकमेव हस्तलिखितावरून संपादिलेले काश्मिरी संस्करण महत्त्वाचे आहे. याच्याशी संबद्ध अशी दोन जैन पंचतंत्रे आहेत. एक बुल्हर व कीलहॉर्न यांनी संपादिलेले आणि दुसरे पूर्णभद्राचे. यांचा काळ अनुक्रमे इ. स. ११०० व ११९९ असा आहे. म्हणजेच ही दोन्ही जैन पंचतंत्रे इ. स. च्या बाराव्या शतकाच्या आद्यन्तीं सिद्ध झालेली आहेत. पूर्णभद्राचे पंचतंत्र ' पंचाख्यान ' या नावाने प्रसिद्ध असून, त्यात ' तंत्राख्यायिके '-शिवाय अन्य एखाद्या अज्ञात स्रोतातून २१ नव्या कथांचा समावेश केला आहे. यात मनुष्येतर प्राणी हे कृतज्ञ प्रकृतीचे आणि मनुष्य प्राणी कृतघ्न प्रकृतीचे दाखविले आहेत.

सोमदेवाच्या कथासरित्सागरात आणि क्षेमेंद्राच्या बृहत्कथा-मंजरीत जे पंचतंत्र समाविष्ट आहे, ते मूळ गुणाढ्याच्या कथा बृहत्कथेतही असावे, असे विद्वानांचे अनुमान आहे. या संस्करणात पंचतंत्राचे मूळचे स्वरूप स्थूलतया शाबूत ठेवून, त्याचा पद्यात संक्षेप केलेला दिसतो.

पंचतंत्राचे दक्षिणी संस्करण हे मुळाशी अधिक प्रामाणिक आहे, असे एडगर्टनचे मत आहे. त्याच्या दृष्टीने दक्षिणी संस्करणा-तील दोन-तृतीयांश गद्य भाग आणि तीन-चतुर्थांश पद्य भाग हा मुळाला धरून आहे. हे संस्करण भारवीच्याही नंतरचे आहे. नेपाळी पंचतंत्र आणि बंगालमधील नारायणभट्टाचा ' हितोपदेश ' यांचा मुख्य आधार म्हणजे हे दक्षिणी संस्करणच होय. ' हितो-पदेशा'ची लोकप्रियता पंचतंत्राइतकीच भारतात आहे. मित्रलाभ, सुहृद्भेद, विग्रह व संधी अशा चार भागांत असलेल्या या ग्रंथाचे पहिले दोन भाग प्रायः पंचतंत्रावरच आधारलेले आहेत. याशिवाय

नारायणभट्टाने शुकबहात्तरी, वेताळपंचविशी, कामंदकीय नीतिसार, इत्यादी अन्य ग्रंथांचाही वापर केला आहे. एकूण ४३ कथांपैकी २५ कथा त्याने पंचतंत्रातून उचललेल्या आहेत. गद्यापेक्षा पद्याचा उपयोग अधिक प्रमाणात आणि अधिक सफाईने करणारा हा नारायणभट्ट –

कथाच्छलेन बालानां नीतिस्तदिह कथ्यते ।

अशा प्रकारे कथारूपाने बालांना नीतिबोध करायला प्रवृत्त झालेला आहे.

**पंचतंत्राचा विश्वविजय**

पंचतंत्र भारतात तर एकसारखे लोकप्रिय होत राहिलेच, परंतु भारताबाहेरही सर्व जगभर त्याचा सतत प्रसार होत राहिला आहे. बायबलचे ज्याप्रमाणे जगातील अनेक भाषांत अनुवाद झाले, त्याचप्रमाणे बायबलच्या काळातच प्रथम संकलित झालेल्या पंचतंत्राचेही जगभरच्या नाना भाषांत अनुवाद झाले. बायबल हा धर्मग्रंथ आहे; ख्रिस्ती धर्माच्या प्रसारकांनी तो प्रयत्नपूर्वक जगभर प्रसृत केला आहे; परंतु पंचतंत्रामागे अशी कोणतीच धर्मप्रतिष्ठा नसताना आणि धर्मप्रचारकांच्या हेतुपूर्वक आक्रमक प्रयत्नांचे पाठबळ नसताना, केवळ आंतरिक सामर्थ्याच्या आकर्षणानेच पंचतंत्र जगभर प्रसृत झाले. भारतीय लोककथांच्या आंतरिक सुगंधाची ही विश्वमानसातील पखरण पाहिली की आपण अभिमानाने आणि आश्चर्याने भारले जातो.

पंचतंत्राचा पहलवी अनुवाद इ. स. ५५० मध्ये झाला, हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. हा अनुवाद खुसरो अनौरकाँ

(इ. स. ५३१-५७०) या राजाच्या राज्यकालात हकीम बुर्जोईने केला होता. हा अनुवाद उपलब्ध नसला तरी नीतिप्रधान भारतीय प्राणिकथांच्या विश्वविजयाचा शुभारंभ म्हणून या अनुवादाचे असाधारण महत्त्व आहे. पुढे याच अनुवादाच्या द्वारा पंचतंत्र जगभर पसरत राहिले. या पहलवी अनुवादाचे शीर्षक 'करटक व दमनक' या अर्थाचे होते. पंचतंत्राच्या पहिल्या तंत्रातील दोन चतुर कोल्हच्यांच्या नावांना प्राधान्य देऊन हे नाव स्वीकारले गेले आहे, हे उघड आहे.

बुर्जोईच्या या पहलवी अनुवादावरूनच बूद याने इ. स. ५७० मध्ये सीरियन भाषेत पंचतंत्र अनुवादले. हा अनुवाद उपलब्ध आहे. इ. स. ७५०च्या, सुमारास अब्दुल्ला इब्न-अल् मोकफ्फा याने 'कलीलह व दिम्नह' (करटक व दमनक) या नावाने पंचतंत्राचे अरबी भाषेत अवतरण घडविले. पंचतंत्राच्या विश्वविजययात्रेत या अरबी अनुवादाला विशेष स्थान आहे. कारण याच अनुवादावरून पश्चिमी जगतात पंचतंत्राची भाषांतरे होत राहिली. ग्रीक (१०२१), जुनी स्पॅनिश (१२५१), हिब्रू (११००), लॅटिन (१२७०), जर्मन (१४८३), इंग्लिश (१५७०), इटालियन (१५८३ या प्रमुख पश्चिमी भाषांतील प्राचीन अनुवादांनंतर यांपैकी बहुतेक भाषांत आणि स्लाव्ह, डॅनिश, आइसलंडिक, तुर्की, डच, फ्रेंच, वगैरे भाषांत अनेकवार या ग्रंथांची भाषांतरें होत राहिली. इसापनीती आणि 'अरेबियन नाइट्स्' यांतील कथांतही पंचतंत्रातील किती तरी कथा समाविष्ट आहेत. मध्ययुगात पंचतंत्रातील कथा विदेशात 'विदपाईच्या कथा" (विद्यापतीच्या कथा) या नावानेही प्रसिद्ध झालेल्या होत्या.

## पंचतंत्राचे मराठी अवतार

पंचतंत्राची अनेक संस्कृत संस्करणे ज्याप्रमाणे भारतभर झाली, त्याचप्रमाणे बहुतेक प्रमुख भारतीय लोकभाषांमध्येही त्याचे अनुवाद जुन्या काळापासून पुन: पुन्हा होत राहिलेले दिसतात. " विष्णुशर्म्याच्या पंचतंत्राची अनेक गद्य व पद्य भाषांतरे पूर्वी महाराष्ट्रात प्रचलित होती. गद्य व पद्य मिळून सुमारे सात-आठ पंचतंत्रे मी पाहिली आहेत. " अशी ग्वाही महाराष्ट्र-सारस्वतकार वि. ल. भावे यांनी दिली आहे. त्यांनी स्वत:च 'महाराष्ट्रकाव्यग्रंथ' मालेत (क्र. ११) प्रकाशित केलेले गद्य पंचतंत्र असेच एकनाथपूर्वकालीन आहे. यात पंचतंत्राला 'पंचोपाख्यान' असे नाव असून, 'नीतिशास्त्र' हा त्याचा विषय असल्याचे म्हटले आहे. त्यातील एक कथा अशी–

" दमनकु पुसे। करटकु सांघे। म्हणे कोण्हे येके धनवंतें नगराबाहिर देवालय करूं आदरिलें। तंवं मध्यान्हकाळीं वाटे जेवावयासि घरासि गेले। तंवं तेथें वानरयुथ आलें। इकडे तिकडे हिंडति। तंवं येकु वान्नरु खेळाडु। दुफोडि खांब करितां मध्यें खिळ घातलि होति। ते त्या वान्नरें देखिली। म्हणे येथें खीळ कोण्हें कां घातलि असे। म्हणौनि उकड बैसोनि ते खीळ हालउं हालउं उपडिलि। तयाचें वृषण बोळकंट होतें। तें खीळ काढतां दुफोडि खांब त्यामध्यें सांपडलें। त्यासि कळ लागलि। मग तो वान्नर मृत्यातें पावला। तरि नाथिलें करितां यैसें होये। "

अशीच अनेक प्राचीन मराठी गद्य रूपांतरे आहेत, त्यांत एक रूपांतर महानुभावपंथीयानें केलेले उपलब्ध आहे.

पद्य रूपांतरे दोन महत्त्वाची आहेत. एक निर्मळ पाठकाचे आणि दुसरे महालिंगदासाचे. ही दोन्ही ‘पंचोपाख्यान’ याच नावाने रचिली गेली आहेत. निर्मळ पाठकाने मराठी गद्यात असलेले ‘पंचोपाख्यान’ ओवी छंदात गुंफले आहे–

पूर्वि प्रति होती मोकळी । ते वोवीबंधें संकळली ।
महासाक्षेपें निपजविली । म्हणे निर्मल पाठकु ॥

महालिंगदासाने मात्र आपले ‘पंचोपाख्यान’ (श. १४८७) साक्षात् संस्कृतवरूनच अनुवादलेले दिसते–

हें पांचहि आख्यान जालें । विष्णुश्रमेंनि कथियेलें ।
म्यां तें श्रोतियांसि सांगितलें । म्हणे महालिंगदासु ॥

हा अनुवाद तीन हजारांवर ओव्यांचा आहे. पंचोपाख्याना-प्रमाणेच महालिंगदासाने ‘वेताळपंचविशी’ आणि ‘सिंहासन-बत्तिशी’ या संस्कृतातील लोककथासंग्रहांचेही ओवीबद्ध मराठी अनुवाद केले आहेत. खानदेशातील शिवपूर्वकालीन कवीचे हे कार्य मराठी भाषेत महत्त्वाचे आहे. या ग्रंथांचा महाराष्ट्रात राजनैतिक शिक्षणासाठी उपयोग चालत असे, असे महालिंग-दासाच्या ग्रंथाच्या ‘आज्ञापत्रा’सारख्या श्रेष्ठ राजनैतिक ग्रंथावरील प्रभावावरून स्पष्टपणे जाणवते.

महाराष्ट्रात मराठी राज्याचा लोप होऊन इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर मुद्रणयुग सुरू झाले आणि ‘पंचतंत्रा’सारख्या जनशिक्षण साधणाऱ्या लोकप्रिय कथाग्रंथांचे अनुवाद प्रकाशित होऊ लागले. अगदी आजही बृहत् आणि संक्षिप्त असे दोन्ही प्रकारचे अनुवाद प्रकाशित होत असतातच. परंतु बहुतेक आधुनिक मराठी अनुवाद हे मुलांसाठी–किशोर व कुमार वाचक दृष्टीपुढे

ठेवून केलेले असतात. मूळ पंचतंत्राचे श्रोते किशोर वयातील राजपुत्र कल्पिलेले असले आणि 'कथाच्छलेन बालांना नीतिस्तदिह कथ्यते :' (कथारूपाने बालांना नीती सांगितली जात आहे) असे हितोपदेशकर्त्याने म्हटले असले, तरी हा ग्रंथ केवळ मुलांचेच मनोरंजन व उद्बोधन घडविणारा आहे, असे नव्हे. त्यात प्रौढ प्रगल्भ राजनीती व व्यवहारनीती अत्यंत समर्थ व शाश्वत रूपकांतून व्यक्त केलेली आहे. अर्थातच प्रौढ प्रगल्भ वाचकही त्यात रंगून जातात. म्हणूनच कोणत्याही काळी शिळा न होणारा आणि कोणत्याही स्थळी परका न वाटणारा हा अमर ग्रंथ संपूर्ण व प्रामाणिक भाषांतरातून मराठी वाचकांना आम्ही उपलब्ध करून देत आहोत.

**अजरामर वाङ्मयकृती**

गेली दोन हजार वर्षे पंचतंत्राने जगभरच्या रसिकांना मोहविले आहे. जगातल्या जवळ जवळ पन्नास भाषांमध्ये भाषांतरित झालेला हा संस्कृत ग्रंथ मूळचा भारतातील. त्यातील मानवेतर प्राण्यांच्या कथा केवळ लहान मुलांसाठीच्या गोष्टी नाहीत, तर त्या व्यावहारिक नीतिशास्त्र शिकविण्यासाठी योजिलेली रूपके आहेत.

प्राचीन भारतीय समाजाचे चित्र दूरदर्शनावर पहावे, तसे ते प्राणिसृष्टीने गजबजलेल्या या कथांतून पाहता येते. येथे भेदनीतिप्रवण मंत्री आहेत, जीवाला जीव देणारे मित्र आहेत. चोर आहेत, राजपुत्र आहेत, राजकन्या आहेत, सुतार आहेत, अद्भुत वातावरण आहे; पण कल्पनासृष्टीतील पात्रयोजना असूनही जमिनीवरची व्यवहारवादाची पावले मात्र जमिनीवरून सुटत नाहीत.

अशा या प्राचीन समाजाचे पारदर्शी चित्रण वाचता वाचता कथानकाची गुंतागुंत तुमची उत्सुकता कायम ठेवते. आजवर मूळ संस्कृत ग्रंथाच्या प्रत्येक शब्दाला न्याय देणारा व त्याबरोबरच मुळातील संस्कृत शब्दांची गोडी व रमणीयता प्रकट करणारा मराठी अनुवाद झालेला नव्हता. तो येथे वाचायला मिळाल्यामुळे तुम्ही त्यात गुंगून जाल. या अजरामर वाङ्मयकृतीची गोडी तुम्हांला तुमच्या मराठीत चाखायला मिळेल.

**रामचंद्र चिंतामण ढेरे**

# कथामुख

ब्रह्मदेव, रुद्र, कार्तिकस्वामी, विष्णू वरुण, यम, अग्नी, इंद्र, कुबेर, चंद्र–सूर्य, सरस्वती, समुद्र, चारी युगे, पर्वत, वायू, पृथ्वी, सर्प, सिद्ध, नद्या, अश्विनीकुमार; लक्ष्मी, अदिती, देवता, चंडिका वगैरे देवी; वेद, तीर्थे, यज्ञ. शिवगण, आठ वसू, सर्व ऋषी, आणि नवग्रह हे सर्वांचे नेहमी रक्षण करोत.

मनु, बृहस्पती, शुक्र, व्यास, पराशर, चाणक्य, ह्या विद्वानांना व राजनीतिशास्त्र जाणणारांना माझा नम्र प्रणाम.

संपूर्ण राजनीतिशास्त्राच्या तत्त्वांचे परिशीलन करून आणि जगातील व्यवहाराचा स्वतः अनुभव घेऊन विष्णुशर्म्याने हे सुंदर पंचतंत्र पांच भागात तयार केले.

असे सांगतात की, दक्षिण जनपदात महिलारोप्य नावाचे एक नगर होते. तेथे सर्व याचकांना कल्पवृक्ष वाटणारा अमरशक्ती नावाचा उदार राजा होऊन गेला. मोठे मोठे राजे त्याच्या पाया पडत तेव्हा त्यांच्या मुगुटांतील रत्नांच्या तेजामुळे राजाची पूजा होत असे. तो सर्व कलांत निपुण होता. त्याला बहुशक्ती, उग्रशक्ती आणि अनंतशक्ती ह्या नावाचे तीन मुलगे होते. परंतु ते तिघेही अशिक्षित व मंदबुद्धीचे होते.

त्यांना काहीच विद्या येत नाही असे पाहून राजाने आपल्या मंत्र्यांना बोलावले आणि तो त्यांना म्हणाला, " माझे तीनही पुत्र अशिक्षित आणि विवेकशून्य आहेत, हे तुम्हांला माहीतच आहे. त्यांना पाहून मला माझे विशाल साम्राज्यही सुखदायक वाटत नाही ! मुलगा झालाच नाही किंवा होऊन मृत्यू पावला तर त्याचे दुःख थोडा काळच होते. परंतु मूर्ख मुलगा आयुष्यभर दुःखच देतो !"

" जी गाय गाभण राहत नाही व दूधही देत नाही त्या गाईचा काय उपयोग ? तसेच जो विद्वानही नाही किंवा भक्तीमानही नाही असा मुलगा जन्मूनही काय उपयोग ? कुलात उत्पन्न झालेला मुलगा मृत्यू पावलेला

बरा ! परंतु मूर्ख पुत्र जन्मूच नये ! कारण, विद्वानांच्या मेळाव्यांत मूर्ख मुलगा पित्याला लाज आणतो."

"गुणी लोकांना मोजायला सुरुवात करताना ज्याचे नाव आल्यावर बोट मोडले जात नाही; त्याची आई स्वत:ला पुत्रवती म्हणत असेल तर वंध्या तरी कोणाला म्हणावे ?"

"म्हणून यांच्या बुद्धीचा विकास होईल असा एखादा उपाय आपण शोधून काढा. माझ्या या सभेत मी ज्यांना इनामे दिली आहेत असे पाचशे विद्वान येथे उपस्थित आहेत. तेव्हा माझी सर्वांना विनंती आहे की, माझे मनोरथ सिद्धीस जातील असा उपाय शोधून काढा."

तेव्हा त्यातील एक मंत्री म्हणाला, "देव, असे ऐकतो की नुसते व्याकरण शिकायला बारा वर्षे लागतात. त्यानंतर मनूप्रणित धर्मशास्त्र, चाणक्य वगैरेंचे अर्थशास्त्र व वात्स्यायनांचे कामशास्त्र, वगैरे शिकायचे असते. त्यानंतरच बुद्धीचा विकास होत असतो."

तेव्हा त्यातील सुमती नावाचा मंत्री म्हणाला, "माणसांचे जीवन अनिश्चित असते. शब्दांचे शास्त्र म्हणजे व्याकरण शिकण्यातच खूप दिवस जातात. म्हणून राजकुमारांना शहाणे करण्यासाठी संक्षिप्त शास्त्राची जरुरी आहे. कारण, शब्दशास्त्र गहन आणि अपार आहे व माणसाचे आयुष्य मात्र अल्प आहे. व त्यातही अनेक विघ्ने येतच असतात ! म्हणून ज्याप्रमाणे हंस पाण्यातील दूध फक्त घेतो त्याप्रमाणे सर्व शास्त्रांतील तत्त्व फक्त ग्रहण करावे. ह्या सभेत 'विष्णुशर्मा' नावाचा ब्राह्मण उपस्थित आहे. तो सर्व शास्त्र जाणतो आणि विद्यार्थ्यांना शिकवण्याबाबत त्याला उत्तम किर्ती मिळाली आहे.

ह्या राजकुमारांना त्याच्या हाती सोपवावे. तोही त्यांना थोड्याच काळात शहाणे करील असा मला विश्वास वाटतो."

हे ऐकून त्या राजाने विष्णुशर्म्याला बोलावले आणि तो म्हणाला, "भगवन्, माझ्यावर कृपा करा आणि माझ्या मुलांना नीतिशास्त्रांत प्रवीण बनवण्याचे काम स्वीकारा. माझी मुले नीतिनिपुण झाली म्हणजे शंभर गावांचा अधिकार मी तुम्हांला देईन."

'देव, मी योग्य तेच बोलतो, ते ऐका. शंभर गावांच्या अधिकारासाठी मी विद्येची विक्री करणार नाही! तरीपण जर मी तुमच्या या मुलांना सहा महिन्यांत नीतिशास्त्रांत निपुण केले नाही, तर माझे नाव सोडून देईन! जास्त काय सांगू? मी द्रव्यलोभाने बोलत नाही. माझे वय ऐंशी वर्षांचे आहे. आणि मी सर्व इंद्रियसुखांपासून निवृत्त झालो आहे. तेव्हा मला धनाची जरूर नाही. पण तुझी प्रार्थना सफळ व्हावी म्हणून मी विद्या देण्यात माझे मन रमवीन. तेव्हा आजची तिथी लिहून ठेव. जर मी सहा महिन्यांच्या आत तुझ्या मुलांना नीतिशास्त्रांत अद्वितीय केले नाही, तर तू मला मृत्यूदंड देऊन माझा स्वर्गाचा मार्ग अडवू शकतोस!"

ब्राह्मणाची ही कठीण प्रतिज्ञा ऐकून राजा आणि मंत्री आश्चर्यचकित झाले. राजाने आपल्या मुलांना नम्रतापूर्वक विष्णुशर्म्याच्या स्वाधीन केले. आणि तो निश्चित झाला.

विष्णूशर्म्याने मित्रभेद, मित्रप्राप्ती, काकोलुकीय, लब्धप्रणाश, आणि अपरिक्षीतकारक या नावाची पाच तंत्रे रचून त्या राजकुमारांना शिकवली. तेही त्यांच्या अभ्यासाने सहा महिन्यांतच विद्वान झाले. हे पंचतंत्र नावाचे नीतिशास्त्र मुलांना व्यवहारपटू बनवण्याबाबत पृथ्वीवर प्रसिद्ध झाले. किंवा आणखी काय सांगावे? जो हे नीतिशास्त्र शिकतो व ऐकतो त्याचा पराभव इंद्रही करू शकत नाही!

# पहिले तंत्र

# मित्रभेद

विष्णुशर्म्याने राजपुत्रांना सांगण्यास सुरुवात केली. आता मित्रभेद नावाचे पहिले तंत्र सुरू होत आहे. ह्यातील पहिला श्लोक असा आहे.

"अरण्यात राहणाऱ्या सिंहाची आणि बैलाची वाढणारी मैत्री एका लोभी व दुष्ट कोल्हयाने नाहीशी केली. ती गोष्ट अशी–"

दक्षिण जनपदात महिलारोप्य नावाचे नगर होते. तेथे वर्धमानक नावाचा वाण्याचा मुलगा राहात असे. त्याने धर्ममार्गाने खूप संपत्ती मिळवली होती. तो एकदा बिछान्यावर झोपला असता मनात विचार करू लागला; "पुष्कळ संपत्ती जरी जवळ असली तरी धन मिळवण्याचा आणखी मार्ग शोधून काढणे हे माझे कर्तव्यच आहे." कारण म्हटलेच आहे,

"धनाच्या सहाय्याने मिळू शकत नाही अशी या जगात एकही वस्तू नाही ! म्हणून बुद्धिमान माणसाने प्रयत्न करून पैसेच मिळवले पाहिजेत. ज्याच्याजवळ धन आहे त्यालाच मित्र आणि नातेवाईक पुष्कळ असतात. संपत्तिमान् माणसालाच पुरुषार्थ साधणारा आणि विद्वान म्हणतात !

याचक लोक संपत्तीमान लोकांच्या विद्येची, दानाची, शिल्पाची, कलेची, व स्थिरपणाची प्रशंसा गात असतात ! या जगात संपत्तीमान मनुष्य परका असला तरी त्याचेबरोबर नाते जोडले जाते आणि दरिद्री मनुष्य आपल्यातील असला तरी दुष्ट ठरवला जातो.

"ज्याप्रमाणे पर्वतातून नद्या नित्य वाहातात त्याप्रमाणे अनेक उपायांनी एकत्र केलेल्या संपत्तीमुळेच माणसांची सर्व कामे साधत असतात. धनाच्या प्रभावामुळे अपूज्य पूज्य होतो; अवंद्य वंद्य होतो. आणि ज्याच्याकडे जाणे योग्य नव्हे अशा माणसाकडे सर्व लोक जातात. जेवल्यामुळेच माणसाची सर्व इंद्रिये योग्य प्रकारे काम करतात, त्याप्रमाणेच मनुष्याच्या

सर्व गरजा धनामुळे भागतात! म्हणून धन हे मनुष्याचे मुख्य साधन आहे. धनासाठी लोक स्मशानातही जातात! आणि निर्धन मातापित्याला सोडून दूर जातात.

"संपत्तीमुळेच म्हातारा मनुष्य तरुण माणसासारखा वागतो व अर्थहीन तरुण मनुष्य जणू म्हाताराच होतो!

धन मिळविण्याचे सहा उपाय आहेत. भिक्षा मागणे, राजसेवा करणे, शेती करणे, कोणती तरी विद्या मिळविणे, सावकारी करणे किंवा व्यापार करणे, हे ते सहा मार्ग आहेत. ह्या सर्वांमध्ये व्यापार करून जो धन मिळवतो त्याचा लोक तिरस्कार करीत नाहीत.

"कारण असे म्हणतात की, भिक्षा मागणे हे नीच व कपटी वृत्तीचे काम आहे. राजसेवेमध्ये आपल्या श्रमाचे योग्य वेतन मिळत नाही. शेती हे फार कष्टाचे काम आहे. विद्या मिळविण्यासाठी गुरूची सेवा नम्रतेने करावी लागते आणि ते कठीणच असते! सावकारी करताना धन दुसऱ्याच्या हातात असते व ते बुडले की सावकार दरिद्री बनतो. म्हणून पैसा मिळविण्यासाठी व आपला चरितार्थ चालविण्यासाठी व्यापार हेच सर्वश्रेष्ठ साधन आहे असे मला वाटते. बाकीचे मार्ग संशयास्पद आहेत.

व्यापाराचे सात प्रकार आहेत. १) सुगंधी पदार्थांचा व्यापार २) गहाणवटीचा व्यापार ३) दलालीचा व्यापार ४) ओळखीच्याच ग्राहकांना फसवून केलेला व्यापार ५) वस्तूची खोटी किंमत सांगून खूप नफा मिळवणे ६) खोटी वजने–मापे वापरून नफा मिळवणे ७) विदेशातून माल नेणे व आणणे.

"यांपैकी सुगंधी पदार्थांचा व्यापार सर्वांत उत्तम. सोन्याचांदीचा व्यापारसुद्धा यापुढे किरकोळच! कारण यात एकाला घेतलेला माल शंभरपट किंमतीला सहज विकता येतो. गहाणाच्या व्यापारात व्यापारी आपल्या घरात गहाणवस्तू आल्यानंतर देवतेची प्रार्थना करतो की, जर माझा ठेवीदार मरून गेला तर, मी तुझी पूजा बांधीन! दलालीच्या घाऊक व्यापारात शेटजीला वाटते की, आता सर्व पृथ्वी माझ्या मालकीची झाली! ओळखीचे लोकांत व्यापार करणारा, ग्राहक आलेला पाहून खूष होतो. आणि त्याला पुत्रप्राप्तीपेक्षा जास्त आनंद होतो! ग्राहकांना कमी

किमतीच्या मालाची जास्त किमत सांगणे आणि खोटी वजने वापरून फसवणे हा व्यापाऱ्यांचा स्वभावच असतो. विदेशात मालाची आयात निर्यात करणारे व्यापारी आपल्या हुषारीमुळे दुप्पट तिप्पट फायदा मिळवू शकतात."

वर्धमानक वाण्याने असा विचार करून मथुरेत खपू शकेल असा माल आणला आणि गाडी भरून व घरातील मोठ्या माणसांची आज्ञा घेऊन तो शुभमुहूर्तावर मथुरेला जायला निघाला.

त्याने आपल्या गाडीला संजीवक आणि नंदक नावाचे बैल जुंपले होते. ते त्याच्याच घरात वाढले होते व मोठे झाले होते. ते जेव्हा यमुनेच्या तीरावर पोहचले तेव्हा संजीवकाचा पाय दलदलीत रुतून बसला. आणि जू तोडून तो तेथेच बसला. संजीवकाची ही स्थिती पाहून वर्धमानक दुःखी झाला. आणि त्याची दया येऊन त्याने आपला प्रवास तीन दिवस स्थगित केला.

तो खिन्न आहे असे पाहून इतर साथीदार व्यापारी त्याला म्हणाले, "शेटजी, एका बैलासाठी सिंह आणि वाघ वगैरे हिंस्र पशूंनी भरलेल्या ह्या अरण्यात आपण थांबलो आहोत ! आणि सर्वांचे प्राण का बरे संकटात घालत आहोत ? ह्या जगात लहान वस्तूंचा त्याग करून मोठ्या वस्तूंचे रक्षण करणे यातच शहाणपणा आहे."

साथीदाराच्या आग्रहावरून वर्धमानकाने संजीवकाच्या रक्षणाकरता काही पहारेकरी नेमले. व बाकीच्या सेवकांबरोबर तो तांड्यासह पुढे निघाला. ते पहारेकरी भयानक श्वापदांनी भरलेल्या त्या जंगलात न राहता संजीवकाला तेथेच सोडून आपल्या सार्थवाहाकडे गेले. दुसऱ्या दिवशी ते मालकाला म्हणाले, " स्वामी, तो संजीवक मेला. तुमचा तो आवडता असल्यामुळे आम्ही त्याला संस्कारपूर्वक अग्नी दिला."

हे ऐकून त्या व्यापाऱ्याने स्नेहमय आणि कृतज्ञ अंतःकरणाने संजीवकाची शास्त्राप्रमाणे उत्तरक्रिया केली.

पण संजीवकाचे आयुष्य शिल्लक होते ! यमुनेच्या पाण्यावरून येणाऱ्या थंडगार वाऱ्यामुळे तो तरतरीत झाला व कसातरी त्या यमुनेच्या गाळातून उठला व हळूहळू त्याने यमुनातीर गाठले. तेथे पाचूप्रमाणे हिरवे व कोवळे गवत खाऊन तो थोड्याच दिवसांत श्रीशंकराच्या नंदीप्रमाणे धष्टपुष्ट

आणि बळकट झाला. तो रोज आपल्या शिगांनी तेथील वारुळे उकरून टाकून मोठ्याने गर्जना करीत असे. म्हणतातच की, दैव ज्याचे रक्षण करतो तो अरक्षित असला तरी सुरक्षित राहतो! आणि दैव विरुद्ध असेल तर सुरक्षितसुद्धा नाश पावतो! वनात सोडलेला अनाथ प्राणी भाग्य अनुकूल असेल तर जगतो आणि घरी राहणारा सर्व उपाय करूनही मरतो!

एकदा पिंगलक नावाचा एक सिंह तहान लागली म्हणून सर्व प्राण्यांसह पाणी पिण्यासाठी यमुनेच्या काठी आला. तेथे त्याने दुरून येणारी संजीवकाची घनगंभीर गर्जना ऐकली. ती ऐकून तो मनात अतिशय भ्यायला. पण वरून काहीही न दाखवता वडाच्या झाडाखाली आपल्याभोवती परिवाराची चार कोंडाळी करून बसला. तो स्वत: मध्ये बसला व बाहेरच्या बाजूस चार मंडळात अनुयायी व सेवकवर्ग बसले होते. त्याच्या परिवारात करटक आणि दमनक नावाचे दोन कोल्हे होते. ते जुन्या मंत्र्यांचे मुळगे होते. पण त्यांना अधिकारावरून काढले होते. सिंह अशा प्रकारे बसलेला पाहून ते आपसात बोलू लागले. त्यांतील दमनक म्हणाला, "मित्रा करटका, आपले स्वामी हे सिंहमहाराज पाणी पिण्याकरिता यमुनेच्या काठी आले होते. पण तहानेने व्याकूळ झाले असताही येथे परत आले. आणि व्यूहरचना करून वडाच्या झाडाखाली दुर्मुखलेले होऊन का बरे बसले आहेत?" तेव्हा करटक म्हणाला, "अरे, याच्याशी आपला काय संबंध? ज्या कामात आपला संबंध नाही असा अव्यापारेषू व्यापार करणारा मनुष्य लाकडात मारलेली पाचर उपटणाऱ्या माकडाप्रमाणे मृत्यू पावतो.

दमनकाने विचारले. "हे कसे काय बुवा?"

तेव्हा करटक म्हणाला,–

## कथा पहिली

# पाचर उपटणारे माकड.

" एक व्यापारी नगराजवळच्या एका उपवनात मंदिर बांधत होता. तेथे काम करणारे मजूर व कारागीर दुपारच्यावेळी जेवण करण्यासाठी गावात जात असत. एके दिवशी एकाएकी वानरांची एक टोळी फिरत फिरत तेथे येऊन पोचली. त्या ठिकाणी एका कारागीराने अर्धवट कापलेल्या अर्जुनवृक्षाच्या एका खांबांत खैराच्या लाकडाची पाचर मारून ठेवली होती. ती माकडे तेथे जाऊन झाडावर, लाकडांवर आणि खांबावर बसून मोकळेपणी उड्या मारत खेळू लागली.

त्यातील एक माकड त्या अर्धवट कापलेल्या खांबावर बसला. दैवाने त्याचा मृत्यू जवळ आला होता. म्हणून तो खैराची पाचर वर ओढू लागला. त्याबरोबर खांबातून पाचर निसटली व त्याचे वृषण फटीत अडकले !

त्यानंतर काय घडले ते मी तुला पूर्वीच सांगितले आहे. म्हणून माझे म्हणणे आहे की, अव्यापारेषू व्यापार करू नये. सध्या आपल्याला सिंहाने भक्षण करून राहिलेले भोजन मिळते आहे ना ? तर मग दुसऱ्या उठाठेवी कशाला करावयाच्या ?"

दमनक म्हणाला, " आपण काय नुसतेच फुकटचे जेवण जेवण्यासाठी आहोत ? हे योग्य नाही. शहाणी माणसे मित्रावर उपकार आणि शत्रूवर अपकार करण्यासाठी राजाचा आश्रय घेतात. आपले पोट भरण्याचे काम कोण करत नाही ? अनेकांना आश्रय देऊन जगण्यातच खरी मजा आहे. नाहीतर कावळे सुद्धा चोचीने स्वतःचे पोट भरतातच की ! विज्ञान, शौर्य आणि वैभव ह्यांनी परिपूर्ण असलेले जीवन क्षणभरही जगणे त्याचेच नाव जीवन असे शहाणे म्हणतात ! जो आपल्या व दुसऱ्यांच्या नातेवाईकांवर उपकार करीत नाही, आणि दीनांवर दया दाखवत नाही, सेवकांबद्दल सहानुभुती दाखवत नाही, तो जगून या जगाला काय उपयोग ? कावळेही भाताचे पिंड खाऊन दीर्घकाळ जगतातच की !

" पावसाळ्यात थोड्या पावसानेच लहान नदीलसमजले आहे. मी ओंजळ थोडक्यातं भरून जाते ! त्याचप्रमाणे निरुद्याला अनुकूल थोड्याश्याच धनामुळे संतुष्ट होतो.

" जो आपल्या कुलाच्या ध्वजस्तंभावर ध्वजाप्रमाणे चढू शकला त्याला जन्म देऊन काय उपयोग ! आईच्या तारुण्याचा नाश फक्त ... केला ! नित्य पालटणाऱ्या या जगात माणसे मरतात व पुन्हा जन्माला येतात. पण ज्याने आपल्या पुरुषार्थाने संपत्ती आणि कीर्ती मिळविली तोच खरा जन्मला असे म्हणता येईल.

" नदीच्या किनाऱ्यावर उगवलेल्या गवताचा जन्मदेखील सफल होतो. कारण, नदीच्या पुरात बुडणाऱ्याला त्या गवतामुळे हातांना आधार मिळतो. उदार चारित्र्याचे सज्जन लोकांचा त्रास नाहीसा करतात, पण उंचावरून जाणाऱ्या पाण्याने भरलेल्या आकाशातील मेघांप्रमाणे ते विरळच असतात ! विद्वान लोक श्रेष्ठ लोकांच्या मातांना मान देतात. कारण अशा श्रेष्ठ पुरुषाला त्यांनी जन्म दिलेला असतो. शक्ती असूनही जो ती वापरत नाही व ती लपवून ठेवतो, त्याला अपमान सहन करावा लागतो ! लाकडात अग्नी सुप्तपणे असतो तरीही लोक त्याला ओलांडून जातात. पण प्रज्वलित अग्नी ओलांडण्याचे धाडस कोणीही करीत नाही !

करटक म्हणाला, " आपण पदच्युत आहोत. तेव्हा राजाच्या बाबतीत आपल्याला कशाला विचार हवा ? विचारले नसताना आणि मंत्री नसताना जो राजापुढे बोलतो त्याची थट्टा होते व अपमान होतो. पांढऱ्या कापडावर ज्याप्रमाणे उत्तम रंग चढू शकतो त्याप्रमाणे योग्य ठिकाणी बोलले असता त्याचा उपयोग होतो. ज्या बोलण्यापासून काही लाभ मिळणार असेल तरच आपण बोलावे. "

दमनक म्हणाला, " असे म्हणू नकोस ! राजाच्या सेवेत तत्पर राहिले तर प्रधान नसलेल्यालाही प्रधानपद मिळेल आणि सेवा न करणाऱ्या प्रधानाचे प्रधानपदही जाईल. राजा आपल्या जवळ राहणाऱ्या माणसावरच प्रेम करतो. मग तो मनुष्य विद्याहीन, अकुलीन आणि असभ्य असला तरी चालतो. राजे लोक लता आणि तरुण स्त्रियांप्रमाणेच जो जवळ असतो त्यालाच वेढून राहतात !

## कथा पहिली

# पाचर उपटणारे माकड.

" एक व्यापारी नगराजवळच्या एका उपवनात मंदिर बांधत होता. तेथे काम करणारे मजूर व कारागीर दुपारच्यावेळी जेवण करण्यासाठी गावात जात असत. एके दिवशी एकाएकी वानरांची एक टोळी फिरत फिरत तेथे येऊन पोचली. त्या ठिकाणी एका कारागीराने अर्धवट कापलेल्या अर्जुनवृक्षाच्या एका खांबांत खैराच्या लाकडाची पाचर मारून ठेवली होती. ती माकडे तेथे जाऊन झाडावर, लाकडांवर आणि खांबावर बसून मोकळेपणी उड्या मारत खेळू लागली.

त्यातील एक माकड त्या अर्धवट कापलेल्या खांबावर बसला. दैवाने त्याचा मृत्यू जवळ आला होता. म्हणून तो खैराची पाचर वर ओढू लागला. त्याबरोबर खांबातून पाचर निसटली व त्याचे वृषण फटीत अडकले !

त्यानंतर काय घडले ते मी तुला पूर्वीच सांगितले आहे. म्हणून माझे म्हणणे आहे की, अव्यापारेषू व्यापार करू नये. सध्या आपल्याला सिंहाने भक्षण करून राहिलेले भोजन मिळते आहे ना ? तर मग दुसऱ्या उठाठेवी कशाला करावयाच्या ?"

दमनक म्हणाला, " आपण काय नुसतेच फुकटचे जेवण जेवण्यासाठी आहोत ? हे योग्य नाही. शहाणी माणसे मित्रावर उपकार आणि शत्रूवर अपकार करण्यासाठी राजाचा आश्रय घेतात. आपले पोट भरण्याचे काम कोण करत नाही ? अनेकांना आश्रय देऊन जगण्यातच खरी मजा आहे. नाहीतर कावळे सुद्धा चोचीने स्वतःचे पोट भरतातच की ! विज्ञान, शौर्य आणि वैभव ह्यांनी परिपूर्ण असलेले जीवन क्षणभरही जगणे त्याचेच नाव जीवन असे शहाणे म्हणतात ! जो आपल्या व दुसऱ्यांच्या नातेवाईकांवर उपकार करीत नाही, आणि दीनांवर दया दाखवत नाही, सेवकांबद्दल सहानुभूती दाखवत नाही, तो जगून या जगाला काय उपयोग ? कावळेही भाताचे पिंड खाऊन दीर्घकाळ जगतातच की !

"पावसाळ्यात थोड्या पावसानेच लहान नदीला पूर येतो. उंदराची ओंजळ थोडक्यात भरून जाते! त्याचप्रमाणे निरुद्योगी क्षुद्र मनुष्य थोड्याश्याच धनामुळे संतुष्ट होतो.

"जो आपल्या कुलाच्या ध्वजस्तंभावर ध्वजाप्रमाणे चढू शकत नाही त्याला जन्म देऊन काय उपयोग! आईच्या तारुण्याचा नाश फक्त त्याने केला! नित्य पालटणाऱ्या या जगात माणसे मरतात व पुन्हा जन्माला येतात. पण ज्याने आपल्या पुरुषार्थाने संपत्ती आणि कीर्ती मिळविली तोच खरा जन्मला असे म्हणता येईल.

"नदीच्या किनाऱ्यावर उगवलेल्या गवताचा जन्मदेखील सफल होतो. कारण, नदीच्या पुरात बुडणाऱ्याला त्या गवतामुळे हातांना आधार मिळतो. उदार चारित्र्याचे सज्जन लोकांचा त्रास नाहीसा करतात, पण उंचावरून जाणाऱ्या पाण्याने भरलेल्या आकाशातील मेघांप्रमाणे ते विरळच असतात! विद्वान लोक श्रेष्ठ लोकांच्या मातांना मान देतात. कारण अशा श्रेष्ठ पुरुषाला त्यांनी जन्म दिलेला असतो. शक्ती असूनही जो ती वापरत नाही व ती लपवून ठेवतो, त्याला अपमान सहन करावा लागतो! लाकडात अग्नी सुप्तपणे असतो तरीही लोक त्याला ओलांडून जातात. पण प्रज्वलित अग्नी ओलांडण्याचे धाडस कोणीही करीत नाही!

करटक म्हणाला, "आपण पदच्युत आहोत. तेव्हा राजाच्या बाबतीत आपल्याला कशाला विचार हवा? विचारले नसताना आणि मंत्री नसताना जो राजापुढे बोलतो त्याची थट्टा होते व अपमान होतो. पांढऱ्या कापडावर ज्याप्रमाणे उत्तम रंग चढू शकतो त्याप्रमाणे योग्य ठिकाणी बोलले असता त्याचा उपयोग होतो. ज्या बोलण्यापासून काही लाभ मिळणार असेल तरच आपण बोलावे."

दमनक म्हणाला, "असे म्हणू नकोस! राजाच्या सेवेत तत्पर राहिले तर प्रधान नसलेल्यालाही प्रधानपद मिळेल आणि सेवा न करणाऱ्या प्रधानाचे प्रधानपदही जाईल. राजा आपल्या जवळ राहणाऱ्या माणसावरच प्रेम करतो. मग तो मनुष्य विद्याहीन, अकुलीन आणि असभ्य असला तरी चालतो. राजे लोक लता आणि तरुण स्त्रियांप्रमाणेच जो जवळ असतो त्यालाच वेढून राहतात!

"ज्या सेवकाला राजा कशामुळे रागावतो व कशामुळे प्रसन्न होतो हे समजते तो योग्य वेळ येताच असंतुष्ट राजालाही वश करून घेतो! विद्वान, महत्त्वाकांक्षी, कलावंत, शूर वगैरे सेवाधर्मी लोकांना राजाशिवाय दुसरे आश्रयस्थान नसते. आपले कुल आणि जाती ह्यांच्या अभिमानामुळे जे सेवेसाठी राजाकडे जात नाहीत त्यांच्या नशिबी मरेपर्यंत भिक्षा मागण हे एकच प्रायश्चित असते. जे लोक म्हणतात की, राजाला प्रसन्न करणे फार अवघड आहे. ते लोक आपला आळस व मूर्खपणा जगजाहीर करीत असतात! वाघ, सिंह, हत्ती आणि साप यांनाही निरनिराळ्या उपायांनी वश करून घेता येते. तर मग बुद्धीमान आणि उत्साही माणसाला राजाला आपलेसे करून घेणे हे अगदी सोपे आहे. ज्याप्रमाणे चंदनाचे वृक्ष मलयपर्वताशिवाय दुसरीकडे वाढत नाहीत त्याप्रमाणे राजाच्या आश्रयानेच विद्वानांना किर्ती मिळत असते. राजा प्रसन्न झाल्यावर पांढरी छत्रचामरे, सुंदर घोडे आणि मत्त हत्ती प्राप्त होतात."

करटक म्हणाला, "मग तू आता काय करणार आहेस?"

"आपला स्वामी पिंगलक आज भयभीत झाला आहे. त्याचे अनुयायीही घाबरले आहेत. त्यांच्याजवळ जाऊन भीतीचे खरे कारण काय हे मी जाणून घेतो. मग मैत्री, युद्ध, आक्रमण, आश्रय, शत्रूसेवा व दुटप्पीपणा ह्या राजनीतीच्या सहा प्रकारांपैकी कोठल्या तरी एका उपायाने मी माझे काम साधून घेईन."

करटकाने विचारले, "आपला स्वामी घाबरला आहे हे तुला कसे समजले?"

"त्यात काय आहे?" दमनक म्हणाला, "तोंडाने सांगितलेले पशूंनाही कळते. सकेतशद्बांनी हाकलल्यानंतर घोडे आणि हत्ती स्वारी घेऊन जातातच ना? पण बुद्धिमानाला न बोलताच अर्थ समजतो. त्यालाच बुद्धी म्हणतात. त्याचे अंगविक्षेप आणि वर्तन ह्यावरून मनातील विचार ओळखणे हेच बुद्धीचे काम आहे. मनुष्याचा आकार, प्रकार, चालणे–बोलणे याचे डोळे, ह्यांचे नीट निरीक्षण केले तर त्याच्या मनात काय आहे, हे सहज ओळखता येते.

पिंगलकाच्या हावभावावरून तो भ्याला आहे हे मला समजले आहे. मी माझ्या बुद्धीच्या प्रभावाने त्याला निर्भय बनवीन आणि त्याला अनुकूल करून घेऊन मंत्र्याची पदवी मिळवीन."

करटक म्हणाला, "तुला सेवाधर्म कुठे माहीत आहे ? मग तू त्याला कसे अनुकूल करून घेशील. ?"

"काय ? मला सेवाधर्म कळत नाही ?" दमनक म्हणाला. "वडिलांच्या मांडीवर खेळत असतांना पाहुणे म्हणून आलेल्या सज्जनांच्या तोंडून मी नीतिशास्त्राचा अभ्यास केला व राजसेवेची तत्त्वे ऐकून ती आत्मसात केली. तेव्हा ती ऐक–

"शूर, विद्वान आणि सेवाधर्म जाणणारे, हे तिघेच ही सुवर्णपुष्पांनी भरलेली पृथ्वी आपलीशी करून घेत असतात ! ज्या सेवेमुळे राजाचे कल्याण होते तीच सेवा खरी. आज्ञा पाळून व त्याला आवडणारे काम करूनच राजसेवेत हजर व्हावे. विद्वांनानी हाच मार्ग अवलंबला पाहिजे.

ज्याला गुण–अवगुण समजत नाही, त्याची सेवा पंडिताने करू नये ! खारवट जमिनीची कितीही मशागत केली तरी त्यातून फळाची आशा करता येत नाही. एखादा गुण जाणणारा राजा निर्धन असला तरी त्याची सेवा करावी. कारण, कालांतराने समृद्धी आल्यानंतर तो सेवकांना जन्मभर सुखसमृद्धी देऊ शकतो.

विवेकहीन राजाकडून जीवनाश्रयाची व संपत्तीची अपेक्षा करण्यापेक्षा पंडिताने वृक्षाप्रमाणे एका जागी स्थिर राहून उपाशी मरणे बरे ! धनी कठोर बोलणारा आणि चिक्कू असला तर, सेवक त्याचा द्वेष आणि निंदा करतो. पण त्याने स्वत:चीच निंदा करावी ! कारण कोणाची सेवा करावी व कोणाची करू नये हे न समजल्यामुळे यात सेवकाचाच दोष असतो. ऐश्वर्य असूनही ज्या राजाचे भुकेले सेवक तृप्त होत नाहीत त्या राजाला फळे आणि फुले ह्यांनी भरलेल्या मंदारवृक्षाप्रमाणे सोडून द्यावे !

"हुषार सेवकाने राजमाता, राणी, राजपुत्र, मुख्यमंत्री, पुरोहित व द्वारपाल ह्यांना राजाप्रमाणेच मान द्यावा. चतुर राजसेवकाने राजाची आज्ञा मिळाल्यावर 'महाराज चिरंजीव होवोत' असे नम्रतेने म्हणून ती आज्ञा स्वीकारावी व तिचे पालन करावे.

अशा प्रकारे वागणारा राजसेवक राजाचा आवडता होतो. राजाने दिलेले बक्षीस नम्रतेने स्वीकारतो व त्याने दिलेली वस्त्रे जो धारण करतो, तो सेवक राजाला आवडतो. जो राजाच्या अंत:पुरातील कंचुकी बरोबर काही कारस्थान करीत नाही आणि राजस्त्रियांशी संबंध ठेवत नाही, तो राजाला आवडता होतो. जो दूताला यमदूताप्रमाणे मानतो, ज्याला दारू विषासारखी वाटते, व जो स्त्रियांकडे एखाद्या चित्राकडे पाहावे असे पाहतो तो राजाला आवडतो. जो युद्धाच्या मोर्च्यात राजाच्या पुढे चालतो; नगरात त्याच्यामागून जातो. आणि राजप्रासादात द्वाराजवळ उभा राहतो तो राजाला आवडतो ! जो मनुष्य स्वत:ला राजाचा आज्ञाधारक व आवडता सेवक मानतो आणि संकटातसुद्धा आपली मर्यादा ओलांडून वागत नाही तो राजाला आवडतो. जो युवक राजाच्या शत्रूंना शत्रू मानतो आणि राजाच्या मित्रांना मित्र मानतो तो राजाला प्रिय होतो. राजा रागावून कठोर बोलत असताना नाही जो उत्तर देत नाही आणि राजाच्यासमोर मोठ्याने हसत नाही, तो राजाचा आवडता होतो !

जो सेवक राजाच्या आज्ञेवरून रणांगणाचा आश्रय करतो आणि प्रवासालाच स्वत:चे घर मानतो तो राजाला आवडतो. जो राजस्त्रियांबरोबर कुठल्याही प्रकारचा संबंध ठेवत नाही, राजाबरोबर वाद करीत नाही किंवा त्याची निंदा करीत नाही. तो राजाचा आवडता होतो."

करटकाने विचारले, " तेथे गेल्यानंतर तू काय बोलणार आहेस ते सांग. "

दमनक म्हणाला, " चांगली वृष्टी झाल्यावर ज्याप्रमाणे एका बीजातून दुसरी बीजे उत्पन्न होतात त्याप्रमाणे एका बोलण्यातून दुसरे पुढचे बोलणे निघत जाते ! प्रतिभासंपन्न लोक विनाशकारक किंवा लाभप्रद उपायांच्या प्रत्यक्ष वापरावरून भविष्यकालीन संकट किंवा लाभ याविषयी सांगत असतात.

" काही लोकांच्या बोलण्यात सुभाषिते पोपटाप्रमाणे येत असतात. तर काहींच्या हृदयातच असतात. मुक्या माणसाप्रमाणे ते बोलू शकत नाहीत. तर ही सुभाषिते काहींच्या हृदयात असतात व योग्य काली ती बोलून दाखवतात. "

मी तेथे जाऊन प्रसंगाला न शोभेल असे काहीही बोलणार नाही. वडिलांच्या मांडीवर खेळताना नीतिशास्त्राच्या तत्त्वविवेचनात मी असे ऐकले आहे की, अयोग्य वेळी बोलणाऱ्या बृहस्पतीचाही अपमान होतो !"

करटक म्हणाला, "पण राजे पर्वताप्रमाणे असतात. पर्वताला ज्याप्रमाणे साप, सिंह, वाघ वगैरेंनी वेढलेले असते व त्याचेकडे पोहचणे कठीण असते त्याचप्रमाणे राजांना दुष्ट, कठोर व विषारी लोकांनी वेढलेले असते !

"राजे स्वभावाने सापासारखे असतात. ते भोगविलासात बुडलेले, कवच धारण करणारे, कुटील व क्रूर वर्तन करणारे असतात. अनुनय व प्रशंसा या मंत्रानेच त्यांना प्रसन्न करून घेता येते. सर्पाप्रमाणेच राजेही दोन जिभांचे, क्रूर काम करणारे, छिद्रान्वेषी, व लांबचे पाहू शकणारे असतात. जे लोक राजांच्या मनाविरुद्ध थोडेसेही वागतात ते अग्नीत पडणाऱ्या पतंगाप्रमाणे राजाच्या क्रोधाग्नीत जळून जातात ! सर्व लोक ज्याला मान देतात ते राजपद मिळविणे फार कठीण आहे. थोडी जरी चूक झाली तरी त्याचा नाश होतो. थोड्याशा अपमानाने रागावणाऱ्या ब्रह्मतेजाप्रमाणे राजाही लवकर रागावतो. राज्यलक्ष्मी मिळविणे व टिकविणे जरी कठीण असले तरी, ती एकदा मिळविली की डोहातील पाण्याप्रमाणेच कायम राहते !

दमनक म्हणाला, "खरे आहे. परंतु ज्या व्यक्तीचा जसा स्वभाव असेल त्याप्रमाणे वागून त्याला वश करून घेता येते. म्हणून बुद्धिमान माणसाने धन्याच्या मनाप्रमाणे वागून त्यावर आपली छाप बसवावी. धन्याच्या मनाप्रमाणे वागणे हा सेवकाचा गुण असला पाहिजे. कारण त्याच्या लहरीप्रमाणे वागले तर राक्षसही वश होऊ शकतात !"

"राजा रागावल्यावर त्याची स्तुती करावी. त्याला आवडणाऱ्या माणसाबद्दल प्रेम दाखवावे, त्याच्या शत्रूबद्दल द्वेष बाळगावा, त्याच्या दानाची प्रशंसा करावी. मंत्रतंत्राशिवाय राजाला वश करून घेण्याचा हाच एक मार्ग आहे."

"तुझी अशी इच्छा आहे तर तू जरूर जा." करटक म्हणाला. "तुझा मार्ग सुखकर होवो." तोही करटकाला प्रणाम करून पिंगलकाकडे गेला.

तो येत असलेला पाहून पिंगलक आपल्या द्वारपालांना म्हणाला, "वेताची काठी बाजूला करून त्याला येऊ द्या. तो आपल्या जुन्या मंत्र्यांचा मुलगा आहे. त्याला दुसऱ्या मंडळांत बसवा."

"जशी आपली आज्ञा!" द्वारपाल म्हणाला. दमनकाने प्रवेश करून पिंगलकाला नमस्कार केला. व तो आज्ञा मिळाल्यावर आपल्या जागी जाऊन बसला. वज्रासारखी नखे असलेला आपला उजवा हात आशीर्वादासाठी वर करून पिंगलकाने दमनकाला विचारले, "तुझे ठीक आहे ना? आज खूप दिवसांनी दिसलास!"

दमनक म्हणाला, "महाराजांना आमच्याकडे कोणतेच काम नसते. पण आता योग्य वेळ आली आहे म्हणून मलाही काही सांगायचे आहे. उत्तम, मध्यम आणि नीच या कोणत्याही प्रकारांच्या माणसाची राजाला गरज असते. म्हणतातच की, साध्या गवताच्या काडीनेही दात आणि कान कोरण्याचे काम होते. मग बोलता येणाऱ्या व हात असणाऱ्या आमच्यासारख्यांचा राजाला का बरे उपयोग होणार नाही? आम्ही महाराजांचे वंशपरपरेने सेवक आहोत. आणि संकटांतसुद्धा आपल्या पाठीशी राहतो. तरीही आमचा अधिकार महाराज आम्हाला देत नाहीत हे योग्य नाही.

"सेवक आणि अलंकार नेहमी योग्य ठिकाणीच ठेवले पाहिजेत. मी प्रभू आहे, असे म्हणून डोक्यात घालायचा मणी पायाला बांधणे योग्य नाही. कारण जो धनी सेवकाचे गुण जाणत नाही किंवा जाणूनही त्याला योग्य सन्मान व स्थान देत नाही त्याला सेवक सोडून जातात. मग तो धनी, राजा किंवा उच्च कुलातील असला तरी त्याची पर्वा करीत नाहीत. कमी गुणाच्या सेवकाच्या तुलनेत गुणी सेवकाला योग्य मानसन्मान जर मिळाला नाही तर तो धन्याला सोडून जातो. समान गुण असूनही दोन सेवकांत धन्याने भेदभाव केला व योग्य स्थान दिले नाही तरी तो सेवक स्थान सोडून जातो."

"राजाने वरच्या जागेसाठी योग्य असलेल्यांना खालची जागा अविवेकाने दिली तर ते सेवक रागावून ती जागा सोडून देतात. व या सेवकाचा दोष नसून राजाचाच दोष असतो. म्हणतातच ना, की जो ालून सोन्याच्या कोंदणात बसवायला पाहिजे तो जर शिशाच्या कोंदणात

तर त्या मण्याचे काही म्हणणे नसते व त्याची शोभाही कमी होत नाही ! पण त्या कारागीराची अक्कल मात्र दिसून येते ! ”

“ महाराज, आपण विचारता की ’ ‘ बऱ्याच दिवसांनी दिसलास ? ’ पण जेथे उजव्या व डाव्या हातात कोणताच फरक समजला जात नाही तेथे दुसरीकडे सोय असलेली व्यक्ती कशी बरे राहील ? जो धनी काचेला मणी समजतो व मण्याला काच समजतो त्याच्या आश्रयाला सेवक नावालासुद्धा राहत नाहीत. जेथे रत्नपारखी नाहीत तेथे समुद्रातील रत्नांची किमत होत नाही. असे ऐकले आहे की, आभीर देशातील गवळी चंद्रकांतमणी तीन कवड्यांना विकून टाकतात ! जेथे लोहित मणी व पद्मरागमणी यांतील फरक समजत नाही तेथे रत्नाचा वापर कसा करता येणार ? जेव्हा धनी योग्य व अयोग्य सेवकांना सारखेच वागवतो तेव्हा कर्तव्यतत्पर लोकांचा उत्साह नाहीसा होतो. राजा आणि सेवक या दोघांना एकमेकांची जरूरी असते. व त्या दोघांमधील व्यवहार परस्परांवर अवलंबून असतो. किरणाशिवाय सूर्य शोभणार नाही त्याप्रमाणे प्रतापी असूनही लोकांचे मन जाणणाऱ्या सेवकाशिवाय राजा शोभणार नाही. स्वामी व सेवक यांचा संबंध गाडीच्या चाकाचा आरा आणि मध्यभाग यासारखा आहे. या दोघांच्या सहकार्यानेच व्यवहाराचे चाक चालू ठेवता येते. डोक्यावरचे केसही रोज तेल लावले नाही तर रुक्ष व कोरडे होतात ! तर मग स्नेहाशिवाय–मैत्रीशिवाय–सेवक रुक्ष व कोरडे का बरे होणार नाहीत ? राजा प्रसन्न झाला तर सेवकांना फक्त धन देईल; पण केवळ सन्मानाने संतुष्ट झालेला सेवक वेळप्रसंगी राजाकरिता प्राणही देतो ! हे जाणून राजाने कार्यकुशल, कुलीन, शूर, सशक्त आणि भक्ती करणाऱ्या सेवकांना आश्रय द्यावा. जे सेवक राजाचे अवघड कार्य करूनही लज्जेमुळे त्या बाबत गुप्तता पाळतात तेच राजाचे सहाय्यकर्ते असतात. ज्या सेवकावर काम सोपवल्यानंतर राजा निश्चित राहतो तोच खरा सेवक ! तो धन्याच्या पत्नीप्रमाणे विश्वासू असतो !

“ जो सेवक बोलावल्याशिवाय येऊन नेहमी दाराजवळ उभा राहतो आणि विचारल्यानंतर खऱ्या आणि नेमक्या शब्दांत उत्तर देतो तोच राजाचा योग्य सेवक होय ! ”

" राजाचा लायक सेवक कोणता ? तो राजाच्या आज्ञेशिवायच राजाला अनिष्ट असलेल्या वस्तूंचा नाश करण्याचा प्रयत्न करतो. तो राजाने मारले, शिव्या दिल्या, दंड केला तरी राजाविरुद्ध जाण्याचा विचारही करीत नाही. तो राजाकडून मान मिळाला म्हणून गर्व करीत नाही व अपमान झाला म्हणून दुःख करीत नाही आणि आपले मनोगत गुप्त राखतो. भूक, झोप, गारठा किंवा कडक ऊन यांची पर्वा न करता तो राजाची आज्ञा पाळतो. तो पुढे होणाऱ्या युद्धाची बातमी ऐकून प्रसन्न होतो. तो अधिकारावर असताना राज्याच्या सीमा शुक्ल पक्षाच्या चंद्राप्रमाणे वाढतात.

जो सेवक अधिकारावर असताना राज्याच्या सीमा अग्नीत टाकलेल्या कातड्याप्रमाणे दिवसेंदिवस संकोच पावतात त्या सेवकाला राजाने सोडून दिले पाहिजे.

" हा कोल्हा आहे " असे म्हणून माझ्याकडे स्वामी दुर्लक्ष करीत असतील तर ते योग्य नाही. कारण किड्यांपासून, रेशमी वस्त्र मिळते. दगडातूनच सोने निघते. व मातीतूनच दुर्वा मिळतात. कमळ चिखलातून व चंद्र समुद्रातून वर येतो ! निळे कमळ शेणातून उत्पन्न होते ! लाकडातून अग्नी मिळतो. आणि सापाच्या फण्यातून मणी मिळतो व गोपकिड्यापासून गोरोचनचूर्ण मिळते. म्हणून जन्मापेक्षा आपल्या गुणांच्या विकासामुळेच गुणी माणूस प्रसिद्ध होतो. घरात जन्मलेल्या, नुकसान करणाऱ्या उंदरांना मारून टाकणे योग्य. असले हित करणाऱ्या मांजराला दुसरीकडून घरी आणले जाते. एरंड, भेंडी, मंदार (रुई) वगैरे झाडांच्या काठ्या गोळा केल्या तरी त्यामुळे लाकडाचे काम होऊ शकत नाही; त्याप्रमाणेच मूर्ख लोकांच्या जमावामुळे राजाचे काम होत नाही. शक्तीमान असून मूर्ख असला तर त्यापासून काय हित होणार ? तसेच समर्थ असला व आपले अहित करणारा असला तर त्याचे काय काम ! महाराज, मी तुमचा भक्तही आहे आणि शक्तीमान पण आहे. म्हणून आपण माझी अशी अवहेलना करू नका. "

" तू म्हणतोस तसे असेलही ! " पिंगलक म्हणाला " ते सोड. तू समर्थ किंवा असमर्थ असलास तरी मला काय करायचे आहे ? तू माझ्या जुन्या प्रधानाचा मुलगा आहेस तेव्हा जे बोलायचे असेल ते निर्भयपणे बोल. "

" महाराज, मला एक विनंती करायची आहे. "

" मग सांग काय ते ! "

" महाराज, बृहस्पतीने असे सांगितले आहे की, राजाचे लहानसे जरी काम असले तरी ते सभेत सांगू नये. म्हणून महाराजांनी माझी विनंती एकांतात ऐकावी हे बरे ! एखादे रहस्य षट्कर्णी झाले तर ते सगळीकडे पसरतेच ! जे रहस्य चार कानांनाच माहीत आहे तेच स्थिर राहते ! "

दमनकाचे हे बोलणे ऐकून व पिंगलक त्याच्याशी सहमत आहे हे पाहून वाघ, लांडगा, चित्ता वगैरे प्रमुख पशू स्वतःच दूर गेले व उरलेले द्वारपालाने हटविले. नंतर दमनक म्हणाला, " महाराज, आपण पाणी पिण्यासाठी येथे आला असताना पाणी न पिताच येथे येऊन का बरे स्वस्थ बसला आहात ? "

" तसे विशेष काही नाही. सहजच ! " पिंगलक किंचित कोरडे हसून म्हणाला.

दमनक पुन: म्हणाला, " जर काहीं गुप्त रहस्य असेल तर राहू द्या. म्हणतातच ना की, काही गोष्टी पत्नीपासून लपवाव्यात, काही आप्तांपासून गुप्त ठेवाव्यात, काही गोष्टी मित्रांपासून लपवाव्यात, व काही गोष्टी मुलांनाही सांगू नयेत. मोठ्या माणसांनी आग्रह केला तरी विद्वानाने योग्य काय व अयोग्य काय याचा विचार करूनच बोलावे ! "

हे ऐकून पिंगलक मनात म्हणाला, " हा लायक दिसतो. याच्याजवळ मनातील गोष्ट सांगायला हरकत नाही. कारण आपल्यावर प्रेम करणारा मित्र, अनुकूल वागणारी पत्नी आणि प्रेमाने वागणारा धनी यांना दुःख सांगितले तर ते कमी होते. " असा विचार करून पिंगलक म्हणाला, " अरे दमनका, दुरून येणारा एक घनगंभीर आवाज तुला ऐकू येत आहे काय ? "

" होय महाराज, ऐकत आहे. पण त्याचे काय ? "

" मी हे वन सोडून दुसऱ्या वनात जाण्याचा विचार करीत आहे. "

" का बरे ? "

"या वनात कोणीतरी अद्‌भुत प्राणी आला आहे! त्याचाच हा गंभीर आवाज ऐकू येत आहे. या आवाजाप्रमाणेच तो प्राणीही भयंकर असणार आणि त्या प्रमाणेच तो पराक्रमी असणार असे वाटते."

यावर दमनकाने उत्तर दिले, "पण स्वामी! केवळ आवाज ऐकून आपण भीती बाळगणे योग्य नाही. पाण्याच्या लोंढ्यामुळे पूल वाहून जातात आणि गुप्त रहस्य राखले नाही तर नाहीसे होते. दुष्टपणामुळे मैत्री तुटते आणि चतुर व्यक्ती घाबरून आपले साहस सोडून देते. म्हणून वंशपरंपरेने प्राप्त झालेले हे वन एकाएकी सोडून देणे योग्य होणार नाही. आवाज भेरी, बासरी, वीणा, मृदंग, टाळ्या, शंख, वगैरे अनेक वाद्यामुळेही होत असतात. व त्यांचे अनेक प्रकार असतात. म्हणून नुसत्या आवाजाला घाबरता कामा नये.

"बलवान आणि भयंकर शत्रूचे आक्रमण झाले तरी ज्या राजाचा धीर सुटत नाही त्याचा कधीच पराभव होत नाही. प्रत्यक्ष विधात्याने भय दाखवले तरी धैर्यवान घाबरत नाहीत! ग्रीष्म ऋतूत नद्या व तलाव आटतात; पण सागर मात्र नेहमीच भरलेला असतो."

संकटात दुःख न मानणारा, चलतीच्या काळात आनंद न मानणारा, आणि रणात भित्रेपणा न दाखवणारा असा त्रैलोक्यास ललामभूत होणारा मुलगा क्वचितच् आईच्या पोटी जन्माला येतो! शक्ती नसल्यामुळे नम्र आणि निःसत्त्व असल्यामुळे सन्मान नसलेले प्राणी गवतासारखेच क्षुल्लक असतात. शत्रूच्या प्रतापापुढे जो टिकत नाही, तो अग्नीत धरलेल्या लाखेच्या दागिन्याप्रमाणे असतो. अशाचा काय उपयोग? तेव्हा हे सर्व लक्षात ठेवून महाराज, आपण धीर धरा आणि आवाजाला घाबरू नका!

"एकदा एक कोल्हा म्हणाला, "ते पाहून मला प्रथम वाटले की, हे सर्व मांसाने भरलेले आहे. पण जेव्हा आत प्रवेश करून पाहिले तेव्हा तेथे फक्त कातडी आणि लाकूड होते!"

पिंगलकाने विचारले, "हे कसे काय?"

"ऐक तर" दमनक म्हणाला.

## कथा दुसरी

# कोल्हा आणि नगारा

एकदा एक गोमायू नावाचा कोल्हा भुकेने व्याकुळ होऊन अन्नासाठी फिरत फिरत एका समरभूमीवर पोहचला. तेथे एक नगारा पडला होता. त्या नगाऱ्यावर वेलींच्या फांद्या वाऱ्यामुळे आपटत होत्या व त्यांचा मोठा आवाज येत होता.

तो आवाज ऐकून कोल्हा घाबरला आणि मनात म्हणाला, "आता मी मेलोच ! हा कुणाचा आवाज आहे ? त्याच्या नजरेत पडत नाही तोपर्यंत येथून पळून जावे ! पण अशा प्रकारे घाबरून पळून जाणे योग्य नव्हे. कारण भीती वाटली असता, किंवा आनंद झाला असता गडबड न करता शांतपणे विचार करून जो काम करतो त्याला पश्चात्ताप करावा लागत नाही ! म्हणून हा आवाज कोठून येत आहे, त्याचा मी शोध घेईन."

अशा प्रकारे धीर करून तो हळू हळू पुढे गेला. तेव्हा त्याला तो नगारा दिसला. तो त्या नगाऱ्याजवळ गेला आणि त्याने कुतूहलाने तो वाजवून पाहिला. नंतर प्रसन्न होऊन तो विचार करू लागला. "वाहवा ! खूप दिवसानंतर ही मला आता मेजवानी मिळाली आहे ! हा मांस व रक्त ह्यांनी पूर्णपणे भरलेला असणार !"

नंतर त्याने नगाऱ्यावर बसवलेले कठीण कातडे खूप मेहनतीनंतर फाडले. व भोक पाडून तो आत शिरला. कातडे फाडताना त्याचे काही दातही तुटले होते. आत घुसून पाहतो तो तेथे नुसते लाकूड होते ! निराश होऊन तो म्हणू लागला की, 'मला वाटले हे मांसाने भरलेले असणार पण आत पाहतो तो कातडे आणि लाकूड !'

म्हणून मी म्हणतो की, केवळ आवाजालाच भिऊ नये."

पिंगलक म्हणाला, "अरे, माझा हा संपूर्ण परिवारच घाबरला आहे आणि पळून जायची इच्छा करीत आहे! तेव्हा मी एकटाच धीर धरून येथे कसा राहू शकेन?"

दमनक म्हणाला, "स्वामी, हा तुमच्या अनुयायांचा दोष नाही. सेवक हे धन्यासारखेच असायचे. म्हणतातच ना की, घोडा, शस्त्र, शास्त्र, वीणा, वाणी आणि स्त्री हे सगळे ज्या पुरुषाच्या आश्रयाला असतील त्याच्या गुणाप्रमाणेच योग्य किंवा अयोग्य ठरतात. आता आपण थोडे धैर्य दाखवून येथेच थांबा. हा आवाज कशाचा आहे ह्याचे खरे कारण मी शोधून येतो. त्यानंतर तुम्हांला जे योग्य वाटेल ते तुम्ही ठरवा."

"काय? तू त्या आवाजाकडे जाऊ इच्छितोस?" पिंगलकाने विचारले.

दमनक म्हणाला, "स्वामींनी आज्ञा दिल्यावर योग्य आणि अयोग्य याचा विचार कशाला हवा? स्वामीची आज्ञा झाल्यावर खरा सेवक भीती न बाळगता सापाच्या तोंडात शिरेल किंवा दुस्तर समुद्रात उडी मारेल! स्वामीची आज्ञा मिळाल्यावरही जो सेवक काम सोपे आहे का कठीण आहे ह्याचा विचार करीत बसेल, तो स्वामीच्या सेवेसाठी योग्य नसतो. वैभव इच्छिणाऱ्या राजांनी अशा सेवकांना जवळ करू नये."

तेव्हा पिंगलक म्हणाला, "असे आहे, तर मग जा. तुझा मार्ग मंगलकारक होवो!"

दमनकाने पिंगलकाला नमस्कार केला आणि तो संजीवकाच्या आवाजाकडे निघाला.

तो जातो नाही तोच पिंगलक भयग्रस्त झाला आणि व्याकूळ होऊन मनाशी म्हणाला, "मी दमनकावर विश्वास ठेवून माझ्या मनातील विचार त्याला सांगितले, हे मी फार वाईट केले! कदाचित् हा दोन्हीकडून संधान बांधत असेल! त्याला मंत्रीपदावरून काढल्यामुळे तो माझ्या विरुद्धही विचार करीत असेल.

"म्हणतातच की, ज्या सेवकाचा पहिल्यांदा सन्मान केला आणि नंतर त्याचा अपमान केला तर तो नेहमीच राजाचा नाश करण्याचा प्रयत्न करतो.

"तेव्हा याची आतली इच्छा काय आहे, हे समजण्यासाठी मी येथून उठून दुसरीकडे जाऊन बसतो. कदाचित् त्या शत्रूला बरोबर घेऊन मला ठार करण्यासाठी तो येथे येईल. सावध राहिलेल्या निर्बलाला बलवान शत्रू मारू शकत नाही. परंतु विश्वास टाकून गैरसावध राहिलेल्या बलवानाचा निर्बल शत्रूही घात करू शकतो! ज्याला सुख, समृद्धी व दीर्घायुष्य हवे असेल त्याने बृहस्पतीचाही विश्वास धरू नये. शपथपूर्वक तह केलेल्या शत्रूवर कधीही विश्वास ठेवू नये. कारण राज्याच्या लोभात पडलेल्या वृत्रासुराला इंद्राने शपथपूर्वक विश्वास उत्पन्न करूनच मारले! विश्वास संपादनच करूनच त्याने दितीच्या गर्भाचा नाश केला. म्हणून विश्वास ठेवला नाही तर देवताही आपल्या शत्रूला पराभूत करू शकत नाहीत."

असा मनात विचार करून तो दुसऱ्या एका जागेवर जाऊन, दमनक परत येण्याची वाट पाहू लागला.

इकडे दमनक संजीवकाच्या जवळ गेला, तेव्हा तो बैल आहे हे त्याला समजले. तो प्रसन्न होऊन मनात विचार करू लागला–"हे उत्तमच झाले. ह्या बैलाबरोबर सिंहाची मैत्री करून दिली किंवा, त्यांच्यात भांडण लावून दिले तर पिंगलक मला नेहमी वश राहील. कारण, राजे मंत्र्यांचा सल्ला ऐकतात तो कुलीनपणामुळे नव्हे आणि मैत्रीमुळे नव्हे. संकटाचे किंवा दुःखाचे प्रसंग आले तरच मंत्र्यांना संकटात सापडलेला राजा फायद्याचा ठरतो! म्हणून राजा सतत संकटात असावा अशी मंत्र्याची इच्छा असते! निरोगी माणसाला वैद्याची काय जरूर? त्या प्रमाणे संकटे नसतील तर राजा मंत्र्याची पर्वा कशाला करील?" असा विचार करीत दमनक पिंगलकाकडे परत आला.

त्याला येताना पाहून पिंगलकाने आपले मनोगत लपवून, पूर्वीप्रमाणेच मंडळ करून त्यात बसला. दमनकाने पिंगलकाला नमस्कार केला आणि तो बसला. पिंगलकाने विचारले, "काय, पाहिलेस का त्या प्राण्याला?"

"स्वामीच्या कृपेमुळे पाहून आलो"

"खरेच?"

म. ग्र. स.

"महाराजांच्या समोर मी खोटे बोलेन काय ?" दमनक म्हणाला, "जो राजासमोर आणि देवासमोर खोटे बोलतो तो कितीही मोठा असला तरी ताबडतोब नष्ट होऊन जातो. राजा हा देवाचाच अंश असतो, असे मनूने सांगितले आहे. म्हणून राजाला देवासारखेच मानले पाहिजे, व त्याच्यासमोर खरे सांगितले पाहिजे. देवाचा अंश असला तरी राजा आणि देव यांत एक फरक आहे. राजाबरोबर केलेल्या व्यवहाराचे शुभ किंवा अशुभ फळ याच जन्मी भोगावे लागते ! आणि देवाचे पुढच्या जन्मी !"

"तू त्याला खरोखरच पाहून आलेला दिसतोस !" पिंगलक म्हणाला; "त्याने तुला मारले नाही कारण समर्थ लोक दीनांवर राग धरीत नाहीत. मोठ्या झाडांना उपटून फेकणारा झंझावात वाकलेल्या नम्र गवताला उपटून टाकत नाही. शक्तीसंपन्नांचा हा स्वभावच आहे. ते आपला पराक्रम बलवानांनाच दाखवतात. शक्तीसंपन्न हत्तीच्या गंडस्थळावर मदाच्या वासाने भुंगे बसतात. व पायांनी त्यावर प्रहार करतात; तरीही हत्ती त्यांच्यावर रागावत नाही."

दमनक म्हणाला, "ते ठीक आहे. तो शक्तीमान आहे. आणि मी दीन आहे. तरीही आज्ञा केली तर मी त्याला येथे सेवक म्हणून सेवेत हजर करीन."

एक दीर्घश्वास घेत पिंगलकाने विचारले, "काय ? तू हे करू शकतोस ?"

"बुद्धीमंताना काय अवघड आहे ? जी गोष्ट शस्त्रांनी, हत्तींनी सैन्यदलामुळे साध्य होत नाही ती बुद्धीच्या योगाने साधता येते."

"असे असेल तर मी आज तुला मंत्रीपदावर नेमले आहे आजपासून कोणावर प्रसाद करावयाचा व कोणाला शिक्षा करावयाची हे तू ठरवायचेस."

नंतर दमनक संजीवकाकडे धावतच गेला. आणि त्याच्यावर ओरडून म्हणाला, "अरे, दुष्ट बैला ! इकडे ये. तुला पिंगलक महाराज बोलावत आहेत. येथे निःशंक होऊन एकसारख्या डरकाळ्या का फोडीत आहेस ?"

"मित्रा हा पिंगलक कोण आहे ?" संजीवकाने विचारले.

"काय ? तू पिंगलक महाराजांना ओळखत नाहीस ? ठीक आहे. क्षणभर थांब, तुला धडा मिळेल म्हणजे ओळखशील ! येथे जवळच वडाच्या झाडाखाली सर्व प्राण्यांच्या मंडळामध्ये पिंगलक सिंह बसला आहे. व तो या वनाचा राजा आहे!"

दमनकाचे हे बोलणे ऐकून 'आता आपले आयुष्य संपले !' असे मानून संजीवक फार दुःखी झाला आणि म्हणाला, "मित्रा ! तू उदार, सज्जन आणि बोलण्यात चतुर दिसतोस ! तू मला महाराजांच्याकडे घेऊन जाणारच. तर मला ते अभय देतील असे काहीतरी कर."

"तू म्हणतोस ते योग्य आहे व नीतीप्रमाणेच आहे." दमनक म्हणाला, "पृथ्वी, समुद्र, आणि पर्वत, यांचा अंत शोधून काढता येईल, परंतु राजाच्या मनाचा अंत आजपर्यंत कोणालाही लागला नाही ! तू आता येथेच थांब. मी तिथे जातो आणि काळवेळ पाहून तुला घेऊन जाईन."

नंतर दमनक पिंगलकाकडे गेला व म्हणाला, "स्वामी ! तो काही सामान्य प्राणी नाही. तो भगवान् श्रीशंकराचे वाहन असलेला नंदी आहे ! मी विचारल्यावर तो म्हणाला, "भगवान शंकराने प्रसन्न होऊन यमुनेच्या काठावरील कोवळे गवत खाण्याची मला आज्ञा केली आहे. जास्त काय सांगू ? श्रीशंकराने मला हे सर्व वन विहार करण्यासाठी दिले आहे!"

पिंगलक घाबरून म्हणाला, "खरे काय ते आता मला कळले ! परमेश्वराची कृपा असल्याशिवाय एक सामान्य गवत खाऊन राहणारा प्राणी या अशा अरण्यात निर्भय मनाने डरकाळ्या फोडीत फिरू शकणार नाही. असो, मग तू त्याला काय म्हणालास ?"

दमनक म्हणाला, "स्वामी, मी त्याला सांगितले की, हे वन चंडिका देवीचे वाहन असलेले आमचे स्वामी पिंगलक सिंह यांचे आहे ! तू त्यांचा पाहुणा आहेस. तेव्हा तू कृपा करून त्यांच्याकडे चल. आणि एकाच ठिकाणी भोजन, जलपान आणि विहार करून आनंदात काळ घालव." त्यानेही हे आनंदाने मान्य केले. व म्हणाला, 'मला तेथे घेऊन जा. व महाराजांकडून अभयदान मिळवून दे.' तेव्हा काय करायचे हे महाराजांनी ठरवावे."

"वाहवा ! दमनका, शाबास ! तू खरा मंत्री शोभतोस !" पिंगलक म्हणाला, "अगदी माझ्या अंतःकरणातील गोष्ट जाणून त्याप्रमाणेच

बोललास. मी माझ्याकडून त्याला अभयदान दिले आहे. पण माझ्यातर्फे-ही त्याच्याकडे अभयदान माग. आणि त्याला लवकर इकडे घेऊन ये. म्हणतातच ना की, आतून बळकट, भोक नसलेले व नीट परीक्षा केलेले खांब मंदिर तोलून धरतात, त्याप्रमाणेच बुद्धीमान, खंबीर आणि सरळ स्वभावाचे मंत्री राज्य तोलून धरतात, आजारपणात वैद्याची परीक्षा होते, आणि संकटे आली असताना मंत्र्यांची परीक्षा होते. एरवी स्थिरस्थावर व स्वास्थ्य असताना कोण शहाणा नसतो ?"

दमनकही त्याला नमस्कार करून संजीवकाकडे निघाला. रस्त्यात तो आनंदाने विचार करू लागला, " स्वामी माझ्यावर प्रसन्न झाला आहे. तो आता माझ्या म्हणण्याप्रमाणे वागेल. मी किती बरे भाग्यवान ! म्हणतातच ना की, थंडीच्या दिवसात अग्नी, प्रिय माणसाची भेट, उत्तम खिरीचे जेवण, आणि राजाने केलेला सन्मान, म्हणजे अमृत आहे ! "

संजीवकाकडे पोहोचल्यावर तो प्रेमाने म्हणाला, " मित्रा, मी तुझ्यासाठी आमच्या स्वामीकडून अभयदान मिळविले आहे. आता तू निर्भयपणे चल. परंतु राजप्रसाद मिळाल्यानंतर माझ्या सल्ल्यानेच वाग. गर्वाने वाटेल तसा वागू नको. मीही तुझ्या मदतीने मंत्रीपदाच्या आधाराने राज्याचा भार सांभाळीन. म्हणजे आपण दोघेही राज्यलक्ष्मीचा उपभोग घेऊ शकू. म्हणतातच ना की, शिकारीच्या नियमाप्रमाणे वागले तर राजवैभव मिळते. एकाने रान उठवावे व दुसऱ्याने पशूंची शिकार करावी, त्याप्रमाणे एकाने राजाला दानधर्म, बक्षिसे द्यायला प्रवृत्त करावे आणि दुसऱ्याने राजाकडून ते सर्व मिळवावे ! शिवाय जो गर्वामुळे उत्तम, मध्यम आणि अधम या तिन्ही प्रकारच्या सेवकांचा सन्मान करीत नाही तो राजाचा आवडता असला तरी दंतिलाप्रमाणे भ्रष्ट होतो."

" हा दंतिल कोण बुवा ?" संजीवक म्हणाला.

" ऐक तर, " दमनक म्हणाला.

# कथा तिसरी

## नगरशेट आणि हुजऱ्या.

ह्या पृथ्वीवर वर्धमान नावाचे नगर आहे. तेथे अनेक प्रकारचा व्यापार करणारा दंतिल नावाचा नगरशेट राहत होता. तो लोकांची आणि राजांची कामे करीत असे. त्यामुळे त्याने राजाला आणि नगरातील लोकांना खूष ठेवले होते. जास्त काय सांगावे ? त्या नगरात त्याच्यासारखा चतुर माणूस दुसरा कोणीही दिसत नव्हता. किंवा म्हणतातच ना—राजाचे हित करणाऱ्याचा लोक द्वेष करतात व जनतेचे हित करणाऱ्याला राजा दूर ठेवतो. असा परस्पर विरोध असताना राजा आणि जनता यांचे समान हित करणारा कार्यकर्ता विरळच असतो !

काही काळानंतर दंतिलाच्या घरी मुलीचे लग्न निघाले. त्याने सर्व नागरिकांना व राजसेवकांना सन्मानपूर्वक आमंत्रण दिले. आणि भोजन व कापड देऊन सर्वांचा सत्कार केला. नंतर राजाला अंत:पुरातील सर्व लोकांसह आपल्या घरी बोलावून त्या सर्वांचा त्याने सत्कार केला.

राजवाड्यावर झाडलोट करणारा गोरम्भ नावाचा एक हुजऱ्या राजसेवकाबरोबर आला होता. तो भलत्याच जागी बसल्यामुळे त्याची मानगूट पकडून त्याला दंतिलाने दुसरीकडे हाकलले होते ! या अपमानामुळे तो दीर्घ नि:श्वास टाकत बसे आणि त्याला रात्रभर झोप लागत नसे. त्या नगरशेटावर राजाची अवकृपा व्हावी म्हणून काय बरे करावे ? असा तो विचार करीत बसे.

शेवटी तो मनाशी म्हणाला, " चिंतेत शरीर सुकवून काय मिळणार ? मला त्याचे काहीही वाकडे करता येणार नाही ! म्हणतातच ना—कढईत टाकलेले हरबरे कितीही जोराने उडाले तरी त्यामुळे कढई फुटू शकेल

काय ? त्याप्रमाणे जो सूड घेऊ शकत नाही तो निर्लज्ज व निर्बल कितीही रागावला तरी त्याचा काय उपयोग ? ”

काही दिवसांनी सकाळी राजा अर्धवट झोपेत पलंगावर झोपला असता गोरम्भ तेथे झाडू मारत होता. तेव्हा तो म्हणाला, “ राणीला आलिंगन देण्यापर्यंत या धीट दंतिलाची मजल जावी ना ! ”

हे ऐकून राजा गडबडून उठला आणि त्याला म्हणाला, “ अरे, अरे, गोरम्भा, तू जे वडबडतो आहेस, ते खरे आहे काय ? ”

“ देव, रात्री द्यूत खेळून जागरण झाल्यामुळे मी पेंगतच होतो. तेव्हा मी काय बडबडलो कोणास ठाऊक ! ” तो म्हणाला.

तेव्हा राजा मत्सराने मनात म्हणाला, “ हा जसा माझ्या प्रासादातील अंत:पुरात सगळीकडे प्रवेश करू शकतो त्याचप्रमाणे दंतिलही सगळीकडे मुक्तपणे जातो. कदाचित् याने दंतिलाला राणीला आलिंगन देताना पाहिले असेल म्हणूनच तो असे वडबडत आहे ! म्हणतातच ना की— मनुष्य जागेपणी जे पाहतो किंवा करतो तेच तो त्या सवयीमुळे स्वप्नात बोलतो. हृदयात जे शुभ किंवा अशुभ गुप्त विचार असतात तेच लोक स्वप्नात बोलून दाखवितात.

“ किंवा स्त्रियांच्या बाबतीत संशय कशाला हवा ? कारण ती एकाबरोबर बोलते, दुसऱ्याकडे प्रेमळ कटाक्ष टाकून पाहते आणि तिच्या मनात भरलेली प्रिय व्यक्ती तिसरीच असते ! आपल्या गुलाबी ओठांनी स्मितहास्य करणारी स्त्री एखाद्यावरोबर खूप प्रेमळ गोष्टी करते तर दुसऱ्या पुरुषाकडे उमललेल्या कमळाप्रमाणे असलेल्या आपल्या चमकदार डोळ्यांनी पाहते, आणि त्याचवेळी यशस्वी व रूपवान अशा तिसऱ्या पुरुषाचे मनात चिंतन करीत असते ! म्हणून या सुंदर स्त्रियांचे खरे प्रेम कोणावर आहे हे समजणे कठीण आहे ! अग्नीला कितीही इंधन द्या, समुद्रात कितीही नद्या जावोत, आणि यमराज कितीही जणांचे प्राण घेवोत या तिघांची कधीच तृप्ती होत नाही. त्याप्रमाणेच स्त्रियांना पुरुष कधीच पुरे पडत नाहीत. स्त्रियांचे चारित्र्य सुरक्षित राहते, कारण त्यांना एकांत मिळत नाही, योग्य वेळ मिळत नाही व प्रार्थना करणारा पुरुष मिळत नाही म्हणूनच ! ही कामिनी माझ्यावर भाळली आहे असे जो मूर्ख समजतो

त्याला या स्त्रिया, वश करून पाळलेल्या पक्ष्याप्रमाणे खेळवतात. जो मनुष्य स्त्रियांची लहानमोठी कामे करतो त्याला या जगात कमीपणा येतो. स्त्रियाही जो आपल्या मागे मागे फिरतो आणि आपली सेवा करतो त्याच्यावरच खूष होतात ! स्त्रिया स्वभावानेच संयम न पाळणाऱ्या असतात. भोवतालच्या लोकांचे भय वाटते म्हणून किंवा लंपट पुरुष भेटत नाही म्हणूनच त्या मर्यादशील राहिलेल्या असतात ! स्त्रियांना सर्व पुरुष सारखेच ! कुरूप किंवा रूपवान, म्हातारा किंवा तरुण असा फरक न करता कोणत्याही पुरुषाचा त्या उपभोग घेऊ शकतात ! त्यांच्यावर भाळणाऱ्या पुरुषाला त्या नितंबावर घासणाऱ्या लाल साडीसारखा वापरतात ! ज्याप्रमाणे स्त्रिया आपल्या पायाला लाक्षारस चोळतात त्याप्रमाणे आपल्यावर भाळलेल्या पुरुषालाही त्या आपल्या पायातच लोळायला लावतात."

असे बरेच दुःख करून राजाने दंतिलाला प्रासादात येण्याची बंदी केली. त्याला प्रासादाच्या द्वारावरूनच परतवण्यात आले. एकाएकी राजाचा आपल्यावर असा कोप का झाला म्हणून दंतिल मनात विचार करू लागला.

"ऐश्वर्य मिळाल्यानंतर कोणाला गर्व चढत नाही ? विषयी माणसाची संकटे कधीतरी संपतात का ? ज्यांची मने स्त्रियांनी नाराज केली नाहीत असा या जगात कोण आहे ? राजाला नेहमी प्रिय राहणारा असा कोणी-तरी आहे का ? यमाच्या दृष्टीपासून कोण वाचला आहे ? कोणत्या याच-काला मोठेपण मिळाले आहे ? आणि दुष्टांच्या जाळ्यातून सुटून कोण सुखरूप परत येऊ शकेल ? कावळ्यापासून स्वच्छतेची, जुगाऱ्याकडून सत्याची, सर्पाकडून क्षमेची, षंढाकडून धैर्याची, स्त्रीकडून कामशांतीची किंवा दारुड्याकडून तत्त्वचर्चेची व राजाकडून निष्कपट मैत्री भावनेची कोणी अपेक्षा केली आहे काय ? किंवा पाहिले किंवा ऐकले आहे काय ?"

"मी या राजाचे किंवा त्याच्या प्रिय व्यक्तीचे स्वप्नातसुद्धा अनिष्ट केले नाही तरी माझ्यावर राजा अप्रसन्न का झाला आहे ?"

अशा प्रकारे तो दंतिल राजाच्या द्वारावर अडवला गेला असता, झाडू मारणारा गोरम्भ द्वारपालांना हसत म्हणाला, "अरे द्वारपालांनो, सावध राहा ! हा दंतिल महाराजांचा विशेष आवडता आहे. व त्याला राजाच्या

चतीने बक्षीस किंवा दंड देण्याचा अधिकार आहे. त्याला अडवाल तर त्याने मला असा अर्धचंद्र देऊन हाकलले त्याप्रमाणे तुम्हालाही अर्धचंद्र मिळेल !"

गोरम्भाची ही बडबड ऐकून दंतिल मनात म्हणाला, ही सर्व गोरम्भाचीच चालबाजी दिसते ! म्हटलेच आहे की, राजसेवक अकुलीन आणि मूर्ख असला व राजाने त्याचा अपमान केला असला तरी लोकात त्याला मान असतो. तो भित्रा आणि क्षुद्र असला तरी लोक त्याचा पराभव करू शकत नाहीत.

अशा तऱ्हेने नानाप्रकारे दुःख करीत व खिन्न मनाने तो घरी परत आला. रात्रीच्या पहिल्या प्रहरी त्याने गोरम्भाला बोलावले आणि त्याला धोतर व उपरणे देऊन त्याचा सत्कार केला. आणि तो त्याला म्हणाला, "भल्या माणसा ! मागे तू ब्राह्मणांच्या आधीच उच्च स्थानावर बसला होतास, म्हणून तुझा अपमान झाला. तुझ्यावर रागावून मी तुला बाजूला केले नव्हते तेव्हा मला क्षमा कर."

दोन वस्त्रे मिळाल्यामुळे गोरम्भाला स्वर्गाचे राज्यच मिळाल्यासारखे वाटले ! तो संतोषाने म्हणाला, "शेटजी, मला क्षमा करा. तुम्ही माझा सन्मान केला आहे तेव्हा माझ्या बुद्धीचा प्रभाव पाहा ! आणि राजप्रसादही मिळवा " असे म्हणून तो आनंदाने निघून गेला. म्हणतातच की, तराजूच्या दांडीप्रमाणे दुष्ट लोक थोडक्यांतच वर जातात किंवा खाली येतात !

दुसऱ्या दिवशी राजा अर्धवट झोपेत असतांना गोरम्भ राजवाड्यात जवळच झाडू मारत होता. तेव्हा तो म्हणाला. "आमचे महाराज शौचास गेले असता काकड्या खातात. ! काय हा अविवेक !"

हे ऐकून राजा आश्चर्याने म्हणाला, "अरे गोरम्भा, हे काय बडबडतोस! मी असे करताना तू कधी पाहिले आहेस काय ? तू घरातला नोकर आहेस म्हणून बरे ! नाहीतर तुला मारूनच टाकले असते !"

तो म्हणाला, "देव, जुगाराच्या नादामुळे रात्री मला जागरण झाले. त्यामुळे झाडू मारतानाही मला झोप येत आहे. त्या अवस्थेत मी काय बोललो कुणास ठाऊक ? म्हणून महाराज, माझ्यावर कृपा करा."

हे ऐकून राजाने मनात विचार केला. "शौचास गेलो असता या जन्मात आजपर्यंत मी कधी काकडी खाल्ली नाही. अशा असंभाव्य गोष्टी माझ्या

बाबतीत हा मूर्ख बोलतो. तसेच दंतिलाबद्दलही हा बोलला असावा. त्या बिचाऱ्याचा मी अपमान केला हे चांगले झाले नाही. तो सज्जन मनुष्य असे वाईट कृत्य करील असे वाटत नाही. तो नसल्यामुळे राजकारभारांत आणि नगरकार्यात ढिलेपणा आला आहे."

अशा प्रकारे मनात विचार करून राजाने दंतिलाला बोलावले. व स्वत:च्या अंगावरची वस्त्रे त्याला देऊन त्याला पुन्हा पूर्वीच्या अधिकारावर नेमले.

म्हणून मी म्हणतो की, उत्तम, मध्यम व अधम राजसेवकांना नेहमी मान दिला पहिजे."

संजीवक म्हणाला, "असे असेल तर तू जसे म्हणतोस तसेच मी करीन."

नंतर दमनक त्याला घेऊन पिंगलकाकडे गेला. आणि म्हणाला, "देव, मी संजीवकाला आपल्या सेवेत हजर केला आहे. आता आपण सांगाल तसे करू."

संजीवकाने पिंगलकाला आदराने नमस्कार केला. आणि तो त्याच्यासमोर नम्रपणे उभा राहिला. पिंगलकाने त्याच्या वशिंडावर आपला उजवा पंजा ठेवला आणि तो त्याचा सन्मान करून म्हणाला, "तुझे क्षेम आहेना? ह्या निर्जन वनात तू कोठून आलास?"

वर्धमानक त्याला सोडून गेल्याची हकीगत संजीवकाने सांगितली. ती ऐकून पिंगलक जास्तच आदरपूर्वक म्हणाला, "मित्रा, भिऊ नकोस! माझ्या बाहुबळाच्या संरक्षणात या वनामध्ये निर्भयपणे व तुझ्या मनाप्रमाणे राहा. एक मात्र लक्षात ठेव, नेहमी माझ्याजवळ राहत जा. कारण या वनात क्रूर आणि भयंकर पशू असल्यामुळे शक्तीशाली प्राण्यांनाही येथे राहणे कठीण जाते. तर तुझ्यासारख्या गवतखाऊचा काय पाड?"

असे म्हणून सर्व प्राण्यांच्या परिवारासह तो यमुनातीरावर गेला आणि पाणी पिऊन पुन्हा आपल्या वनात गेला. त्याने सर्व राज्यभार करटक आणि दमनकावर सोपवला आणि तो संजीवकाबरोबर सुभाषिते सांगत व गोष्टी करीत राहू लागला. म्हटलेच आहे, सज्जनांची संगत जरी अकस्मात झाली, तरी ती कायम व जन्मभर टिकते. ती पुन्हा पुन्हा दृढ करावी लागत नाही.

अनेक शास्त्रांचा सखोल अभ्यास केल्यामुळे संजीवकाची बुद्धी प्रगल्भ झाली होती. त्यामुळे त्याने थोड्याच दिवसात मूर्ख पिंगलकाला शिकवून इतके बुद्धीमान केले की, तो हिंसेचा अरण्यधर्म विसरून गेला. आणि दयाबुद्धी शिकवणारा ग्रामधर्म त्याच्या मनात ठसला. फार काय सांगावे! तो दररोज संजीवकाबरोबर एकांतात गप्पागोष्टी करीत बसे त्यावेळी बाकीचे सर्व प्राणी दूर थांबत असत. करटक आणि दमनक यांनाही तेथे प्रवेश मिळेना! शिवाय सिंहाने पराक्रम करणे सोडून दिले त्यामुळे सर्व प्राणी आणि ते दोन कोल्हे भुकेच्या रोगाने त्रासून एका कोपऱ्यात गप्प बसून राहिले.

म्हटलेच आहे की, वठत चाललेल्या झाडाचा त्याग करून पक्षी दुसरीकडे जातात, त्याप्रमाणे उचित मोबदला न देणाऱ्या राजाला त्याचे सेवक सोडून दुसरीकडे जातात. मग तो राजा उच्च कुलातील आणि उत्तम असला तरी त्याची पर्वा करीत नाहीत. राजाने सेवकांचा खूप सन्मान केला; पण वेतन दिले नाही तर कुलीन आणि राजभक्त सेवकही त्याला सोडून जातात. जो राजा आपल्या सेवकांना वेतन देण्यात उशीर करीत नाही, तो सेवकावर डाफरला व रागावला तरी त्याला सेवक सोडत नाहीत.

आपल्या जीविकेसाठी फक्त सेवकच असे वागतात असे नाही. या संपूर्ण जगातील सर्वचजण साम, दाम, दंड वगैरे उपायाने एकमेकांना गिळंकृत करू पाहतात उदाहरणार्थ, राजा प्रजेकडून उपजीविका मिळवितो त्याचप्रमाणे वैद्य रोग्याकडून, वाणी गिऱ्हाईकाकडून, पंडित मूर्खांकडून, चोर निष्काळजी लोकांकडून, भिक्षुक गृहस्थाकडून, वेश्या कामातूर लोकांकडून, कलाकार सर्व लोकाकडून आपला स्वार्थ साधून उपजीविका प्राप्त करून घेतात व आपले पाश सज्ज करून रात्रंदिवस वाट पाहत बसतात! ज्याप्रमाणे मोठे मासे लहान माशांनाच खातात त्याप्रमाणेच हे आहे. किंवा म्हटलेच आहे की सर्पांचे, दुर्जनांचे, आणि दुसऱ्यांचे धन लूटणाऱ्यांचे सर्वच बेत तडीस जात नाहीत! म्हणून तर हे जग चालले आहे!

भूक लागल्यावर श्रीशंकराच्या गळ्यातील साप गणपतीच्या उंदराला खाऊ इच्छितो! आणि कार्तिकेयाचा मोर त्या सापाला खाऊ इच्छितो! आणि माता गिरिजेचे वाहन सिंह त्या मोराला खाण्याची इच्छा करतो!

खुद्द शंकराच्या परिवाराची ही स्थिती आहे. तिथे इतरांबद्दल काय बोलावे ? या विश्वाचे स्वरूपच असे आहे !

करटक आणि दमनक भुकेने व्याकुळ झाले. त्यांचा स्वामी पिंगलक याची मर्जी आता त्यांच्यावर राहिली नव्हती. तेव्हा ते आपसात विचार करू लागले. दमनक म्हणाला, " आर्या करटका, आपले प्रधानपद तर आता गेलेच ! हा पिंगलक संजीवकाच्या बोलण्यावर भाळून स्वतःची कर्तव्येही करीत नाही. सर्व परिवारसुद्धा निघून गेला ! आता काय बरे करावे ?"

करटक म्हणाला, " तुझा सल्ला ते ऐकणार नसले तरीही आपल्यावर दोष येऊ नये म्हणून स्वामीला तथ्य सांगितले पाहिजे. ज्या प्रमाणे विदुराने धृतराष्ट्राला उपदेश केला त्याप्रमाणे आपल्यावर दोष येऊ नये म्हणून राजा ऐकत नसला तरी मंत्र्याने त्याला बोध करावाच ! राजा किंवा हत्ती मदोन्मत्त होऊन भलत्याच रस्त्याला लागले तर त्याबद्दल मंत्री आणि माहूत यांचीच निंदा होते ! तू गवतखाऊ संजीवकाला स्वामीजवळ आणलेस आणि स्वतःच्या हाताने निखारे घेऊन आलास !"

" खरे आहे गड्या ! हा माझाच दोष आहे ! स्वामीचा नाही. म्हणतातच की, " मेंढ्यांच्या टकरीमध्ये कोल्हा फुकट मेला ! आम्ही आषाढभूतीच्या बाबतीत नष्ट झालो ! आणि दूतिका विणकरामुळे नष्ट झाली ! पण हे तिघे स्वतःच्या दोषामुळे नाश पावले."

" हे काय आहे बुवा ?" करटक म्हणाला.

दमनक म्हणाला, " ऐक तर."

## कथा चौथी

# आषाढभूती कोल्हा आणि दूती

एका निर्जन स्थानी एक मठ होता. तेथे देवशर्मा नावाचा एक संन्यासी राहत होता. अनेक सज्जनांनी दिलेली तलम वस्त्रे विकून काही दिवसात त्याने बरेचसे धन जमविले! तो कोणावरही विश्वास टाकत नसे रात्रं-दिवस पैशांची पोतडी तो आपल्याजवळच बाळगत असे. म्हणतातच ना, पैसा मिळवायलाही त्रास आणि रक्षण करायचाही त्रासच! धन आले तरी दु:ख व खर्च झाले तरी दु:ख! हा पैसा म्हणजे वैतागच आहे! त्याचा धिक्कार असो!

आषाढभूती नावाच्या दुसऱ्यांचे द्रव्य चोरणाऱ्या लबाड माणसाने त्याच्याजवळचे ते गाठोडे पाहिले. आणि तो विचार करू लागला, "याच्या-जवळचे हे डवोले कसे बरे पळवावे? या मठाच्या भिंती दगडी आहेत तेव्हा त्याला भोक पाडता येणार नाही. मठाची दारे खूप उंच आहेत. तेव्हा ती ओलांडून जाता येणार नाही. तेव्हा थापा मारून याचा शिष्य व्हावे! त्याचा जर माझ्यावर विश्वास बसला तर कदाचित तो माझ्या हातात सापडेल! म्हणतात ना, नि:स्पृह माणूस अधिकारावर राहू शकत नाही. ज्याला कामवासना नाहीत तो शृंगार करीत नाही. अडाणी मनुष्य गोड बोलू शकत नाही. आणि स्पष्ट बोलणारा फसवू शकत नाही!"

असा विचार करून आषाढभूती त्याच्याजवळ गेला 'ॐ नम: शिवाय!' असे उच्चारून त्याने साष्टांग नमस्कार घातला आणि तो नम्रतेने म्हणाला, "भगवन्! हा संसार असार आहे! आणि तारुण्य पर्वतावरून वाहात येणाऱ्या नदीच्या वेगाप्रमाणे आहे! जीवित हे गवताच्या पेटलेल्या अग्नी-प्रमाणे आहे! भोग हे शरदऋतूतील ढगांच्या सावलीसारखे आहेत! मित्र, सेवक, मुलगा याची संगत स्वप्नासारखी आहे, हे सर्व मला चांगले समजले आहे. तेव्हा काय केल्याने मी हा संसारसागर तरून जाऊ शकेन?"

"बाळा, तू धन्य आहेस" देवशर्मा आदराने म्हणाला, "इतक्या कोवळ्या वयातच तुला विरक्ती आली! म्हणतातच ना–लहान वयातच ज्याचे मन शांत होते, तीच खरी शांती! विकार क्षीण झाल्यावर कोण शांत होत नाही? सज्जन पुरुषांच्या मनात प्रौढता प्रथम येते आणि नंतर शरीरात येते! दुर्जनांच्या शरीरात प्रौढता येते पण मनात कधीच येत नाही!"

"संसारसागर तरून जाण्याचा मार्ग तू मला विचारत आहेस, म्हणून सांगतो.

"क्षुद्र असो, चांडाळ असो, किंवा आणखी कोणी असो, त्याने जटा वाढवाव्यात, भस्म लावावे म्हणजे तो प्रत्यक्ष शंकरासारखा दिसू लागेल. नंतर शिवाच्या षडक्षरी मंत्राचा जप करावा व एखादे फूल शिवलिंगावर वाहावे. यामुळे त्याची जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होईल!"

"आषाढभूतीने त्याचे पाय धरले आणि तो नम्रतेने म्हणाला, "भगवन्! मला दीक्षा देऊन माझ्यावर अनुग्रह कर."

देवशर्मा म्हणाला, "वत्सा, मी तुझ्यावर अनुग्रह करीन; पण तू रात्री मठात येता कामा नये. कारण यतींना कुणाचीही संगत नसली तरच ते प्रसन्न असतात. त्यामुळे ते तुलाही बरे व मलाही बरे! म्हणतातच की–अयोग्य सल्ल्यामुळे राजा नाश पावतो त्याप्रमाणेच लाडामुळे मुलगा, अभ्यास न केल्यामुळे ब्राह्मण, वाईट पुत्रामुळे कूळ, दुष्टांच्या संगतीमुळे शील, प्रेम नसल्याने मैत्री, बेताल वागणुकीमुळे संपत्ती, एकत्र प्रवासामुळे स्नेह, दुर्लक्ष केल्यामुळे किंवा गर्व केल्यामुळे स्त्री, उपेक्षा केल्यामुळे शेती आणि चुका केल्यामुळे पैसा नाश पावतो! त्याप्रमाणेच संगतीमुळे सन्याशाचा नाश होतो म्हणून दीक्षा घेतल्यानंतर मठाच्या दारात एक गवताचे झोपडे बांध व तेथे झोपत जा."

"आपली आज्ञा प्रमाण!" आषाढभूती म्हणाला, "या उपदेशाचा मला परलोकीसुद्धा उपयोग होईल!"

बाहेर झोपण्याबद्दल वचन घेऊन देवशर्म्याने त्याला विधीपूर्वक आपला शिष्य करून घेतले. त्यानेही हातपाय चेपणे, मालिश करणे वगैरे सेवा

करून त्याला संतुष्ट केले. तरीसुद्धा तो आपले डबोले स्वतःपासून दूर ठेवत नव्हता.

काही दिवस गेल्यानंतर आषाढभूती मनात विचार करू लागला, "हा कधीही माझ्यावर विश्वास दाखवत नाही ! याला दिवसाच शस्त्राने मारून टाकावे, का विष द्यावे का पशूसारखे मारावे ?"

तो असा विचार करीत असता देवशर्म्याचा दुसरा शिष्य दुसऱ्या गावाहून आला. आणि म्हणाला, "भगवन् ! मुंजीकरता आपण माझ्या घरी यावे."

त्याप्रमाणे देवशर्मा आषाढभूतीला बरोबर घेऊन प्रसन्न मनाने निघाला. काही अंतर गेल्यावर त्यांना एक नदी लागली. तेव्हा देवशर्म्याने द्रव्याचे डबोले गुप्तपणे काढले आणि गाठोड्यात लपविले. स्नान आणि पूजा केली. आणि तो आषाढभूतीला म्हणाला, "अरे, मी शौचाला जाऊन येतो तोपर्यंत गाठोड्यात शंकराची प्रतिमा आहे तिचे सावध राहून रक्षण कर." असे म्हणून तो गेला. तो दृष्टीआड होतो तोच ते गाठोडे घेऊन आषाढभूती पळून गेला !

देवशर्मा आपल्या नम्र शिष्याच्या गुणावर प्रसन्न असल्याने त्यावर विश्वास ठेऊन निश्चित होता. तो शौचास बसत आहे इतक्यात त्याचे समोर सोनेरी केस असलेल्या मेंढ्यांच्या कळपातील दोन मेंढे झुंज खेळू लागले. रागाने ते मागे हटायचे व पुढे येऊन टकरी द्यायचे. त्यामुळे त्यांच्या डोक्यातून रक्त वाहू लागले. ते जमिनीवर पडत होते. एक हपापलेला कोल्हा त्या रंगणात येऊन जमिनीवर पडलेले रक्त चाटत होता.

हे पाहून देवशर्मा मनात म्हणाला, "अरे, हा कोल्हा अगदी बुद्धू दिसतो. जर हा यांच्या झुंजीत सापडला तर नक्की मरणारच !" त्याप्रमाणे थोड्याच क्षणात रक्त चाटण्याच्या लोभाने झुंजीत शिरलेला तो कोल्हा दोघांच्या टकरीत सापडला व तत्काळ मेला.

देवशर्माही या घटनेबद्दल विचार करीत हळूहळू आपल्या मुक्कामाकडे निघाला. तेथे त्याला आषाढभूती दिसला नाही म्हणून त्याने घाईतच हातपाय धुतले आणि तो गाठोडे शोधू लागला. ते कोठेच सापडेना. तेव्हा "हाय ! हाय ! मी लुटला गेलो" असे म्हणत तो जमिनीवर बेशुद्ध पडला.

काही क्षणांतच सावध होऊन तो उठला व रडत म्हणाला, "अरे आषाढभूते, मला फसवून कोठे गेलास रे? मला उत्तर तरी दे!"

असा पुष्कळ वेळ शोक करून व रडून तो आषाढभूतीच्या पावलाच्या खुणा पाहत हळूहळू निघाला. जाता जाता संध्याकाळच्या वेळी तो एका गावात पोहोचला. त्या गावातील एक विणकर आपल्या पत्नीसह दारू पिण्यासाठी शेजारच्या शहरात जात होता. त्याला पाहून देवशर्मा म्हणाला, "भल्या गृहस्था, या संध्याकाळच्या वेळी मी तुझ्याकडे अतिथी म्हणून आलो आहे. या गावात मी कोणालाच ओळखत नाही, म्हणून माझा अतिथी म्हणून स्वीकार कर. म्हणतातच ना की, संध्याकाळी आलेल्या अतिथीचा सत्कार केल्यामुळे गृहस्थाला देवपण मिळते. शिवाय बिछान्यासाठी तृणाचे आसन, विश्रांतीसाठी जागा, पाणी आणि चौथे म्हणजे गोड बोलणे, या चार गोष्टी सज्जनाच्या घरी कधीच कमी पडत नाहीत."

हे ऐकून विणकर आपल्या बायकोला म्हणाला, "प्रिये, तू या अतिथीला घेऊन घरी जा. आणि पाय धुऊन, भोजन देऊन व बिछाना देऊन याची सेवा करून तेथेच थांब! मी तुझ्याकरिता पुष्कळ दारू घेऊन येतो!" असे सांगून तो निघून गेला. त्याची बायको व्यभिचारिणी होती. ती प्रसन्न होऊन आपल्या देवदत्त नावाच्या प्रियकराचे चिंतन करीत घरी परत आली. म्हटलेच आहे की–बाहेरख्याली स्त्रीला आकाशात ढग दाटून आले असता, रस्त्यातून जाणारे-येणारे दिसणार नाहीत इतका अंधार असताना, आणि पती विदेशास गेला असताना फार आनंद होत असतो!

तसेच सुंदर व स्वच्छ चादर घातलेला बिछाना, प्रेमळ पती, सुरेख शय्या, या सर्वांना दुसऱ्याशी संभोगाची चटक लागलेल्या स्त्रिया गवताप्रमाणे तुच्छ मानतात!

कुलटा स्त्रियांना आपल्या पतीपासून सुख मिळत नाही. स्वतःच्या पती-बरोबर कामक्रीडा करताना त्यांचे स्नायू तुटतात व शृंगार करताना हाडे मोडतात! पतीचे गोड बोलणेही त्यांना कडू वाटते! परपुरुषाबरोबर रमणारी स्त्री आपल्या कुळाचे अधःपतन, लोकनिन्दा आणि प्राणहानीसुद्धा आनंदाने स्वीकारते!

घरी जाऊन विणकऱ्याच्या पत्नीने एक मोडकी खाट देवशर्म्याला बसायला दिली. आणि ती म्हणाली, " भगवन् ! परगावाहून आलेल्या माझ्या एका मैत्रिणीला मी भेटून येते तोपर्यंत आपण येथे सावधानतेने राहा."

असे बोलून आणि शृंगार करून ती आपला प्रियकर देवदत्त याला भेटायला जाऊ लागली. तोच तिचा पती दारूने धुंद होऊन आलेला दिसला. त्याचे केस मोकळे होते. हातात दारूचे भांडे होते. आणि तो झोकांड्या खात येत होता. त्याला पाहून ती लगेच घरात परत आली व शृंगारवेश काढून टाकून नेहमी सारखी बसली; परंतु विणकराने तिचा शृंगार पाहिला होता. आणि तिच्याबद्दलचा गवगवा त्याच्या कानी आला होताच; पण तो वरकरणी काही दाखवत नसे. पण आता तिचा शृंगार प्रत्यक्ष पाहून त्याचे हृदय खवळले आणि भयंकर रागावून घरात जाऊन तो तिला म्हणाला, " अग कुलटे, कुठे चालली होतीस ?"

" तुमच्या जवळून परत आल्यावर, मी कोठेही गेले नाही," ती म्हणाली, " तुम्ही दारूच्या धुंदीत काहीतरी बडबडत आहात. म्हटलेच आहे की, शरीर वाकडे होणे, जमिनीवर लोळणे, आणि बडबड करणे ही वात झाल्याची लक्षणे आहेत. पण दारूमुळे ही तिन्ही लक्षणे एकदमच प्रगट होतात ! हात कापणे, अंबरत्याग–म्हणजे कपडे काढणे–तेजोहानी आणि चेहऱ्यावर तांबडेपणा ही दारूची लक्षणे आहेत. पण वारुणी (पश्चिम) दिशेला जाताच ही लक्षणे सूर्यातही दिसतात !"

तिचे उत्तर ऐकून व तिने वेष बदललेला पाहून तो म्हणाला, " तुझ्या-बद्दल बरेच दिवस मी लोकापवाद ऐकत होतो. आज मी डोळ्याने सर्व पाहिले आहे. आता तुझा योग्य पाहुणचार करतो !"

असे म्हणून त्याने तिला काठीने झोडपले आणि एका खांबाला बांधून ठेवले. दारूची नशा चढलेली असल्यामुळे तो झोपी गेला.

त्या स्त्रीची मैत्रीण एका न्हाव्याची बायको होती. विणकर झोपला आहे असे पाहून ती तेथे आली व म्हणाली, " सखे, तुझा प्रियकर देवदत्त तुझी वाट पाहत आहे ! तरी लवकर चल."

ती म्हणाली, " अग, माझी अवस्था तर पाहा ! मी कशी जाऊ शकेन ?

तेव्हा तू जाऊन त्याला सांग की, आज रात्री तुझ्यावरोबर समागम होणार नाही."

" गडे ! असे म्हणू नकोस." न्हाव्याची बायको म्हणाली. " हा काय कुलटेचा धर्म झाला ? म्हणतातच ना की, दुर्गम ठिकाणी असलेले गोड फळ मिळविण्याचा जो उंटाप्रमाणे निश्चय करतो त्याचे जीवन प्रशंसेस प्राप्त असते ! शिवाय स्वर्ग आहे की नाही कुणास ठाऊक ? या विविध प्रकारच्या लोकांमध्ये अनेक लोकापवाद उठत राहतातच ! जर परका पुरुष आपल्या आधीन असेल तर तारुण्याची फळे चाखणाऱ्याचे जीवन धन्य होते ! शिवाय दैवयोगाने हिला प्रियकर कुरूप मिळाला तरीही त्याचेबरोबर एकांतात कष्ट सहन करील; पण आपल्या सुस्वरूप पतीबरोबर राहणार नाही !"

विणकराची पत्नी म्हणाली, " हे सर्व ठीक ! मला इथे बांधून घातले असता मी तेथे कशी जाऊ ? शिवाय हा माझा पापी नवरा शेजारीच झोपला आहे."

" सखे, तो दारूच्या धुंदीत आहे. सूर्यकिरणांनी स्पर्श केल्यानंतरच तो जागा होईल. मी तुला सोडवते. तुझ्या जागी मला बांधून ठेव. जलदीने देवदत्ताकडे जा. आणि त्याला खूष करून परत ये."

" ठीक आहे." ती म्हणाली. तेव्हा न्हाव्याच्या बायकोने आपल्या मैत्रिणीला सोडवले. तिच्या जागी आपल्याला बांधून घेतले आणि तिला देवदत्ताकडे संकेतस्थळी पाठवले.

काही वेळानंतर विणकर जागा झाला. त्याची दारूची धुंदी उतरली होती व रागही कमी झाला होता. तो म्हणाला, " आजपासून घर सोडून जाणार नसशील व कठोर बोलणे सोडणार असशील तर मी तुला बंधनातून सोडतो." आपला आवाज तो ओळखील म्हणून न्हाव्याच्या बायकोने काहीच उत्तर दिले नाही. तोही पुन्हा पुन्हा तेच तेच बोलत होता. तरी तिने काहीच उत्तर दिले नाही. म्हणून तो रागावला आणि एक तीक्ष्ण शस्त्र आणून त्याने तिचे नाक कापून टाकले. आणि म्हणाला, " अग कुलटे ! तू अशीच राहा. आता पुन्हा तुला खूष करण्यासाठी मी येणार नाही." असे म्हणून तो पुन्हा झोपी गेला.

देवशर्मा भुकेने व्याकुळ झाला होता. सर्व धन गेल्यामुळे आधीच दुःखी होता. त्याची झोप नाहीशी झाली होती. आणि तो हे सर्व स्त्रीचरित्र पाहत होता.

ती विणकराची पत्नी देवदत्ताबरोबर यथेच्छ संभोगसुख अनुभवून केव्हातरी घरी आली आणि न्हाव्याच्या बायकोला म्हणाली, "काय ग, ठीक आहे ना सारे! तो पापी, मी गेल्यावर जागा नाही ना झाला ?"

"माझ्या नाकाशिवाय बाकी सर्व काही ठीक आहे!" न्हाव्याची बायको म्हणाली, "मला लवकर बंधनातून सोडव म्हणजे हा मला पाहत नाही तोच मी घरी जाईन."

त्याप्रमाणे ती गेल्यावर बऱ्याच वेळाने विणकर उठला व तिला म्हणाला, "अग कुलटे, तुला अजूनही बोलायचे नाही काय ? का तुला शिक्षा म्हणून तुझे कानही कापून टाकू ?"

ती रागाने आणि हेटाळणी करून म्हणाली, "अरे महामूर्खा, माझ्या सारख्या महासतीला विद्रूप करायला कोण समर्थ आहे ? हे लोकपालांनो माझे ऐका, सूर्य, चंद्र, वायू, अग्नी, आकाश, भूमी, जल, हृदय, यम, रात्र, दिवस, दोन्ही संध्याकाळ आणि धर्म हे सर्व मनुष्याच्या कृत्यांना साक्षीदार असतात. मी जर सती असेन आणि मी मनातही परपुरुषाची अभिलाषा केली नसेल तर सर्व देवतागण माझे नाक पूर्वीसारखे अखंड करोत! आणि जर माझ्या हृदयात कधीतरी परपुरुष आला असेल तर माझे जळून भस्म होवो!" असे म्हणून ती लगेच म्हणाली, "अरे दुष्टा, पाहा माझ्या सतीत्वाच्या प्रभावामुळे माझे नाक पहिल्यासारखे झाले की नाही!"

त्याने दिवली आणून पाहिले तर खरोखरच तिचे नाक पहिल्यासारखेच होते! आणि जमिनीवर खूप रक्तप्रवाह होता. तो आश्चर्यचकित झाला. त्याने तिला बंधनातून सोडविले. आणि शंभर प्रकारचे गोड शब्द बोलून तो तिला खूष करू लागला.

देवशर्मा हे सर्व पाहून आश्चर्यचकित झाला आणि मनात म्हणाला, "शबर, नमुची, बली आणि कुंभीनस वगैरे असुरांच्या सर्व माया या स्त्रियांना येतात. हसणाऱ्या बरोबर त्या हसतात, रडणाऱ्या बरोबर रडतात आणि रागावणाराला गोड बोलून आपल्या जाळ्यात ओढतात. शुक्राचार्य

आणि बृहस्पती यांचे शास्त्र आणि बुद्धी स्त्रीबुद्धीपेक्षा जास्त नाही! म्हणून स्त्रियांना कसे सांभाळता येईल? त्या खोट्याचे खरे आणि खऱ्याचे खोटे करू शकतात. त्यामुळे अशा स्त्रियांचे रक्षण पुरुष कोणत्या प्रकारे करू शकतील?

"आणखी म्हणतातच की, स्त्रियांबद्दल आसक्ती बाळगू नये, किंवा त्यांच्या वाढत्या सामर्थ्याची उपेक्षा करू नये. पंख कापलेल्या पक्ष्याला ज्याप्रमाणे खेळवतात त्याप्रमाणे अतिआसक्त झालेल्या पुरुषाला त्या खेळवतात. स्त्रिया तोंडाने गोड गोड बोलतात व आपल्या दुष्ट हृदयाने प्रहार करतात. त्यांच्या बोलण्यात अमृत असते व हृदयांत हलाहल विष भरलेले असते! म्हणूनच मधाच्या लोभाने भ्रमर ज्याप्रमाणे कमळाचे सेवन करतात त्याप्रमाणे थोडेही सुख न मिळालेले पुरुष स्त्रियांच्या ओठांचे चुंबन घेतात व छाती मात्र मुठीत धरून कुसकरतात!

"स्त्री म्हणजे संशय व भ्रम यांचे माहेरघर, स्त्री म्हणजे उद्धटपणा व साहस यांचे निवासस्थान, स्त्री म्हणजे दोषांचा आश्रय, शंभर कपट कारस्थानांचे घर व अविश्वासाचे गेहच! स्त्री म्हणजे मायेची पेटी मनुष्यातील श्रेष्ठांनाही न कळणारी, विष व अमृत यांचे एकाच वेळी मिश्रण असलेली अशी ही स्त्री या जगात धर्मनाश व्हावा म्हणून कोणी बरे निर्माण केली?

स्त्री कशी आहे पाहा! हिच्या स्तनात कठीणपणा असतो. हिच्या नेत्रात चंचलता, तोंडात खोटी वचने, केशभार तर कुरळेपणामुळे कुटिल, मंद चाल व नितंब स्थूल असतात. हिच्या हृदयात भित्रेपणा व बोलण्यात मायावीपणा असतो. हे सर्व दोष, गुण समजणाऱ्या पुरुषाला ती का आवडते हेच कळत नाही!

जसे काम साधायचे असेल त्याप्रमाणे ती हसते किंवा रडते. विश्वास ठेवायला लावते पण स्वतः विश्वासार्ह नाही! म्हणून चांगल्या कुलशीलाच्या पुरुषाने स्त्री स्मशानातील मडक्याप्रमाणे वर्ज्य समजावी!

फिस्कारलेली आयाळ असलेले व क्रूर चेहऱ्याचे सिंह, मद वाहून जात असलेले व त्यामुळे शोभणारे हत्ती, रणांगणावर शौर्य गाजवणारे आणि

बुद्धिमान पुरुष हे सर्व स्त्रीजवळ आले की, भित्र्याहून भित्रे होऊन जातात !

जोपर्यंत पुरुष आपल्यावर भाळत नाही तोपर्यंत स्त्रिया त्याला जसे आवडेल तसेच वागतात; पण एकदा का तो त्यांच्या मदनपाशात अडकला की, त्या पुरुषाची अवस्था गळाला लागलेल्या माशासारखी करून टाकतात!

स्त्रिया समुद्राच्या लाटेसारख्या चंचल आणि सायंकालीन मेघाभ्रच्या रंगाप्रमाणे बदलणाऱ्या असतात. त्यांचे काम साधले की त्या पुरुषाला पायाला लावायचा लाक्षारस काढून घेतल्यावर राहिलेला चोथा जसा फेकून देतात, त्याप्रमाणे सोडून देतात !

खोटे बोलणे, साहस, लपवाछपवी, मूर्खपणा, अतिलोभ, निर्दयपणा हे स्त्रियांचे स्वभावदोषच आहेत ! त्या पुरुषाला मोहित करतात, त्याला कामोत्तेजित करतात, दुःख देतात, त्याची निंदा करतात, उपहास करतात व खेळवतात. पुरुषाच्या भोळ्या मनात शिरून या मत्स्यनयना काय करीत नाहीत ते सांगा ?

गुंजेप्रमाणे या स्त्रिया आतून विषमय व बाहेरून मात्र मनोहर दिसतात! यांना कोणी निर्माण केले बरे ! ”

असा विचार करीत त्या तापसाची रात्र मोठ्या कष्टानेच पार पडली.

इकडे नाक कापलेली न्हाव्याची बायको आपल्या घरी गेली आणि विचार करू लागली. “ आता काय करावे ? हे छिद्र कसे लपवावे ?” ती असा विचार करीत होती तोच तिचा नवरा परत आला. तो काही कामाकरिता रात्री राजवाड्यावर गेला होता आणि तेथेच थांबला होता. शहरातील लोकांचे हजामतीचे काम आटपायचे होते म्हणून तो दारातून आपल्या बायकोला म्हणाला, “ प्रिये, माझी धोकटी लवकर आण. म्हणजे मी हजामती करण्यासाठी जातो. ”

त्या नाक कापलेल्या हुषार बायकोने धोकटीतून एक वस्तरा काढला आणि घरातूनच त्याच्याकडे फेकला ! तो कामाला जायला उत्सुक होता. म्हणून तो एकच वस्तरा पाहून त्याला राग आला. आणि तोच वस्तरा त्याने तिच्याकडे फेकला. लगेच ती दुष्टा हात वर करून घराबाहेर आली

व ओरडू लागली. " मला वाचवा ! मला वाचवा ! मी सदाचारी असूनही या पाप्याने हे पाहा माझे नाक कापले !"

नंतर राजसेवक आले आणि त्यांनी त्या न्हाव्याला काठ्यांनी बडवून मऊ केले, त्याला नीट बांधले आणि नाक कापलेल्या त्याच्या बायकोला घेऊन ते धर्माधिकाऱ्याकडे गेले. व तेथील न्यायपालांना म्हणाले, " या न्हाव्याने अपराधाशिवाय या स्त्रीला विद्रूप केले आहे. तेव्हा जे योग्य असेल ते करावे."

हे ऐकून न्यायपाल म्हणाले, " काय रे न्हाव्या ! तू आपल्या पत्नीला का बरे विद्रूप केलेस ? का तिने परपुरुषाची अभिलाषा धरली ? किंवा कुणाचे प्राण घेण्याचा प्रयत्न केला ? का चोरी केली ? अरे तिने अपराध तरी काय केला ते सांग."

त्या न्हाव्याला इतके ठोकले होते की, तो काही बोलू शकत नव्हता ! तो गप्प बसलेला पाहून ते सभ्य म्हणाले, " हे राजसेवक सांगतात तेच खरे असावे. हाच पापी दिसतो. या बिचाऱ्या निर्दोष स्त्रीला यानेच विद्रूप केले आहे. म्हटलेच आहे की, जर स्वर बदलला असेल, चेहरा फिकट पडला असेल, दृष्टी बावचळली असेल आणि घाबरला असेल तर तो पुरुष नक्कीच दोषी असतो ! जर पुरुष चालताना लटपटत असेल, चेहरा फिकट असेल, कपाळावर घाम आला असेल, आणि बोलताना गडबडत असेल तर तो पुरुष अपराधी असतो, असे या लक्षणावरून हुषार लोक जाणतात. जर न्यायालयात हजर राहूनही पुरुष प्रसन्न आणि शांत असेल, त्याचे बोलणे स्वच्छ असेल, डोळ्यात राग असेल आणि सभेत क्रोधाने बोलत असेल तर तो निर्दोषी असतो. हा न्हावी दुष्ट लक्षणाचा दिसतो. म्हणून स्त्रीचा अपराध केल्याबद्दल त्याला सुळावर चढवावे."

त्या न्हाव्याला वधस्थानाकडे नेत आहेत असे पाहून देवशर्मा त्या धर्माधिकाऱ्यांच्याकडे गेला आणि म्हणाला, " अहो, हा बिचारा न्हावी अन्यायाने सुळी जात आहे ! तो निरपराध आहे " असे म्हणून त्याने पहिल्यापासून सर्व हकीगत विस्ताराने सांगितली. तेव्हा ते न्यायपाल आश्चर्यचकित झाले आणि त्यांनी न्हाव्याला सोडून दिले. ते म्हणाले, ' ब्राह्मण, बालक, स्त्री, तपस्वी आणि रोगी यांनी मोठा अपराध केला तरी त्यांना देहदंड देता येत

नाही. स्वतःच्याच कर्माने तिचे नाक अगोदरच कापले गेले आहे. शिक्षा म्हणून तिचे कान कापून टाकावेत."

त्यानंतर देवशर्माही आपली संपत्ती गेल्याचे दुःख विसरून मठाकडे परत गेला.

म्हणून मी म्हणतो की, "या तिघांनीही स्वतःहून एक चूक केली."

"मग अशा परिस्थितीमध्ये आपले काय कर्तव्य आहे ?"

"अशा कठीण परिस्थितीतही माझी बुद्धी काम करील. मी संजीवकाला व स्वामीला अलग करीन. म्हणतातच की, धनुर्धाऱ्याने सोडलेला बाण कधी वाया जाईल किंवा कधी एखाद्याचा प्राण घेईल; परंतु बुद्धीवंताने आपली बुद्धी चालवली तर राजासकट सर्व राष्ट्र नष्ट होईल ! तेव्हा मी गुप्तपणे कारस्थान करून त्या दोघांमध्ये फूट पाडीन."

"मित्रा, तुझे कारस्थान जर पिंगलकाला किंवा संजीवकाला समजले तर तू मेलासच !" करटक म्हणाला.

"अहो पिताजी, असे म्हणू नका. राजकारण करणारांनी संकटात आणि दैव प्रतिकूल असतांनाच बुद्धी वापरली पाहिजे. उद्योग सोडता कामा नये. कदाचित् गुणाक्षरन्यायाने बुद्धीचा प्रयोग यशस्वी होईल. म्हटलेच आहे की, दैव प्रतिकूल असले तरी धैर्य सोडता कामा नये. धैर्यामुळे कदाचित् पूर्वस्थिती प्राप्त होते. समुद्रात बोट बुडली तरी यात्रिक समुद्र तरून जाण्याची इच्छा करतात. उद्योगी पुरुषश्रेष्ठालाच लक्ष्मी प्राप्त होते. दैवात असेल तर मिळेल असे क्षुद्र पुरूष म्हणतात. म्हणून मनुष्याने दैवावर हवाला न ठेवता स्वतःच्या शक्तीने पुरुषार्थ करावा. प्रयत्न करूनही जर यशसिद्धी झाली नाही तर त्यात काय दोष ? म्हणून हे सर्व लक्षात घेऊन माझ्या कारस्थानी बुद्धीने त्या दोघानाही माझ्या मनातील समजणार नाही अशी मी योजना करीन. गुप्तपणे योजना करून कारस्थान केले तर ते ब्रह्मदेवालाही समजत नाही ! एका विणकराने विष्णूच्या रूपाचे ढोंग करून राजकन्येचा उपभोग घेतला."

करटक म्हणाला, "हे कसे काय बुवा ?"

"एक तर," तो म्हणाला...

## कथा पाचवी

# विष्णुरूपातील विणकर

एका नगरात एक विणकर आणि एक सुतार असे दोन मित्र राहत होते. त्यांची मैत्री बालपणापासून असल्यामुळे ते नेहमी एकत्रच राहत आणि एकत्र हिंडत.

त्या नगरात एका देवालयात दर्शनाचा मोठा उत्सव होता. अनेक देशातून नट, नर्तक आणि शाहीर त्या उत्सवासाठी आले होते. ते सर्व पाहत हे दोन मित्र त्या उत्सवात सगळीकडे हिंडत होते. तेथे एक राजकन्या हत्तीवर बसून देवदर्शनासाठी आली होती. तिच्या भोवती अंत:पुरातील सेवक आणि कंचुकी यांचा परिवार होता. अशा त्या सुंदर राजकन्येला या दोघांनी पाहिले. तिला पाहताच भुताने झपाटल्याप्रमाणे तो विणकर कामबाणांनी घायाळ झाला आणि एकदम बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला ! त्याला तशा अवस्थेत पाहून सुतार दु:खी झाला आणि त्याने आपल्या नातेवाईकाच्या मदतीने त्याला घरी आणले. तेथे वैद्याकडून त्याला शीतोपचार केले, औषधे दिली आणि मांत्रिकांचाही उपचार केला. तेव्हा तो बऱ्याच वेळाने शुद्धीवर आला. तेव्हा सुताराने त्याला विचारले, "मित्रा, तू एकाएकी बेशुद्ध कसा पडलास ? झाले तरी काय तुला ? "

विणकर म्हणाला, "मित्रा, असे असेल तर ऐक माझ्या मनातील दु:ख आणि रहस्य ! तू जर मला मित्र मानत असशील तर चितेसाठी मला काही लाकडे देऊन उपकार कर. मित्रप्रेमामुळे जादापणा करून मी अपराध केला असेल तर मला क्षमा कर ! "

"मित्रा, तुझ्या दु:खाचे कारण तरी सांग ! " सुतार अश्रूभरल्या डोळ्यांनी आणि कापणाऱ्या स्वरात म्हणाला, "म्हणजे त्यावर काही इलाज तरी करता येईल. म्हणतातच की–औषध, मंत्र, सिद्ध पुरुष आणि बुद्धी यांच्या योगाने या विश्वात असाध्य असे काही नाही. म्हणून या चार गोष्टीमुळे तुझे काम होण्यासारखे असेल तर ते मी करीन ! "

" मित्रा, या आणि दुसऱ्या हजारो उपायांनीही माझे दुःख जाणार नाही. तेव्हा माझ्या मृत्यूला उशीर लावू नकोस ! "

" मित्रा, असाध्य असले तरी मला सांग. म्हणजे ते नक्की असाध्य आहे असे समजले की, मीही तुझ्याबरोबर अग्नीत प्रवेश करीन. कारण तुझा वियोग मला क्षणभरही सहन होणार नाही असे मला निश्चित वाटते."

" मित्रा, हत्तीवर बसलेल्या त्या राजकन्येला उत्सवात पाहिल्यापासून कामदेवाने माझी ही अशी अवस्था करून टाकली आहे. मला या वेदना सहन होत नाहीत ! माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळाप्रमाणे विशाल आणि कुंकू लावल्याप्रमाणे दिसणाऱ्या तिच्या स्तनावर मी माझी छाती ठेऊन तिच्या बाहुपाशात केव्हा बांधला जाईन ? आणि तिच्याबरोबर कामक्रीडा व संभोग करून थकल्यानंतर तिच्या मांडीवर केव्हा झोपीन यासाठी मी व्याकुळ झालो आहे.

" त्या कामिनीचे गुलाबी ओठ, यौवनाच्या गर्वामुळे उन्नत झालेले स्तन, खोल बेंबी, कुरळे केस आणि शरीराचा/मध्यभाग याकडे माझे लक्ष गेले तर मला त्रास होतो. कारण हे स्वभावतःच कठोर आहेत. परंतु तिचे निर्मळ कपाळ पाहूनही मी तापतो हे मला अनुचित वाटते व असह्य होते."

तेव्हा सुतार हसून म्हणाला, " मित्रा, इतकेच ना ! तर मग तुझे काम झालेच म्हणून समज. आजच तिच्याबरोबर तुझा संगम होऊ शकेल."

" मित्रा, तिच्या अंतःपुरात वारा सोडून दुसऱ्या कोणाचाही प्रवेश शक्य नाही. शिवाय राजसेवक तेथे नेहमीच रक्षणाला असतात. तेव्हा त्या अंतःपुरात तिच्याबरोबर माझा संगम कसा काय होईल ? तू खोटे बोलून माझी चेष्टा का बरे करतोस ?"

सुतार म्हणाला, " मित्रा, जरा माझ्या बुद्धीचा चमत्कार तर पाहा."

असे सांगून सुताराने कळीच्या योगाने आकाशात उडणारा लाकडी गरुड तयार केला. वरुण वृक्षाच्या लाकडापासून शंख, चक्र, गदा, पद्म, मुगुट आणि कौस्तुभ बनविले. विणकराला विष्णूचे रूप देऊन गरुडावर बसविले आणि यंत्र कसे चालवायचे ते शिकविले. आणि तो म्हणाला. " मित्रा, या विष्णूच्या रूपाने तू रात्री त्या राजकन्येच्या सातव्या मजल्यावरील महालात जा. तेथे एकटयाच राहणाऱ्या त्या भोळया राजकन्येवर विष्णूच्या रूपाने

छाप टाक व तिला आपलेसे करून वात्स्यायनाने सांगितलेल्या कामसूत्रानुसार तिचा उपभोग घे.'

विणकरही विष्णूच्या रूपात तेथे गेला व म्हणाला, "राजकन्ये ! तू झोपला आहेस का जागी आहेस ! मी तुझ्यासाठी लक्ष्मीचा त्याग करून क्षीरसागरातून येथे आलो आहे. म्हणून माझ्याबरोबर समागम कर."

त्याचे चतुर्भुज रूप, बरोबरची कौस्तुभ वगैरे आयुधे आणि तो गरुड हे सर्व पाहून राजकन्या आश्चर्यकित झाली आणि बिछान्यावरून उठून म्हणाली, "भगवन्, मी तर अपवित्र मानवी कीटक ! आणि आपण त्रैलोक्यपावन व वंदनीय ! तेव्हा हे योग्य होईल काय ?"

"सुंदरी, तू म्हणतेस हे खरे आहे ! परंतु गोपकुलात जन्म घेतलेली तू माझी पूर्वजन्मातील पत्नी राधा आहेस ! सध्या येथे अवतार घेतला आहेस म्हणून तर मी आलो !"

"भगवन् ! तर आपण माझ्या वडिलांकडे विनंती करा. तेही शंका न घेता मला आपल्यालाच अर्पण करतील."

"प्रिये, मी मानवांना दर्शने देत नसतो ! मग बोलणे तर दूरच राहिले ! गांधर्वविवाह करून तू माझी हो ! नाहीतर शाप देऊन तुझे सर्व कुळ भस्म करून टाकीन."

असे म्हणून तो गरुडावरून उतरला आणि त्याने तिचा उजवा हात धरला. ती घाबरली होती, लाजली होती आणि कापत होती. तरी त्याने तिला बिछान्याकडे नेली. उरलेली रात्र त्याने कामशास्त्रानुसार तिच्या उपभोगात घालविली आणि सकाळी कोणाच्या दृष्टीस पडण्यापूर्वीच तो घरी परत आला. अशा तऱ्हेने रोज रात्री राजकन्येबरोबर राहून तिचा उपभोग घेत विणकर आनंदाने काळ घालवू लागला.

एकदा कंचुकींनी राजकन्येच्या ओठावर दंतचिन्हे पाहिली. तेव्हा त्यांनी गुप्तपणे विचार केला, "या राजकन्येच्या शरीरावर पुरुषाने उपभोग घेतल्याच्या खुणा दिसून येत आहेत. या सुरक्षित अंतःपुरात हे कसे घडले हे समजत नाही ! म्हणून राजाला सांगू या."

याप्रमाणे ठरवून ते सर्व राजाकडे गेले आणि म्हणाले, "देव, कसे ते आम्हाला समजत नाही, परंतु इतक्या बंदोबस्तातही राजकन्येच्या अंतःपुरात

कोणीतरी प्रवेश करतो. म्हणून काय करावे याची आज्ञा व्हावी."

हे ऐकून राजाचे हृदय व्याकूळ झाले. तो मनात विचार करू लागला, "मुलगी जन्माला आली की मोठी काळजीच ! ती कोणाला द्यावी हे ठरविणे कठीणच ! दिली तरी तिला सुख मिळते, न मिळते ही काळजी आहेच ! म्हणून मुलीचा बाप होणे कठीणच ! नदी आणि स्त्रिया सारख्याच असतात. नद्या पाण्याच्या वेगाने आपल्या कुळाचा नाश करतात तर स्वैर स्त्रिया स्वतःच्या कुलाचा नाश करतात. मुलगी जन्मतःच आईला काळजी निर्माण करते. मोठी झाली की भाऊबंदांचे कष्ट वाढविते. आणि विवाहात दुसऱ्याच्या हातात दिली तरी कुलाला कलंकित करते. म्हणून कन्या म्हणजे निवारता न येणारे संकटच आहे !"

अशा तऱ्हेने खूप विचार करून तो राणीला एकांतात म्हणाला, "देवी, हे कंचुकी काय म्हणतात पाहा आणि तपास कर. असे कृत्य करणारा यमाच्या तावडीत सापडलेला दिसतो."

हे ऐकून राणी फार दुःखी झाली आणि ताबडतोब राजकन्येच्या अंतःपुरात गेली. तिच्या ओठावर दंतचिन्हे आणि सर्वांगावर नखचिन्हे पाहून ती मुलीला म्हणाली, "अग पापिणी, कुलकलंके, तू आपले शील असे कसे भ्रष्ट केलेस ? यमराजाची दृष्टी पडलेला हा कोण तुझ्याकडे येत असतो ? मला खरी हकीगत सांग पाहू !"

खूप रागावून आईने केलेला हा भडीमार ऐकून भयाने आणि लाजेने मान खाली घालून ती म्हणाली, "आई, साक्षात भगवान विष्णू गरुडावर बसून रात्री येतात. माझे म्हणणे तुला खोटे वाटत असेल तर येथे लपून राहून रात्री तू आपल्या डोळ्यांनी त्यांना पाहा."

हे ऐकून राणी प्रसन्न झाली आणि तिच्या अंगावर रोमांच उठले. ती राजाकडे जाऊन म्हणाली, "देव, आपला भाग्यकाळ आला. रोज रात्री प्रत्यक्ष भगवान विष्णू आपल्या मुलीजवळ येतात. त्यांच्याबरोबर तिचा गांधर्वविवाहही झाला आहे. आपण दोघे खिडकीत बसून पाहू. कारण ते माणसाबरोबर बोलत नाहीत."

हे ऐकून राजालाही आनंद झाला त्याला तो दिवस शंभर वर्षांसारखा दीर्घ वाटला ! रात्री तो राणीसह खिडकीजवळ लपून बसला व आकाशा-

कडे पाहत राहिला. तेव्हा त्याला शंख, चक्र, गदा, पद्म वगैरे चिन्हे धारण करणारा गरुडावर बसलेला विष्णू आकाशातून उतरताना दिसला. तेव्हा आपण अमृताच्या प्रवाहात डुंबत आहोत असे त्याला वाटले. तो राणीला म्हणाला, " प्रिये, या जगात तू आणि मी धन्य झालो! प्रत्यक्ष विष्णू आपल्या मुलीच्या भजनी लागले. आता आपले सर्व मनोरथ पूर्ण झालेच म्हणून समज. आता आपल्या जावयाच्या प्रभावाने मी सर्व पृथ्वी वश करून घेईन!"

याप्रमाणे ठरवून त्याने सीमेवरच्या सर्व राजांच्या सीमेवर आक्रमण करण्यास सुरुवात केली. त्याच्या ह्या आक्रमणामुळे सीमेवरचे सर्व राजे एकत्र झाले आणि त्यांनी या राजाबरोबर युद्ध सुरू केले.

राजाने राणीच्या तोंडी मुलीला निरोप पाठविला, "बाळे, प्रत्यक्ष भगवान विष्णू माझा जावई असताना हे सर्व राजे माझ्याबरोबर युद्ध करतात हे योग्य आहे काय? तेव्हा तुझ्या पतीला सांगून माझ्या शत्रूंचा नाश करून टाक!"

त्याप्रमाणे राजकन्या रात्री विणकराला विनयाने म्हणाली, "भगवन्! आपल्यासारखा जावई असताना माझ्या बाबांचा शत्रूंनी पराभव करावा हे काही योग्य नव्हे. तेव्हा कृपा करा आणि त्या सर्व शत्रूंचा नाश करून टाका."

तो म्हणाला, "तुझ्या बाबांच्या शत्रूंचा माझ्यापुढे काय पाड? तेव्हा काळजी करू नका! माझ्या सुदर्शन चक्राने एका क्षणात त्या सर्वांना मी गवताप्रमाणे कापून टाकीन!"

काही दिवसांतच शत्रूने राजवाड्याशिवाय सर्व देश जिंकला. तरीही राजाने विष्णूरूप घेतलेल्या विणकराला ओळखले नाही! उलट तो रोज कापूर, आगरु, कस्तुरी वगैरे सुगंधी द्रव्ये आणि अनेक प्रकारची वस्त्रे, फुले, पक्वान्ने आणि पेये त्याच्याकडे पाठवत होता. आणि मुलीच्या तोंडी त्याने विनंती केली, "भगवन्! उद्या सकाळी शत्रू ही जागा घेतील. कारण दाणागोटा संपला आहे. सर्व लोक जखमा झाल्यामुळे लढू शकत नाहीत. व पुष्कळ मेलेही आहेत. तेव्हा हे जाणून योग्य असेल ते करावे."

हे ऐकून विणकर मनात म्हणाला, " हे स्थान गेल्यानंतर माझा व हिचा

वियोग होणार! म्हणून गरुडावर बसून आयुधे धारण करून शत्रूला आकाशातून दर्शन देतो. कदाचित् मला विष्णू समजून शत्रू साशंक होईल आणि राजाचे सैनिक त्यांना मारून टाकतील. म्हणतातच की–निर्विष सापानेही मोठी फणा उभारावी. विष असो किंवा नसो, तो भयंकरच वाटतो शिवाय या स्थानाच्या रक्षणासाठी मृत्यू आला तर ते उत्तमच आहे. गाय, स्त्री, ब्राह्मण, धनी व स्वतःचे स्थान यांच्याकरिता जो प्राण देतो त्याला अक्षय स्वर्गाची प्राप्ती होते. अमावास्येचा चंद्र जेव्हा सूर्य-मंडळात आश्रय घेतो तेव्हा सूर्य त्याचे रक्षण करण्यासाठी राहूबरोबर युद्ध करतो. आपण स्वतः संकटात असताना शरण आलेल्यांचे रक्षण करणे शूर पुरुषाला शोभते."

असा निश्चय करून दुसऱ्या दिवशी पहाटे दात वगैरे घासून तो राजकन्येला म्हणाला, "हे सुंदरी, सर्व शत्रूंचा नाश झाल्यानंतरच मी मी आता अन्नपाणी घेईन. आणखी काय सांगू ? त्यानंतरच तुझ्याबरोबर संगम करीन. परंतु तू आपल्या वडिलांना सांग की, सकाळीच पुष्कळ सैन्य घेऊन नगरातून बाहेर पडून युद्ध करा. मी आकाशातून त्या सर्वांना निस्तेज करून टाकीन. नंतर त्यांना आरामात मारून टाका. मी जर स्वतःच त्यांना मारले तर त्या सर्व पाप्यांना वैकुंठाची प्राप्ती होईल ! ते स्वर्गात जाऊ नयेत म्हणून ते पळू लागल्यानंतर तुम्हीच त्यांना ठार मारा."

राजकन्यने हा सर्व निरोप राजाला सांगितला. त्याच्यावर विश्वास ठेवणारा राजा सकाळी सैन्याला सज्ज करून शत्रूवर चालून गेला. तो विणकरही मरणाचा निश्चय करून आकाशात फिरणाऱ्या गरुडावर बसून युद्धावर गेला.

इकडे भगवान विष्णूने अंतर्ज्ञानाने सर्व जाणले. त्याने स्मरण केल्याबरोबर गरुड तेथे आला. भगवान थोडेसे हसून त्याला म्हणाले, "अरे गरुडा, तो विणकर माझे रूप घेऊन लाकडी गरुडावर बसून राजकन्येकडे जात असतो, ते तुला माहीत आहे काय ?"

"देव, मला हे सर्व माहीत आहे. मग आता काय करावे ?"

भगवान म्हणाले, "तो विणकर मरायचा निश्चय करून युद्धासाठी गेला आहे. आणि तो क्षत्रियांच्या बाणामुळे नक्कीच मारला जाणार !

तो मेल्यानंतर लोकांना वाटेल की, विष्णू आणि गरुडच मारले गेले. मग लोक आपली पूजा करणार नाहीत. म्हणून तू लवकर जाऊन त्या लाकडी गरुडात संचार कर. सुदर्शन चक्र त्या खोटचा चक्रात शिरेल. आणि मीही विणकराच्या शरीरात प्रवेश करीन. त्यामुळे तो शत्रूचा नाश करू शकेल. मग आपले माहात्म्य वाढेल."

तेव्हा गरुडाने नकली गरुडात व विष्णूंनी त्याच्या शरीरात प्रवेश केला. भगवंताच्या माहात्म्यामुळे शंख, चक्र, गदा व धनुष्य धारण करणाऱ्या त्या आकाशातील विणकराने सर्व मुख्य क्षत्रियांना निस्तेज करून टाकले.

नंतर राजाने आपले सैन्य पाठवून ते सर्व शत्रू मारून टाकले "श्रीविष्णू जावई असल्यामुळे त्याने सर्व शत्रूंना मारले." अशी बातमी सगळीकडे पसरली ते सर्व मेलेले पाहून आनंदलेला विणकर आकाशातून खाली उतरला. आपल्या नगरातीलच तो विणकर राजा, मंत्री आणि नागरिकांनी पाहिला. तेव्हा त्यांनी त्याला विचारले, "ही काय भानगड आहे ?"

तेव्हा त्याने प्रारंभापासून सर्व हकीगत सांगितली. विणकराचे धाडस पाहून राजा प्रसन्न झाला. शत्रूंचा नाश झाल्यामुळे त्याची किर्ती वाढलीच होती. त्याने सर्व लोकासमक्ष आपली राजकन्या त्याला विवाहात दिली आणि एक देशही दिला. विणकरही तिच्याबरोबर जीवनाचा आनंद असलेल्या विषयसुखाचा अनुभव घेत काळ घालवू लागला.

"म्हणूनच मी म्हणत आहे की, गुप्तपणे कट केला तर तो ब्रह्मदेवालाही समजत नाही."

हे ऐकून करटक म्हणाला, "ते असो, तरी पण मला फार भीती वाटते. कारण संजीवक बुद्धिमान आहे आणि सिंह भयंकर आहे. तू जरी खूप हुशार असलास तरी पिंगलकापासून संजीवकाला अलग करण्यास तू समर्थ होणार नाहीस !"

दमनक म्हणाला, "मी असमर्थ असलो तरी जवळ जवळ समर्थ आहेच. म्हटलेच आहे की, जे पराक्रमाने साधत नाही ते युक्तीने साधू शकते. कावळ्याने सुवर्णाच्या साखळीने काळ्या सापाचा नाश करून टाकला."

"ऐक तर !" दमनक सांगू लागला ...

"हे काय आहे बुवा ?"

## कथा सहावी

# कावळा आणि साप

एका रानात एक प्रचंड वडाचे झाड होते, त्या झाडावर कावळ्याचे जोडपे राहत होते. त्याच झाडाच्या ढोलीत एक काळा साप राहत होता. कावळीला पिल्ले झाली की साप ती सर्व खाऊन टाकत असे. तेथून जवळच दुसऱ्या एका झाडाजवळ त्यांचा प्रिय मित्र कोल्हा राहत होता. त्याच्याकडे ही दोघे गेली आणि म्हणाली, "मित्रा, हे असे असे नेहमी होते. तेव्हा आम्ही काय करावे ? तो दुष्ट काळा साप ढोलीतून बाहेर पडून आमची पिल्ले खातो तेव्हा त्यांच्या रक्षणाचा काही उपाय सांग. म्हणतातच की, ज्याचे शेत नदीकिनारी असते, ज्याची बायको परपुरुषाला वश असते आणि ज्याच्या घरात साप असतो, तो सुखाने कसा राहू शकेल ? साप असलेल्या घरात राहणे म्हणजे मृत्यूच, यात संशय नाही ! ज्या गावाजवळ साप राहतो त्यांचे प्राण नेहमीच संकटांत असतात. आमचेही प्राण तसेच संकटात आले आहेत."

"या गोष्टीबद्दल तुम्ही थोडेही दु:ख करू नका !" कोल्हा म्हणाला, "काहीतरी युक्ती काढून त्या लोभ्याला मारले पाहिजे ! युक्तीने शत्रूवर जसा जय मिळविता येतो तसा शस्त्रानेही मिळत नाही. युक्तीबाज जरी छोटा असला तरी शूर त्याचा पराभव करू शकत नाही. उत्तम, मध्यम आणि वाईट असे पुष्कळ मासे खाल्ल्यानंतरही आधाशीपणा केल्यामुळे एका बगळ्याला खेकड्याने मारले."

हे कसे काय ?" त्यांनी विचारले,

तेव्हा तो कोल्हा म्हणाला...

१०९८
१६२।२ ५३५

# कथा सातवी

## बगळा व खेकडा

एका वनात एक मोठे सरोवर होते. त्यात अनेक प्रकारच्या जलचर प्राण्यांनी आश्रय घेतला होता. तेथेच एक म्हातारा बगळा राहात होता. म्हातारपणामुळे त्याला मासे मारता येत नसत. एकदा भुकेने व्याकूळ होऊन सरोवराच्या काठावर बसून तो रडू लागला, त्याच्या मोत्यांसारख्या अश्रूंच्या प्रवाहाने जमीन भिजून गेली. तेथे एक खेकडा इतर प्राण्यांबरोबर आला. बगळ्याच्या दुःखामुळे तोही दुःखी झाला आणि आदराने त्याला म्हणाला, " मामा, आज तूं भोजन न करता का बसला आहेस ? तुझे डोळे पाण्याने भरले आहेत आणि तू निःश्वास टाकत आहेस. असे का बरे ?"

" बाळा, तू बरोबर ओळखलेस ! मासे खाऊन मला वैराग्य आले आहे ! म्हणून मी उपास करतो आहे ! त्यामुळे जवळ आलेले मासेही मी खात नाही."

"पण मामा, तुझ्या वैराग्याचे कारण काय आहे?" खेकड्याने विचारले.

" बाळा, मी याच सरोवरात जन्मलो आणि येथेच वाढलो. मी अलिकडेच ऐकले की, लवकरच बारा वर्षे दुष्काळ पडणार आहे."

" तुला हे कोणी सांगितले ? "

बगळा म्हणाला, " एका ज्योतिषाने !

" शनी रोहिणी नक्षत्राच्या गाड्याचा भेद करून जाईल व त्याची शुक्र आणि मंगळाबरोबर युती होईल ! वराहमिहीर म्हणतात की, जेव्हा सूर्यपुत्र शनी रोहिणीशकटाचा भेद करील तेव्हा इंद्र बारा वर्षे पृथ्वीवर पाऊस पाडणार नाही आणि पृथ्वी स्वतःला पापी समजू लागेल व दुष्काळामुळे सगळीकडे भस्म आणि अस्थी दिसतील ! जणू पृथ्वीने कापालिक व्रत धरले आहे असे वाटेल ! त्याचप्रमाणे रोहिणी–शकटाचा

भेद जेव्हा शनी–मंगळ आणि चंद्र करतो त्यावेळी अनिष्ट सागरात बुडून विश्व नष्ट होते. जेव्हा चंद्र रोहिणी–शकटात प्रवेश करतो त्यावेळी लोक अतिउष्मा झाल्यामुळे कोणतेही पाणी पितात आणि स्वतःच्या मुलांना मारून खातात.

"या सरोवरात पाणी फार थोडे आहे आणि ते लवकरच आटून जाईल. हे सरोवर कोरडे पडल्यावर मी ज्यांच्याबरोबर वाढलो आणि खेळलो त्या सर्वांचा पाण्याच्या अभावी नाश होईल. त्यांची ताटातूट पाहणे मला शक्य नाही. म्हणून मी हे उपोषण करीत आहे. सांप्रत लहान सरोवरातील प्राणी मोठ्या सरोवरात परिवारासकट जात आहेत. मगर, कासवे, पाणहत्ती वगैरे प्राणी स्वतः जात आहेत. परंतु या सरोवरातील प्राणी काही न करता स्वस्थ बसून आहेत. त्यांचे बीजही शिल्लक राहणार नाही. म्हणून मला जास्तच रडू येत आहे. !"

खेकड्याने ही हकीगत इतर सर्व प्राण्यांना कळविली. तेव्हा ते सर्व प्राणी घाबरले आणि मासे आणि कासव यांना पुढे करून बगळ्याकडे आले. त्यांनी विचारले. "मामा, आमचे रक्षण होईल असा एखादा उपाय आहे काय ?"

बगळा म्हणाला, "या सरोवरापासून जवळच खूप पाणी असलेले एक सरोवर आहे. ते कमळांच्या वेलींनी भरलेले असून चोवीस वर्षे दुष्काळ पडला तरी आटणार नाही ! जर कोणी माझ्या पाठीवर येऊन बसेल तर मी त्याला तेथे नेईन."

त्या प्राण्यांनी बगळ्यावर विश्वास ठेवला आणि बाबा, मामा, दादा, असे म्हणत सर्वजण त्याच्याभोवती जमले. आणि "मला आधी न्या, मला आधी न्या !" असे म्हणू लागले. तो दुष्ट बगळाही क्रमाने एकेकाला पाठीवर नेऊ लागला. सरोवरापासून जवळच मोठा दगड होता, त्यावर आपटून तो मासे खाऊन टाकत असे आणि पुन्हा सरोवरात येऊन खोट्या बातम्या व हकिगती सांगून त्यांचे मनोरंजन करीत असे. अशा तऱ्हेने तो आपली उपजीविका करू लागला.

एक दिवस खेकडा बगळ्याला म्हणाला. "मामा, प्रथम मीच तुझ्याशी

हे प्रेमळ संभाषण सुरू केले. आणि तू मला सोडून इतरांनाच नेत आहेस ! आता माझेही प्राण वाचव ना !"

हे ऐकून तो दुष्ट बगळा मनात म्हणाला, "मासे खाऊन नाहीतरी मला कंटाळाच आला आहे. तर आज या खेकड्यालाच तोंडी लावणे करू या !" असा विचार करून त्याने खेकड्याला पाठीवर घेतले. आणि तो मारायच्या दगडाकडे निघाला. त्या दगडाजवळ हाडांचा डोंगरच दुरून खेकड्याला दिसला. ही हाडे माशांची आहेत हे त्याने ओळखले. तो बगळ्याला म्हणाला, "ते सरोवर अजून किती दूर आहे ? माझ्या भाराने तुम्ही खूप दमलेले दिसता म्हणून सांगा."

'हा पाण्यातला प्राणी आहे. जमिनीवर याचे काय चालणार ?' असा विचार करून तो मठ्ठ बगळा हसून म्हणाला, "अरे खेकड्या, कुठले दुसरे सरोवर ? हे तर माझे अन्न आहे. तर आता तुझ्या इष्ट देवतेचे स्मरण कर ! याच दगडावर तुला आपटून मी खाऊन टाकणार !"

तो असे बोलत असताना खेकड्याने आपल्यापुढील दोन आकड्यामध्ये कमळांच्या देठाप्रमाणे पांढरी शुभ्र आणि मऊ असलेली बगळ्याची मान पकडली ! आणि त्याला मारून टाकले ! ती बगळ्याची मान आकड्यात तशीच पकडून तो हळूहळू आपल्या सरोवराकडे परत आला. तेव्हा पाण्यातील सर्व प्राण्यांनी त्याला विचारले, " अरे खेकड्या ! परत का बरे आलास ? तो मामा पण आला नाही. का बरे उशीर करीत आहे ? आम्ही सर्व उत्सुक होऊन, प्रत्येक क्षण मोजत आहोत."

त्यांचे हे बोलणे ऐकून खेकडा हसून म्हणाला, "मूर्खांनो ! त्याने सर्वांना खोटे सांगून फसविले. जवळच असलेल्या दगडावर त्याने सर्वांना आपटले आणि खाऊन टाकले. माझे आयुष्य शिल्लक राहिले होते म्हणूनच त्या विश्वासघातक्याचा हेतू मला समजला. त्याची मी ही मान आणली आहे ! तेव्हा आता भ्रमात राहू नका ! आता येथील सर्व प्राणी कुशल राहातील."

"म्हणून मी म्हणालो की, मासे खाण्यास चटावलेल्या बगळ्याला लोभीपणामुळे प्राणास मुकावे लागले."

कावळा म्हणाला, "त्या सापाला कोणत्या उपायाने मारता येईल ते सांग ना !"

"तुम्ही दोघेही एखाद्या राजधानीच्या नगरात जा. तेथे राजाने, प्रधानाने किंवा श्रीमंत माणसानें निष्काळजीपणे ठेवलेली सोन्याची माळ किंवा हार उचलून आणा आणि ती त्या सापाच्या ढोलीत टाका ! म्हणजे तो साप तो हार शोधताना मारला जाईल."

ते ऐकून कावळा आणि कावळी त्याच क्षणी आकाशात उडाले आणि एका सरोवरापाशी आले. पाहतात तो त्या सरोवरात एका राजाच्या अंत:पुरातील स्त्रिया सोन्याच्या साखळ्या, मोत्यांचे हार व बाकीची वस्त्रे हे सर्व किनाऱ्यावर ठेवून जलक्रीडा करीत होत्या. कावळीने त्यातला एक सोन्याचा हार उचलला आणि ती घराकडे निघाली. ते पाहून कंचुकी आणि इतर सेवक हातात काठ्या घेऊन तिच्यामागे गेले. कावळीनेही ती सोन्याची साखळी सापाच्या ढोलीत टाकली आणि ती लांब जाऊन बसली.

राजसेवकांनी झाडाच्या ढोलीत पाहिले तो तेथे काळा साप फडा काढून बसला होता. त्यांनी त्याला काठ्यांनी मारून टाकले आणि सोन्याची साखळी घेऊन ते आपल्या प्रासादाकडे गेले. कावळ्याचे जोडपेही तेथे सुखाने राहू लागले.

"म्हणून मी म्हणतो की बुद्धिमंतांना असाध्य असे काही नसते. म्हटलेच आहे की, ज्याची बुद्धी तोच बलवान ! निर्बुद्धाजवळ कुठली शक्ती ? सशाने माजलेल्या सिंहाला वनात मारून टाकले."

"हे काय आहे बुवा ?" करटक म्हणाला,

दमनक त्याला सांगू लागला...

कथा आठवी

# सिंह आणि ससा

एका वनात भासुरक नावाचा एक सिंह राहात होता. आपल्या शक्तीच्या गर्वामुळे तो रोजच ससे, हरिण वगैरे अनेक प्राणी मारून टाकीत असे. तरी त्याचे समाधान होत नसे. एके दिवशी त्या वनातील हरिण, डुक्कर, रेडे, ससे वगैरे सर्व प्राणी एकत्र जमले आणि त्याच्याकडे येऊन म्हणाले, "स्वामी, तू नेहमी इतक्या प्राण्यांना का मारतोस? तुझी तर एकाच प्राण्यामुळे तृप्ती होऊ शकेल. तेव्हा आमच्याबरोबर एक नियम प्रतिज्ञा घेऊन कर! तू येथेच थांबत जा. आमच्यापैकी रोज एक प्राणी तुझ्या भोजनासाठी पाळीपाळीने पाठवू. त्यामुळे तुला त्रासाशिवाय जेवण मिळेल आणि आमचाही सर्वस्वी विनाश होणार नाही. या राजधर्माचे आपण पालन करावे."

"म्हटलेच आहे की, नियमित घ्यायच्या औषधाप्रमाणे राज्याचा उपभोग हळू हळू घ्यावा. यामुळेच राजाला शक्ती लाभेल. रूक्ष व कोरडे लाकूड मंत्रपूर्वक व विधीपूर्वक घासले तर त्यातून अग्नीही निघतो. त्याप्रमाणे रुक्ष जमिनीची मशागत केल्यास त्यापासून फळ मिळतेच! प्रजेचे पालन केले तर राजाची प्रशंसा होते आणि स्वर्ग देणारे पुण्य वाढते. प्रजेला पीडा दिली तर धर्मनाश होतो, अपयश येते आणि पाप वाढते. प्रजा गाईसारखी आहे. गवळी ज्याप्रमाणे तिचे पालनपोषण करून रोज दूध घेतो त्याप्रमाण राजाने प्रजेचे पालनपोषण करावे व हळू हळू धन घ्यावे. आणि न्यायाने आपली उपजीविका चालवावी. जो राजा प्रजेला बोकडाप्रमाणे एकदाच मारून टाकतो त्याची एकदा तृप्ती होईल; पण दुसऱ्या वेळी त्याला काही मिळेल काय? फळाच्या आशेने माळी ज्याप्रमाणे पाणी घालून रोपटी वाढवितो त्याप्रमाणे फळाची इच्छा करणाऱ्या राजाने दान आणि मान देऊन प्रजेचे पालन केले पाहिजे.

ज्याप्रमाणे दीप आपल्या वातीतून तेल शोषून घेतो व शुभ्र प्रकाश देतो त्याप्रमाणे राजाने आपल्यातील उदार गुणांच्या द्वारा प्रजेच्या संपत्तीचे शोषण करावे म्हणजे त्यास कोणीही दोष देत नाहीत. ज्याप्रमाणे गाईंना पाळून त्यांचे योग्य वेळीच दूध काढतात किंवा फळे, फुले देणाऱ्या लतांना योग्य वेळी पाणी देऊनच फळे, फुले घेतात, त्याप्रमाणेच राजाने प्रजेचे पालन करूनच लाभ घ्यावा. अगदी लहान रोप प्रयत्नाने राखले तर मोठे होऊन फळे देते; त्याप्रमाणे राजाने प्रजेचे रक्षण केले तर त्याला पुढे उत्तम फलप्राप्ती होते. त्याला सोने, रत्ने, धान्य आणि अनेक प्रकारची वाहने प्रजेकडून मिळू लागतात. प्रजेवर प्रेम करणारा राजा मोठा होतो आणि लोकांच्या नाशाबरोबर राजाचाही नाश होतो."

हे सर्व ऐकून भासुरक म्हणाला, "तुम्ही म्हणता ते खरे आहे! मी येथेच बसून राहीन, तुमच्यापैकी एक प्राणी रोज येथे आला पाहिजे. नाही तर मी सगळ्यांचाच फन्ना उडवून टाकीन!"

त्यांनी हे कबूल केले आणि ते नतर भीती न बाळगता वनात सगळीकडे फिरू लागले. तेव्हापासून रोज पाळीपाळीने एक एक जातीचा प्राणी सिंहाकडे जाऊ लागला. मग तो म्हातारा असो, वैतागलेला असो, दुःखी असो किंवा बायकामुलांचा नाश होईल म्हणून घाबरलेला असो, त्यातील एक पशू रोज दुपारी सिंहाच्या भोजनाकरिता तेथे जात असे.

काही दिवसानंतर एकदा सशाची पाळी आली. त्याची जायची मुळीच इच्छा नव्हती, तरी सर्व प्राण्यांनी सांगितल्यामुळे तो हळूहळू जात होता. त्याला उशीर होत होता. सिंहाला कसे मारावे याचा तो विचार करीत होता. मनात तो फार उदास झाला होता. रस्त्यात त्याला एक विहीर दिसली. त्या विहिरीवर चढून त्याने पाहिले, तेव्हा त्यात त्याला स्वतःचे प्रतिबिंब दिसले. ते पाहून तो मनात म्हणाला, "चांगला उपाय आहे. भासुरकाला राग आणवून तो स्वतःहून या विहिरीत येऊन पडेल अशी युक्ती मी योजीन."

नंतर तो दिवस मावळण्यापूर्वी संध्याकाळी भासुरकाकडे गेला. रोजची वेळ टळून गेल्यामुळे भासुरक भुकेने कळवळला होता व रागावून जिभल्या चाटत मनात म्हणत होता, "सकाळीच आहारासाठी वनातल्या सर्व पशूंना मारून टाकले पाहिजे."

तो अशा विचार करीत असताना ससा हळू हळू चालत त्याच्याकडे गेला व नमस्कार करून उभा राहिला. तेव्हा भयंकर संतापलेला भासुरक खवळून त्याला म्हणाला, " अरे दुष्टा सशा, एक तर तू एवढासा आणि त्यातून उशीर करून आलास ! तुला तर मारतोच, पण या अपराधाबद्दल सर्व पशूंना उद्या सकाळी मी मारून टाकणार आहे ! "

ससा विनयाने म्हणाला, " यात माझा काही अपराध नाही व पशूंचाही नाही. कारण तर ऐका ! "

" बोल लवकर ! " भासुरक म्हणाला, " माझ्या दाढेखाली सापडला नाहीस तोच बोल काय ते ! "

" स्वामी, " ससा म्हणाला, " आज आमची सशांची पाळी होती. आम्ही सर्व प्राण्यांत लहान असल्यामुळे आम्हा पाच सशांना आज पाठवले होते. आम्ही इकडे येत असताना रस्त्यात एका मोठ्या सिंहाने आम्हाला अडवले. जमिनीतील भोकातून तो बाहेर आला आणि आम्हाला म्हणाला, " काय रे, कुठे निघालात ? घ्या आता देवाचे नाव ! "

तेव्हा मी त्याला म्हणालो, " ठरलेल्या नियमाप्रमाणे भासुरक महाराजांकडे त्यांच्या भोजनासाठी आम्ही जात आहोत.' तेव्हा तो म्हणाला, " असं काय ! तर मग हे वन माझे आहे. तुम्ही सर्व पशूनी माझ्याशी करार केला पाहिजे. तो भासुरक चोर आहे. तो इथला राजा आहे काय ? मग हे चार ससे मी ओलीस ठेवतो आणि तू भासुरकाला बोलावून आण. आमच्या दोघांपैकी जो अधिक पराक्रमी ठरेल तो राजा होईल आणि ह्या सर्व सशांना खाईल." त्याच्या आज्ञेप्रमाणे निरोप सांगण्यासाठी मी तुमच्याकडे आलो आहे, उशीर होण्याचे हेच कारण आहे. पुढे काय करावयाचे हे महाराजानी ठरवावे. "

भासुरक म्हणाला, " असे आहे काय ! तर मग दाखव लवकर तो दरोडेखोर सिंह ! म्हणजे प्राण्यावरचा राग मी त्याच्यावर काढतो. म्हणतातच की, युद्धामध्ये भूमी, सोने आणि मित्र मिळतात. यातील एकही मिळण्याची शक्यता नसेल तेव्हा कधीही युद्ध करू नये. जेव्हा लवकर फळ मिळणार नसेल आणि पराभव होईल असे वाटत असेल, तेव्हा बुद्धिमानाने युद्ध सुरू करू नये."

ससा म्हणाला, " स्वामी, हे खरे; पण पराभवाची शक्यता असली तरी क्षत्रिय लोक आपल्या भूमीसाठी युद्ध करतातच. परंतु त्याने किल्ल्याचा आश्रय घेतला आहे. किल्ल्याच्या बाहेर पडून त्याने आम्हाला अडविले होते. किल्ल्यांचा आश्रय घेऊन राहणाऱ्या शत्रूचा पराभव करणे कठीण असते. म्हणतातच की, एका किल्ल्यामुळे राजाचे जे काम होते ते हजार हत्ती किंवा लाख घोड्यांच्या साह्याने सुद्धा होत नाही. किल्ल्याच्या तटावरचा एक धनुर्धर शेकडो लोकांना मारू शकतो. म्हणून नीतिशास्त्र जाणणारे किल्ल्याची प्रशंसा करतात. हिरण्यकश्यपूला घाबरून इंद्राने बृहस्पतीच्या आज्ञेवरून विश्वकर्म्याच्या मदतीने प्रथम किल्ला बांधला. त्याने वर दिला आहे की, ज्या राजाजवळ किल्ला असेल त्याचाच नेहमी जय होईल. तेव्हापासून पृथ्वीवर हजारो किल्ले बांधले गेले. ज्या राजाजवळ किल्ला नाही त्याला दात काढलेल्या सापाप्रमाणे किंवा मदहीन हत्तीप्रमाणे कोणीही जिंकू शकतो "

भासुरक म्हणाला, " किल्ल्यात असला तरी तो चोर मला दाखव. म्हणजे मी त्याला मारून टाकीन ! म्हणतातच की, रोग आणि शत्रू यांना जन्मतःच नाहीसे केले पाहिजे ! ते वाढल्यानंतर महाबळीचेही प्राण घेतात. आपले हित हवे असेल तर वाढणाऱ्या शत्रूची उपेक्षा करू नये. वाढणारा शत्रू आणि वाढणारा रोग हे सारखेच घातक असतात, असे शिष्ठ लोक सांगतात. मदांध पुरुषांना कमी ताकदीच्या शत्रूची उपेक्षा करावीशी वाटते; पण हेच लहान शत्रू वाढणाऱ्या रोगाप्रमाणे पुढे असाध्य होतात. स्वतःच्या सामर्थ्याचा व उत्साहाचा अंदाज घेऊन जो युद्ध सुरू करतो तो एकटाच असला तरी परशुरामाप्रमाणे अनेक क्षत्रियाना मारू शकतो."

" ते ठीक आहे." ससा म्हणाला, " पण मला तरी तो बलवान दिसला. म्हणून त्याचे सामर्थ्य माहीत नसताना महाराजांनी तेथे जाणे योग्य दिसत नाही. म्हणतातच की, आपल्या आणि शत्रूच्या सामर्थ्याचा अंदाज न घेता उत्साहाने शत्रूसमोर जाणाऱ्याचा, दिव्यावर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणे नाश होतो ! आपल्या ताकदीचा गर्व करून आपल्यापेक्षा जास्त सामर्थ्यवान शत्रूला मारायला जातो, त्याला माघार घ्यावी लागते व दात पडलेल्या हत्तीप्रमाणे परतावे लागते."

" तुला याच्याशी काय करावयाचे आहे ? असू दे तो किल्ल्यात. कोठे आहे तो दाखव मला फक्त."

" ठीक आहे. चला तर माझ्याबरोबर." असे म्हणून ससा पुढे चालू लागला. त्याने येताना जी विहीर पाहून ठेवली होती. तेथे आल्यावर तो भासुरकाला म्हणाला, " स्वामी ! तुमच्या तेजापुढे तो काय टिकतो ? तुम्हाला दुरूनच पाहून तो आपल्या किल्ल्यात पळाला. इकडे या म्हणजे मी तुम्हाला दाखवतो."

" त्याचा किल्ला दाखव मला." भासुरक म्हणाला.

तेव्हा सशाने त्याला ती विहीर दाखवली. ह्या मूर्ख सिंहाने आत डोकावून पाहिले तेव्हा त्याला पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब दिसले. जेव्हा त्याने सिंहगर्जना केली तेव्हा त्याचा दुप्पट जोराने विहिरीमधून प्रतिध्वनी आला. तेव्हा तो शत्रूच आहे असे समजून सिंहाने त्याच्या अंगावर उडी घेतली आणि तो मरण पावला ! सशाला आणि सर्व प्राण्यांना आनंद झाला. त्या सर्वांनी सशाची स्तुती केली आणि त्या वनात ते सुखाने राहू लागले,

" म्हणूनच मी म्हणतो की, ज्याची बुद्धी त्याचे सामर्थ्य. तेव्हा तू म्हणत असशील तर, तेथे जाऊन माझ्या बुद्धिप्रभावाने त्यांची मैत्री तोडून टाकीन."

करटक म्हणाला, " असे असेल तर तू जा. तुझा मार्ग मंगलकारक होऊ दे. तुला जसे योग्य वाटेल त्याप्रमाणे कर."

नतर एकदा संजीवक जवळ नाही असे पाहून दमनक पिंगलकाकडे गेला आणि प्रणाम करून बसला. पिंगलक त्याला म्हणाला, " काय रे, बऱ्याच दिवसांनी दिसलास ?"

" महाराजांना आमच्याकडे काहीच काम पडत नाही. म्हणून नाही आलो झालं ! परन्तु राजकार्याचे नुकसान झालेले पाहून माझं हृदय नुसतं जळत आहे ! व्याकुळ होऊन मी स्वतःहूनच निवेदन करायला आलो आहे. म्हणतातच की, ज्याचा पराभव होऊ नये असे आपल्याला वाटते त्याला हितकारक असेल ते सांगावेच. मग ते त्याला प्रिय वाटो किंवा अप्रिय. शुभ असो किंवा अशुभ असो."

त्याचे असे आडवळणाचे बोलणे ऐकून पिंगलक म्हणाला, "तुझ्या मनात काय आहे? व काय सांगायचे आहे? जे सांगण्यासारखे असेल ते सांगून टाक."

दमनक म्हणाला, "देव, संजीवक आपल्याबरोबर घात करण्याची बुद्धी बाळगत आहे. माझ्यावर विश्वास असल्यामुळे तो एकांतात मला म्हणाला, 'अरे दमनका, पिंगलकाचे एकंदर सामर्थ्य मला कळून चुकले. त्याला मारून मी सर्व पशूंचा राजा होईन आणि तुला माझा मंत्री करीन.'

हे वज्राघातासारखे भयंकर बोलणे ऐकून पिंगलक जणू बेशुद्धच पडला आणि काहीच बोलला नाही. त्याची अशी अवस्था झालेली पाहून दमनक विचार करू लागला, "याची संजीवकाबरोबर खरीच मैत्री आहे. या मंत्र्यामुळे राजाचा नाश नक्कीच होणार. म्हणतातच की, जेव्हा एकाच मंत्र्याचा सल्ला राजा ऐकतो तेव्हा त्या अधिकारामुळे मंत्री अहंकाराच्या मदात मग्न होतो. पुढे अहंकारामुळे राजसेवेचा त्याला कंटाळा येतो. त्यामुळे त्याला स्वतंत्र व्हावेसे वाटू लागते आणि त्या स्वातंत्र्यासाठी तो राजाचे प्राण घेण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा यावेळी काय करणे योग्य दिसेल बरे?"

इतक्यात पिंगलकही सावध होऊन कष्टानेच त्याला म्हणाला, "संजीवक माझा प्राणप्रिय सेवक आहे. तो माझा द्रोह करण्याची बुद्धी कशी बरे ठेवील?"

दमनक म्हणाला, "महाराज तो सेवक आहे की नाही, हे महत्त्वाच नाही. ज्याला राजलक्ष्मीची इच्छा नाही, असा कोणताही पुरुष मिळणार नाही! ज्यांना हे सामर्थ्य नसते असे लोकच राजसेवा करीत असतात."

"तरीसुद्धा माझ्या मनात त्याच्याबद्दल विपरित काहीही येत नाही. आपल्या शरीरात अनेक दोष असले, तरी ते आपल्याला आवडतेच. आपल्याला विपरित गोष्टी करीत असला तरी आवडता तो आवडताच राहतो!"

"म्हणून तर हा राजद्रोहाचा दोष उत्पन्न होतो." दमनक म्हणाला, "ज्याच्याकडे राजा आपली कृपादृष्टी वळवतो, तो कुलीन असो किंवा अकुलीन असो त्याला संपत्ती मिळतेच. शिवाय निर्गुण संजीवकात असा

कोणता विशेष गुण आहे की, ज्यामुळे महाराजांनी त्याला जवळ केले आहे? देव, हा शरीराने प्रचंड आहे, म्हणून शत्रूला मारील असा आपण विचार करीत असाल, पण त्याचा उपयोग नाही. महाराजांचे शत्रू मांसाहारी आहेत, आणि हा तर गवतखाऊ आहे! म्हणून याच्याने शत्रूचा बंदोबस्त होणार नाही. म्हणून त्याच्यावर काहीतरी आरोप ठेवून त्याला मारून टाकावे!"

पिंगलक म्हणाला, "सभेमध्ये ज्याला एकदा गुणवान म्हटले त्याचे दोष सांगू नयेत. त्यामुळे आपल्या प्रतिज्ञेचा भंग होत नाही व खोटेपणा होत नाही. शिवाय तुझ्याच सांगण्यावरून मी त्याला अभय दिले आहे. तेव्हा आता मीच त्याला कसा मारू शकेन? संजीवक हा माझा सर्वार्थाने मित्र आहे. त्याच्यावर माझा अजिबात राग नाही.

"म्हटलेच आहे की, ज्याच्याकडून एकदा समृद्धी मिळाली तो दैत्य असला तरी त्याचा नाश करणे योग्य नाही. आपण विषवृक्ष वाढवला असला तर तो आपणच तोडणे योग्य नाही. एक तर मित्रावर प्रेम दाखवू नये पण एकदा प्रेम केले तर ते दररोज वाढविले पाहिजे. ज्याला एकदा वर उचलला त्याला आपणच पुन्हा खाली पाडणे लाजिरवाणे आहे. कारण जो जमिनीवर असेल त्याला आणखी खाली पडण्याची भीतीच नसते. जो उपकार करणाऱ्यावर अपकार करतो तो कसला सज्जन? जो अपकार करणारावर उपकार करतो तोच खरा साधूपुरुष असे सज्जन म्हणतात. म्हणून त्याने माझा द्रोह करण्याची बुद्धी ठेवली तरी मी त्याच्याविरुद्ध काहीही करणार नाही."

"स्वामी द्रोह करणाऱ्याला क्षमा करावयाची हा राजधर्म नव्हे." दमनक म्हणाला, "म्हणतातच की, तुल्यसामर्थ्य, तुल्यसंपत्ती असणाऱ्या आणि अर्ध राज्य घेऊ पाहणाऱ्या उद्योगी सेवकास मारले नाही तर तो राजाचा घात करतोच! शिवाय तू याच्या मैत्रीमुळे सर्व राजधर्मच सोडून दिला आहेस त्यामुळे सर्व परिवार वैतागला आहे. कारण हा संजीवक गवतखाऊ आणि तू आणि तुझे प्रजाजन मांस खाणारे. तुम्ही जर प्राण्यांचे वध करणारे नसाल तर तुम्हाला मांसाहार कसा मिळेल.? तुझी प्रजा मांसाहार मिळाला नाही तर तुला सोडून जाईल. मग तू नष्ट झालासच!

याच्या संगतीमुळे तुम्हांला शिकार करणे आवडेनासेच होईल. म्हटलेच आहे की, सेवक आपल्या धन्यासारखे होतात त्या प्रमाणेच धनीही सेवकांचें अनुकरण करू लागतो. तापलेल्या लोखंडावर पडलेल्या पाण्याचे नाव राहत नाही परन्तु तेच पाणी कमळाच्या पानावर मोत्यासारखे शोभते आणि तेच जर स्वाती नक्षत्र लागले असता सागरातील शिपल्यात पडले तर त्याचे मोती बनतात! म्हणून बहुधा अधम, मध्यम किंवा उत्तम गुण संगतीनेच मिळत असतात. दुर्जनांच्या संगतीमुळे सज्जन लोक विपरित वागतात. दुर्योधनाच्या संगतीमुळे भीष्म गोहरण करायला गेले. म्हणूनच सज्जन लोक नीच लोकांची संगत वर्ज्य करतात. ज्याचे शील माहीत नाही त्याला आश्रय देता कामा नये. कारण; ढेकणांच्या दोषांमुळे ऊ मारली गेली."

"हे,काय आहे बुवा ?" पिंगलक म्हणाला.

दमनक कथा सांगू लागला.

## कथा नववी

## ऊ आणि ढेकूण

एका राजाचे मनोहर शयनगृह होते. तेथे दोन पांढऱ्याशुभ्र पांघरुणांच्या मध्ये मंदविसर्पिणी नावाची एक पांढरी ऊ राहत असे. ती त्या राजाचे रक्त पिऊन सुखाने काळ कंठत होती.

एके दिवशी त्या बिछान्यावर अग्निमुख नावाचा एक ढेकूण फिरत फिरत आला. त्याला पाहून ती पडलेल्या चेहऱ्याने म्हणाली, "अरे अग्निमुखा, तू या अनुचित जागी कशाला आलास ? तुला कोणी पाहत नाही तोच तू लवकर निघून जा."

" बाईसाहेब ! घरी आलेल्या पाहुण्याला तो दुर्जन असला तरी असे बोलणे योग्य नाही. ' यावे ! यावे ! बसा. विश्रांती घ्या. तुम्हाला पाहून खूप दिवस झाले नांही ? तुमच्याकडली काय हकिगत ? किती वाळलात हो ? सर्व कुशल आहे ना ? तुम्ही भेटल्यामुळे आनंद झाला.' असे घरी आलेल्याबरोबर बोलावे. हा गृहस्थधर्म आहे, आणि स्वर्गप्राप्तीचा सोपा मार्ग आहे शिवाय आतापर्यंत मी अनेक माणसांचे रक्त चाखले आहे. त्यांच्या आहाराप्रमाणे ते कडू, तिखट, तुरट किंवा आंबट अशा चवीचे होते; पण मी अद्याप मधुर रक्त चाखले नाही ! अनेक प्रकारची पक्वान्ने, भाज्या आणि पेयपदार्थ घेतल्यामुळे या राजाच्या शरीरांत गोड रक्त तयार झाले असेल. ते पिऊन मला माझ्या जिभेचे चोचले पुरवावयाचे आहेत. अर्थात तू कृपा केलीस तरच हे शक्य आहे !

" म्हणतातच की, दरिद्री काय आणि राजा काय, जिभेचे चोचले व लाड सर्वांना सारखेच असतात. जिभेचे हट्ट पुरविण्यासाठीच मनुष्य सतत प्रयत्न करीत असतो. जिभेचे लाड करणाऱ्या गोष्टी या जगात नसत्या तर कोणीही सेवक झाला नसता आणि कोणीही दुसऱ्याच्या आहारी गेला नसता. लोक असत्य बोलतात, भलत्याची सेवा करतात आणि दुसऱ्या देशातही जातात, ते सर्व उदरभरणाकरिताच ! मी भुकेने पोडलेला आहे ! आणि तुझ्या घरी भोजन मिळेल या आशेने आलो आहे. तू एकटी-नेच राजाच्या रक्ताचे भोजन करावे हे काही योग्य नाही."

मंदविसर्पिणी ऊ म्हणाली, " अरे ढेकणा, हा राजा झोपी गेल्यावरच मी त्याचे रक्त पिते. अग्निमुखा, तू पुष्कळ चपळ आहेस तरीपण माझ्या-बरोबर रक्तपान करायचे असेल तर थोडा थांब ! म्हणजे तुला पुष्कळ रक्ताचा आस्वाद घेता येईल !"

" बाईसाहेब ! मी त्याप्रमाणेच वागीन.' तो म्हणाला, " तू जोपर्यंत राजाच्या रक्ताचा आस्वाद घेतला नाहीस तोपर्यंत मीही राजाच्या रक्ताचा आस्वाद घेणार नाही. मला देवाची शपथ ! मला माझ्या गुरूची शपथ !"

ते असे एकमेकांना बोलत असताना तो राजा तेथे येऊन बिछान्यावर झोपला. तो राजा जागा असतानाच जिभेच्या लालचीमुळे तो ढेकूण त्याला घाईने चावला. म्हटलेच आहे की, पाणी तापविले तरी ते थंड होणारच !

त्याप्रमाणे उपदेशामुळे स्वभाव बदलू शकत नाही. एखाद्या वेळी अग्नी शीतल वाटेल आणि चंद्र चटका लावील पण मनुष्य आपल्या स्वभावापेक्षा निराळा वागू शकणार नाही !

तो चावल्यामुळे राजाला सुई टोचल्यासारखे वाटले आणि तो ताडकन् उठला. आणि म्हणाला, " अरे या पांघरुणामध्ये ढेकूण किंवा ऊ असली पाहिजे. ते मला चावले."

तेथे असलेल्या कंचुकींनी लगेच ते पांघरूण सूक्ष्म दृष्टीने तपासले. ढेकूण चपळ असल्याने पलंगात शिरला; पण ती मंदविसर्पिणी ऊ मात्र पांघरुणाच्या सांध्यात त्यांना दिसली आणि मारली गेली.

" म्हणून मी म्हणतो की. ज्याचे शील माहीत नाही त्याला आश्रय देऊ नये ! हे समजून घेऊन तू संजीवकाचा वध कर– नाहीतर तो तुलाच ठार करील. जवळच्यांना सोडून देऊन व बाहेरच्यांना आपल्या विश्वासात घेऊन अधिकार देतो, तो मूर्ख चंडरवाप्रमाणे मरण पावतो."

" हे काय आहे बुवा ?" पिंगलकाने विचारले,

" दमनक कथा सांगू लागला ...

## कथा दहावी
## चंडरव कोल्हा

एका वनामध्ये चंडरव नावाचा कोल्हा राहत होता. त्याला एकदा भूक लागल्यामुळे जिभेचे लाड पुरविण्यासाठी तो शहरात गेला. त्याला पाहिल्या बरोबर तेथील कुत्री सर्व बाजूंनी त्याच्या अंगावर चालून गेली आणि भुंकत चावू लागली. त्यांनी चावे घेतल्यामुळे कोल्हा प्राणाच्या भीतीने जवळच्या परटाच्या घरात शिरला, तेथे एक निळीचे एक मोठे पातेले होते. कुत्री पाठीवर आल्यामुळे कोल्हा त्या भांड्यात पडला.

त्यातून तो बाहेर निघाला तेव्हा त्याचे सर्व अंग निळे झाले होते. दुसऱ्या कुत्र्यांना तो कोल्हा आहे हे ओळखू आले नाही म्हणून ती सगळी निघून गेली. चंडरवसुद्धा तेथून दूर गेला आणि वनाच्या दिशेने जाऊ लागला.

निळा रंग कधीच निघून जात नाही. म्हणतातच की, वज्रलेप, मूर्ख लोक, स्त्रिया, खेकडा, मासा, निळा रंग आणि दारुडचा यांनी एकदा पकडले की, किंवा त्यांचा ग्रह झाला म्हणजे तो पक्काच ! त्यात बदल होत नाही

शंकराच्या गळ्यातील विषाप्रमाणे आणि तमालपत्राप्रमाणे निळ्या रंगाचा तो अपूर्व प्राणी रानातील वाघ, सिंह, चित्ता, लांडगा, वानर वगैरे प्राण्यांनी पाहिला. आणि ते भयंकर घाबरले आणि पळून जाऊ लागले. पळता पळता ते एकमेकांना सांगू लागले, याची शक्ती आणि याचा स्वभाव आपल्याला माहीत नाही. तेव्हा त्याच्यापासून लांब जावे हे बरे. म्हटलेच आहे की, स्वतःला सुरक्षित राहावयाचे असेल, तर ज्याचा स्वभाव, कुल पराक्रम आणि शक्ती माहीत नाहीत त्याच्यावर शहाण्याने विश्वास ठेवू नये.

ते सर्व पशू भयभीत झाले आहेत हे जाणून चंडरव त्यांना म्हणाला, " अरे श्वापदांनो, तुम्ही मला नुसते पाहूनच भीतीने का पळंत आहात ? भिऊ नका. प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने मला आजच निर्माण केले आणि सांगितले की, ' सध्या श्वापदांना कोणी राजा नाही. म्हणून मी तुला सर्व पशूंच्या राजपदावर अभिषेक केला आहे. ककद्रुम या नावाने पृथ्वीवर जा आणि त्या सर्व पशूंचे पालन कर. ' म्हणून मी येथे आलो आहे. तरी सर्व पशूंनी माझ्या छत्रछायेखाली राहावे. तिन्ही लोकात मी ककद्रुम राजा म्हणून प्रसिद्ध झालो आहे.'

हे ऐकून वाघ आणि सिंह यांच्या पुढाकाराने सर्व पशू त्याच्याभोवती जमा झाले आणि ' स्वामी, प्रभो, आम्हांला आज्ञा द्या ' असे म्हणू लागले. त्याने सिंहाला मंत्री बनवले. वाघाला शेजपालक केले. चित्त्याला विडा आणायचा अधिकार दिला आणि लांडग्याला द्वारपाल केले; परंतु त्याचे बांधव जे कोल्हे होते, त्यांच्याशी तो बोलायलाही तयार नव्हता. सर्व कोल्ह्यांना त्याने अर्धचंद्र देऊन दूर केले होते. अशा प्रकारे तो कारभार

करीत होता. सिंह वगैरे पशू प्राण्यांना मारून त्याच्यापुढे ठेवत. तोही राजधर्माप्रमाणे ती शिकार सर्वांना वाटून देत असे.

अशा तऱ्हेने दिवस जात असता तो एकदा सर्व प्राण्यांच्या सभेत बसला होता. त्यावेळी दूरून कोल्ह्यांच्या समुदायाची कोल्हेकुई त्याला ऐकू येऊ लागली. ती ऐकून त्याच्या शरीरावर रोमांच उठले. आणि डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. तो उठला आणि मोठ्या स्वरात ओरडू लागला.

त्याचे हे तारस्वरात ओरडणे ऐकून 'हा कोल्हा आहे' असे सिंह वगैरे यांना समजले, त्यांनी क्षणभर लाजेने माना खाली घातल्या, आणि ते एकमेकांना म्हणू लागले. "अरे, या क्षूद्र कोल्ह्याने आपल्याला फसवले ! त्याला मारून टाकू या ! कोल्ह्याने हे ऐकले आणि तो पळून जाणार इतक्यात सिंह वगैरे प्राण्यांनी त्याच जागी त्याला मारून त्याचे तुकडे तुकडे करून टाकले !

"म्हणून मी म्हणालो की, 'जवळचे आप्त सोडून जो दूरच्या लोकांना जवळ करतो तो मृत्यू पावतो."

हे ऐकून पिंगलक म्हणाला, "अरे दमनका, तो माझा घात करण्याच्या विचारात आहे, याला पुरावा काय ?"

"आज सकाळीच माझ्या समोरच त्याने निश्चय केला की, मी पिंगलकाला उद्या सकाळी ठार मारीन." दमनक म्हणाला, "याचे प्रत्यंतर उद्या तुम्हाला दिसेल. उद्या सकाळी स्वामींचे दर्शन घेण्यासाठी तो नेहमीपेक्षा वेगळ्याच जागी बसेल. त्याचे डोळे व चेहरा तांबडा लाल झाला असेल. ओठ थरथरत असतील आणि तो सर्वत्र पाहत असेल आणि तुझ्याकडे क्रोधाने पाहील ! हे सर्व तुम्ही पाहा आणि योग्य असेल ते करा."

पिंगलकाला याप्रमाणे सांगून तो संजीवकाकडे गेला आणि त्याला नमस्कार करून बसला. दुःखी मुद्रेने तो हळूहळू आलेला पाहून संजीवक त्याला आदराने म्हणाला, "मित्रा, तुझे स्वागत. फार दिवसानी दिसलास. मित्रा, तुझे कुशल आहे ना ? तू माझ्या घरी आला आहेस म्हणून तुला काय हवे ते सांग. देण्यासारखे नसेल तरीही ते मी तुला देईन. म्हणतातच की,

ज्यांच्या घरी मित्रमंडळी कामासाठी येतात तेच या जगात सभ्य व विवेकी मानले जातात आणि तेच धन्य होतात !"

"अरे, पण सेवकांचे कुशल कोठून असेल ?" दमनक म्हणाला, "राजसेवकांची संपत्ती दुसऱ्यांच्या स्वाधीन असते. त्यांचे हृदय नेहमी अस्वस्थ असते. आणि स्वतःच्या जीविताबद्दलही त्यांना विश्वास बाळगता येत नाही. सेवा करून धन मिळविण्याच्या इच्छेने सेवक काम करीत राहतात. आणि आपले शारीरिक स्वातंत्र्य पण घालवून बसतात. मनुष्याचा जन्म दुःखातच होतो. नंतर दारिद्र्य नेहमीच असते. त्यातही ही दुःखकारक सेवावृत्ती ! अशी ही दुःख परंपरा आहे. व्यास म्हणतात की, दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि सेवक हे पाच जिवंत असून मेल्याप्रमाणेच असतात ! आपल्याला हवे असेल त्यावेळी भोजन घेणे, झोप पूर्ण संपल्यावर उठणे, आणि निःशंक मनाने बोलणे सेवकाला करता येत नाही. यातूनही तो सेवक जिवंत राहतो हेच नवल ! सेवा म्हणजे कुत्र्याचे जिणे असे म्हणतात पण ते खोटे आहे. कारण कुत्रा आपल्या इच्छेनुसार हिंडू शकतो; पण सेवक दुसऱ्याच्या आज्ञेमुळेच फिरू शकतो ! संन्याशी व सेवक यांत बरेच साम्य आहे. जमिनीवर झोपणे, ब्रह्मचर्य, सडपातळ शरीर आणि कमी आहार या गोष्टी दोघांच्या सारख्या असतात; पण संन्याशी त्या धर्मासाठी करतो. आणि सेवक पापाकरिता करतो ! थंडी, उन्ह, यांतील कष्ट सेवक धन्यासाठी सहन करतो; पण त्यातून त्याला थोडेसेच मिळते. इतके कष्ट तो धर्मासाठी करील तर त्याला मुक्तीही मिळेल ! मऊ व चांगल्या आकाराचे आणि मधुर मोदक स्वतंत्रता घालवूनच मिळणार असतील, तर त्याचा उपयोग नाही."

"तुझ्या मनात काय आहे ते स्पष्ट सांग" संजीवक म्हणाला.

"मित्रा, मंत्र्याने रहस्यभेद करणे योग्य नसते." दमनक म्हणाला, "म्हटलेच आहे की, स्वामीचे रहस्य जो मंत्री फोडतो तो राजकार्याची हानी करतोच; पण त्यालाही नरकात जावे लागते. नारद म्हणतात की, 'जो मंत्री पृथ्वीपतीचे रहस्य फोडतो तो राजाचा शस्त्राशिवाय वधच करतो !' तरीसुद्धा तुझ्याबद्दलच्या मित्रप्रेमामुळे मी ते रहस्य सांगणार आहे. तू माझ्या सांगण्यावरूनच या राजावर विश्वास ठेवला आहेस. मनू म्हणतो

की, विश्वास ठेवल्यामुळे जो मारला जातो, त्याच्या हत्येचा दोष हा विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करणाऱ्यालाच लागतो.

शिवाय हा पिंगलक तुझ्याबद्दल दुष्टबुद्धी बाळगत आहे. आज तो मला एकांतात म्हणाला की, 'उद्या सकाळ होताच संजीवकाला मारतो आणि संपूर्ण परिवाराला तृप्त करून टाकतो !'

तेव्हा मी त्याला म्हणालो, "स्वामी, मित्रद्रोह करून जगणे योग्य होणार नाही. ब्राह्मणाचा वध केला तरी प्रायश्चित घेऊन शुद्ध होता येते. परंतु मित्रद्रोहाला कोणतीही शुद्धी नाही !"

तेव्हा तो रागावून म्हणाला, "अरे, दुष्ट संजीवक गवतखाऊ आहे आणि आपण मांसाहारी आहोत. त्याच्याशी वैर करणे स्वाभाविक आहे. या शत्रूची उपेक्षा कशी करता येईल ? तेव्हा साम, दाम वगैरे उपायांनी त्याला मारणे आवश्यक आहे. मारला नाही तरच आपण दोषी ठरू. कारण म्हटलेच आहे की, दुसरा उपाय शक्य नसेल तर आपली कन्या देऊनही वैऱ्याला शहाण्याने मारले पाहिजे ! शत्रूला कोणत्याही उपायांनी मारणे पाप नसते. युद्धात गुंतलेला क्षत्रिय योग्य आणि अयोग्य पाहत बसत नाही. पूर्वी अश्वत्थाम्याने झोपी गेलेल्या धृष्टद्युम्नाला मारले होतेच !"

"त्याचा हा निश्चय समजल्यामुळे मी येथे तुझ्याकडे आलो. आता विश्वासघाताचा दोष मला लागणार नाही. मी तुला गुप्त रहस्य सांगितले आहे. आता तुला सुचत असेल तसे कर."

त्याचे वज्रपातासारखे भयंकर बोलणे ऐकून संजीवक बेशुद्ध झाला ! नंतर सावध होऊन वैराग्याने म्हणाला, "म्हटलेच आहे की, स्त्रिया दुर्जनाकडे जातात, राजे लोक बहुधा मित्राशिवाय असतात, धन कृपणाकडे जाते, आणि पाऊस पर्वतावरच पडतो जो मठ्ठ, 'मी राजाचा आवडता आहे,' असे समजतो, तो शिंग नसलेला बैलच समजावा ! राजाचा अधिकारी होऊन संपत्ती मिळविण्यापेक्षा वनात जावे, भिक्षा मागावी, हमाली करावी, किंवा दरिद्री राहावे, हे सर्वात चांगले.

"मी त्याच्याबरोबर मैत्री केली हे योग्य केले नाही. कारण म्हटलेच आहे, ज्यांचे कुल आणि संपत्ती समान असते त्यांच्यातच मैत्री किंवा वाद होतात. बलवान आणि निर्बल यांच्यात होत नाहीत ! हरिण हरिणाबरोबर

राहते, गाय गायींच्या बरोबर. घोडा घोड्यांच्याच कळपांत राहतो, मूर्ख मूर्खाबरोबर आणि बुद्धिमान् बुद्धिमानांबरोबर राहतात. ज्यांचे शील आणि आचरण समान असते त्यांचीच मैत्री होते.

" मी त्याच्याकडे जाऊन त्याला प्रसन्न करू म्हटले तरी तो प्रसन्न होणार नाही. म्हटलेच आहे की, जो काही कारणामुळे रागावतो, तो ते कारण दूर केले की, पुन्हा शांतही होतो. कारण नसतानाच जो द्वेष करतो त्याला कोण संतुष्ट करू शकेल ? समुद्रावरील प्रवासाप्रमाणेच राजसेवा अनिश्चित असते ! कारण सेवक जरी भक्तीने सेवा करणारा, उपकार करणारा, दुसऱ्यांच्या हिताकरिता स्वतः झटणारा, सेवाव्यवहारात निपुण आणि विश्वासघात न करणारा असला, तरी त्याची चूक झाल्यानंतर त्याला शिक्षा भोगावीच लागते. व चुकला नाही तरी यश मिळतेच असे नाही.

" कधी कधी मैत्रीच्या भावनेने उपकार केला तरी राजा त्यांचा द्वेष करतो आणि लबाड लोकांनी क्रूरपणे उपकार केला तरी राजाला त्यांच्याबद्दल प्रेम वाटते. राजाचे अस्थिर मन समजून घेणे, फार कठीण आहे ! असा हा सेवाधर्म फार गहन आहे. योग्यांनाही त्याचे आकलन झालेले नाही !

माझ्यावर असलेली मर्जी जवळच्यांना सहन झाली नाही म्हणून पिंगलकाचे मत माझ्याविरुद्ध त्यांनी केलेले दिसते, हे मी जाणून आहे. राजसेवक दुसऱ्या सेवकावर केलेली कृपा सहन करीत नाहीत. सवत जरी चांगली असली तरी इतर सवती तिला पतीचे प्रेम मिळते म्हणून तिचा द्वेष करतातच !

जास्त गुणवान असेल, तर त्याच्यासमोर सामान्यांचा प्रभाव पडत नाही. त्यांचे लहानसहान गुणही झाकले जातात. दिव्याची ज्योत रात्रीच्या अंधारातच शोभून दिसते. सूर्य उगवल्यावर त्याची शोभा कशी दिसणार ? "

" मित्रा, असे असेल तर तुला भीती बाळगण्याचे कारण नाही." दमनक म्हणाला, दुष्ट लोकांनी त्याला राग आणला तरी तुझ्या बोलण्यातील चातुर्यामुळे तो तुझ्यावर प्रसन्न होईल."

"अरे, तू म्हणालास ते योग्य नाही. दुर्जन थोडे असले तरी त्यांच्यात राहणे शक्य नसते. ते दुसऱ्या कोणत्यातरी उपायानी मारून टाकतातच. म्हटलेच आहे की, फसवणूक करून जीवित चालविणारे क्षुद्र पंडित खूप असतात. ज्या प्रमाणे कावळा वगैरे क्षुद्र जीव एकत्र होऊन त्यांनी उंटाला मारले त्याप्रमाणे हे धूर्त योग्य किंवा अयोग्य असे कोणतेही कृत्य करतात !"

"हे काय आहे बुवा "? दमनक म्हणाला,

संजीवक कथा सांगू लागला–

## कथा अकरावी

# उंट, सिंह आणि कावळा

एका वनामध्ये मदोत्कट नावाचा एक सिंह राहत होता. त्याचे कोल्हा, कावळा, चित्ता वगैरे अनुयायी होते. एकदा ते रानामध्ये इकडे तिकडे फिरत असता क्रथनक नावाचा उंट त्यांना दिसला. तो आपल्या तांड्यातून चुकून तेथे आला होता. तेव्हा सिंह म्हणाला,

"अरे, हा कोणी अपूर्व प्राणी दिसतो ! तो रानात रहाणारा की, गावात राहणारा आहे, याची चौकशी करा."

कावळा म्हणाला, "स्वामी, हा उंट नावाचा गावातील प्राणी आहे. तुमच्या भोजनासाठी चांगला आहे ! तेव्हा त्याला मारून टाका."

"घरी आलेल्या पाहुण्याला मी मारणार नाही. म्हणतातच की, आपल्यावर विश्वास ठेवून आणि निर्भय होऊन शत्रू आपल्या घरी आला असता त्याला मारले तर शंभर ब्रह्महत्यांचे पाप लागेल. तेव्हा त्याला अभय द्या आणि माझ्याजवळ घेऊन या. म्हणजे मी त्याला इकडे येण्याचे कारण विचारतो."

त्याप्रमाणे त्या सर्व प्राण्यांनी त्याला अभय दान दिले आणि विश्वास दाखवून ते त्याला मदोत्कटाकडे घेऊन आले.त्यानेही नमस्कार केला आणि जवळ बसला. सिंहाने विचारल्यानंतर त्याने आपण तांड्यातून कसे अलग पडलो तो सर्व वृत्तान्त सांगितला. तेव्हा सिंह त्याला म्हणाला, " अरे क्रथनका, तू पुन्हा गावात जाऊन मोठी ओझी वहाण्याचे कष्टदायक काम करू नकोस. या वनात शंका न बाळगता पाचूसारखे दिसणारे कोवळे गवत चर आणि माझ्याबरोबर राहा."

तो " ठीक आहे " असे म्हणाला. आणि त्या प्राण्यांत निर्भयपणे सुखाने राहू लागला.

एक दिवस मदोत्कटाचे वनातील मोठ्या हत्तीबरोबर युध्द झाले. त्या युध्दात हत्तीच्या मुसळासारख्या सुळ्यामुळे त्याला खूप जखमा झाल्या; परंतु प्राण गेले नाहीत ! शरीर दूर्बळ झाल्यामुळे त्याला एक पाऊल चालणेही शक्य नव्हते. त्यामुळे कावळा वगैरे त्याचा सर्व परिवार भूकेने बेजार झाला व दुःख भोगू लागला. तेव्हा त्या सर्वांना सिंह म्हणाला, " अरे, तुम्ही कोठून तरी एखादा प्राणी शोधून आणा. म्हणजे अशा स्थितीतही मी त्याला मारून तुम्हाला भोजन मिळवून देईन."

त्या चारही जणांनी भटकायला सुरुवात केली. परंतु त्यांना एकही प्राणी आढळला नाही. म्हणून कोल्हा आणि कावळा एकमेकांत विचार करू लागले. कोल्हा म्हणाला, " अरे कावळ्या, जास्त भटकून काय मिळणार ? आपल्या स्वामीवर विश्वास ठेऊन राहणारा हा क्रथनक आहेच की ! त्याला मारून आपले प्राण वाचवावेत. "

" तू योग्यच बोलतोस !" कावळा म्हणाला. " पण याचा वध होणार नाही असे स्वामीने अभय दिले आहे ना ?"

" अरे कावळ्या, मी स्वामीला विनंती करतो आणि ज्यामुळे स्वामी याला मारतील असे करतो. तुम्ही सर्व येथेच थांबा ! मी घरी जाऊन स्वामींची परवानगी घेऊन परत येतो. "

असे बोलून कोल्हा सिंहाकडे गेला.

सिंहाकडे जाऊन तो म्हणाला," स्वामी ! आम्ही सर्व वन फिरून आलो; पण एकही प्राणी मिळाला नाही ! तेव्हा मी काय करावे ? सध्या भुकेमुळे

आम्हाला एक पाऊलही टाकता येणे शक्य होत नाही. तूही पथ्यावरच आहेस. म्हणून तुझी आज्ञा होत असेल, तर कथनकाच्या मांसावर तुझे पथ्यपाणी करता येईल."

त्याचे हे भयंकर बोलणे ऐकून सिंह रागाने म्हणाला, "अरे नीच पाप्या! तुझा धिक्कार! पुन: असे बोललास तर त्या क्षणीच तुझा वध करीन! त्याला मी अभयदान दिले आहे तेव्हा आता त्याला कसे मारता येईल? कारण म्हणतातच की, गोदान, पृथ्वीदान, अन्नदान या सर्वांपेक्षा अभयदान हे सर्वांत श्रेष्ठ दान आहे असे शहाणे लोक म्हणतात."

कोल्हा म्हणाला, "स्वामी! अभयदान देऊन त्याचा वध केला तर तो दोष ठरेल; पण स्वामींच्या भक्तीमुळे तो आपले जीवित अर्पण करणार असेल तर त्यात दोष नाही. तो जर स्वत:च मरण्यासाठी तयार असेल तरच त्याला मारा. नाहीतर मग आमच्यापैकी एखाद्याला मारा. कारण स्वामी पथ्यावर असल्यामुळे भुकेमुळे त्यांची शेवटची अवस्था येऊ शकेल. महाराजांच्याकरिता उपयोग होणार नसेल तर हे प्राण ठेवून काय करायचे आहे? स्वामीचे जर काही अनिष्ट झाले तर त्यांच्या मागे आम्ही सर्व अग्निप्रवेशच करणार! म्हणतातच की, कुलातील प्रमुख पुरुषाचे सर्व प्रयत्नांनी रक्षण करावे! तो नष्ट झाल्यास कुलच नष्ट होते! रथाच्या चाकांची नाभी (मध्यभाग) मोडल्यावर दांड्यावर रथ चालत नाही."

हे सर्व ऐकून मदोत्कट म्हणाला, "असे आहे तर तुझ्या इच्छेप्रमाणे कर!"

कोल्हा लगेच इतरांकडे गेला व म्हणाला, "मित्रांनो, स्वामींची अवस्था चिंताजनक आहे. तेव्हा भटकून काय उपयोग? त्यांच्याशिवाय आपले कोण रक्षण करील? भुकेमुळे ते परलोकाला चालले आहेत. त्यांच्याकडे आपण जाऊ आणि आपल्या शरीराचे दान करू! म्हणजे त्यांच्या कृपेच्या कर्जातून आपली मुक्तता होईल! म्हणतातच की, सेवक पाहत असताना स्वामी संकटांत सापडतो आणि आपले प्राण असतांनाही सेवक त्यांचे रक्षण करीत नाही, तो सेवक नरकात जातो."

त्यानंतर ते सर्व अश्रूभरल्या डोळ्यांनी मदोत्कटाकडे गेले. आणि

नमस्कार करून बसले. त्यांना पाहून मदोत्कटाने विचारले, "काय रे एखादा प्राणी मिळविला का ? निदान दिसला तरी का ?"

त्यांच्यातील कावळा म्हणाला, "आम्ही सगळीकडे हिंडलो; पण एकही प्राणी मिळाला नाही किंवा दिसला नाही ! तेव्हा आता मलाच खा. आणि आपले प्राण वाचवा ! त्यामुळे आपल्यालाही थोडी शक्ती येईल आणि मला स्वर्गप्राप्ती होईल. म्हटलेच आहे की, जो सेवक आपले प्राण स्वामीसाठी भक्तीपूर्वक देतो त्याची म्हातारपण आणि मरण यातून सुटका होते व तो अढळपद मिळवितो !"

कोल्हा म्हणाला, "अरे, तुझा देह तर एवढासा ! तुला खाऊन महाराज जगतील असे नाही ! शिवाय त्यात दोषही आहेच ! कावळ्याचे थोडेसे मांस, त्यातही कुत्र्याने उष्टे केलेले खाऊन तृप्ती होत नाही. तू स्वामीभक्ती दाखवत आहेस यातच तू धन्याचे अन्न खाल्ल्याचे ऋण फेडलेस ! तुझी दोन्ही लोकांत प्रशंसा होईल. तू आता मागे हो म्हणजे मी महाराजांना विनंती करतो."

तसे केल्यावर कोल्ह्याने आदराने नमस्कार केला आणि तेव्हा तो म्हणाला, "स्वामी ! मला खाऊन तुझे प्राण वाचव आणि मला दोन्ही लोकांची प्राप्ती करून दे !" म्हणतातच की, सेवकांना धन मिळते. त्यामुळे त्यांचे प्राण नेहमीच धन्याच्या स्वाधीन असतात. धन्याने ते घेतले तर त्यात दोष नसतो !"

हे ऐकून चित्ता म्हणाला, "वाहवा ! तू छानच बोललास ! तुझा देहही लहानच आहे. तुझी आयुधेही नखेच आहेत. म्हणजे तू स्वामीच्या जातीचाच. त्यामुळे तू महाराजांना अभक्ष्य आहेस. म्हटलेच आहे, प्राण कंठाशी आले तरी शहाण्याने अभक्ष्य खाता कामा नये. ते थोडे असेल तर प्राणही वाचणार नाहीत आणि परलोकही मिळणार नाही. तू तुझा कुलीनपणा दाखविला आहेसच ! म्हणतातच की, राजे कुलीनांना जवळ करतात. कारण ते प्रारंभी–मध्यंतरी किंवा अंतसमयी बदलत नाहीत. तेव्हा तू मागे सर म्हणजे मी महाराजांना विनंती करतो."

तेव्हा कोल्हा मागे सरला आणि चित्ता नमस्कार करून मदोत्कटाला म्हणाला, "स्वामी! माझे प्राण घेऊन आपले जीवन जगवा ! माझी कीर्ती

पृथ्वीवर पसरू दे ! व मला नित्य स्वर्गवास लाभू दे ! आता विकल्प मनात आणू नका ! स्वामीच्या कामासाठी अनुयायी सेवकाला मृत्यू आला तर त्याला अक्षय स्वर्गवास मिळतो आणि पृथ्वीवर त्याची कीर्ती पसरते."

हे सर्व ऐकून क्रथनक मनात विचार करू लागला, 'ही सर्व शोभेचीच भाषणे दिसतात ! कारण एकालाही स्वामींनी मारले नाही. आता मीही काळवेळ पाहून विनंती करतो. म्हणजे हे तिघेही माझ्या बोलण्याची प्रशंसा करतील '

असा निश्चय करून तो म्हणाला, " अरे, तू सत्य बोललास ! पण तूही नखांची आयुधे असणाराच प्राणी आहेस. तुला महाराज कसे बरे खातील ? म्हटलेच आहे की, जो आपल्या स्वजातीचे अनिष्ट केवळ मनातही आणील त्याला त्याचे वाईट फळ या जगात आणि परलोकातही भोगावे लागेल. म्हणून तू मागे सर म्हणजे मी स्वामीला विनंती करीन !

त्याप्रमाणे झाल्यानंतर क्रथनक पुढे गेला आणि नमस्कार करून म्हणाला,

" स्वामी, हे सर्व तुम्हाला अभक्ष्य आहेत ! तेव्हा माझे प्राण घेऊन तुमचे जीवन जगवा ! म्हणजे मला दोन्ही लोक मिळतील ! म्हटलेच आहे की, यज्ञ करणाऱ्याला किंवा योगी पुरुषाला जो गती मिळू शकत नाही ती धन्याकरता प्राण अर्पण करणाऱ्या श्रेष्ठ सेवकाला मिळते !"

तो असे म्हणत आहे इतक्यात सिंहाच्या आज्ञेवरून कोल्ह्याने आणि चित्त्याने त्याच्या दोन्ही कुशी फाडल्या आणि क्रथनकाचे प्राण गेले ! नंतर भुकेने व्याकूळ झालेल्या त्या सर्वांनी त्याला खाऊन टाकले.

म्हणून मी म्हणतो की फसवून जीवित चालविणारे क्षुद्र पंडित खूप असतात."

" मित्रा, तुमचा राजा क्षुद्र जीवाच्या परिवारामध्ये आहे ! चांगल्या पुरुषांनी त्याची सेवा करू नये हे मी जाणले आहे ! म्हटलेच आहे की, अनिष्ट प्रकृतीच्या परिवाराने वेढलेला राजा जनतेला आवडत नाही ! कारण तो गिधाडांच्या समूहात राहणाऱ्या हंसाप्रमाणे वागू लागतो. भोव-तालचा परिवार हंसासारखा असेल, तर गिधाडासारखे आचरण करणाऱ्या

राजाची सेवा करावी; पण राजाचा परिवार जर गिधाडाचा असेल तर हंसाप्रमाणे असलेल्या राजाचेही सेवक होऊ नये.

" कोणीतरी दुष्टाने माझ्या विरुद्ध त्याला सांगितल्यामुळे तो रागावला आहे आणि असे बोलत आहे. मृदू पाणी सारखे पडून पर्वत झिजून जातात, तर चुगलखोर लोकांनी सतत कानाशी लावून सांगितलेल्या चुगल्यांमुळे माणसाच्या कोवळ्या हृदयाची काय स्थिती होत असेल ?

कानात ओतलेल्या विषामुळे बालिश लोक कायकाय करतील याचा काय नेम सांगावा ? ते क्षपणक होऊन, नागडे होऊन माणसाच्या कवटीतून दारूही पितील ! किंवा म्हणतातच की, सर्पाला पायाखाली तुडविले किंवा काठीने मारले तरी तो ज्याला स्पर्श करतो त्यालाच तो मारू शकतो. परंतु दुष्ट माणसे एकाच्या कानाला लागतात आणि दुसऱ्यालाच समूळ मारून टाकतात. दुष्ट माणसाची काय ही भयंकर वागणूक ! खलरूपी भुजंग एकाच्या कानी लागतो आणि दुसऱ्यालाच मारतो. अशी त्याची विपरीत करणी असते.

" अशी सर्व परिस्थिती असताना मी काय केले पाहिजे ? तू माझा मित्र आहेस म्हणून मी तुला विचारतो !"

दमनक म्हणाला, " तू येथून दुसऱ्या देशास जा. तेच योग्य होईल ! अशा वाईट धन्याची सेवा करणे चांगले नाही ! कारण योग्य आणि अयोग्य न समजणाऱ्या, वाईट मार्गाने जाणाऱ्या गुरूलाही सोडून देणेच योग्य !"

संजीवक म्हणाला, " पण माझ्यावर स्वामी रागावले असताना दुसरीकडे जाणे शक्य नाही. कारण तेथे जाऊनही मला शांतता लाभणार नाही. मोठ्यांचा अपराध जो करतो त्याने 'मी लांब आहे,' अशा विश्वासावर अवलंबून राहू नये. कारण हुशार लोकांचे हात लांब असतात आणि ते अपराध करणाऱ्यांना मारू शकतात. म्हणून युद्ध सोडून दुसरे मला काहीही श्रेयस्कर दिसत नाही ! म्हणतातच की – तीर्थयात्रा करून, तप करून, आणि चांगले दान देऊन स्वर्गप्राप्तीची इच्छा करणाऱ्यांना जे परलोक मिळणे कठीण जाते ते परलोक रणांगणावर प्राण देणाऱ्या सुशील आणि वीर पुरुषांना एका क्षणात मिळतात. युद्धात प्राण गेले तर स्वर्ग मिळतो व जगला तर कीर्ती मिळते. शूर लोकांना असे दोन्ही फायदे होत असतात.

युद्धामध्ये कपाळावरून रक्त गळून ते शूर माणसाच्या तोंडात जात असेल तर त्याला सोमपान केल्याचे पुण्य लागते ! होम, विधीपूर्वक दान, ब्राह्मणांचा सत्कार, दक्षिणा देऊन केलेला यज्ञ, तीर्थक्षेत्री निवास, चांद्रायणव्रत वगैरे-मुळे जे पुण्य मिळते ते पुण्य युद्धात मृत्यू आल्याने त्याच क्षणी मिळते !"

हे सर्व ऐकून दमनकाने मनात विचार केला, या दुष्टाने युद्ध करण्याचा निश्चय केलेला दिसतो. याने जर आपल्या टोकदार शिंगांनी स्वामीवर प्रहार केला तर मोठाच अनर्थ होईल ! तेव्हा याला पुन्हा मी असा उपदेश करतो, की तो पटला तर तो आपणहून दुसऱ्या देशात जाईल.

म्हणून दमनक म्हणाला, "मित्रा, तू म्हणतोस ते योग्यच आहे. पण स्वामी आणि सेवक यांची कधी लढाई होते काय ? म्हटलेच आहे की, शत्रू शक्तीमान असेल तर आपण न रागावता शांत राहावे. बलवान लोकां-बरोबर शरदऋतूतील चांदण्याप्रमाणे शांत असावे. शत्रूचा पराक्रम न जाणता जो वैर सुरू करतो, त्याला समुद्राने टिटव्याकडून पराभव पत्करला त्याप्रमाणे पराभव स्वीकारावा लागतो.

"हे काय आहे बुवा '? संजीवक म्हणाला.

दमनक कथा सांगू लागला.

## कथा बारावी

# टिटवी आणि समुद्र

एका समुद्रकिनाऱ्यावर टिटवीचे एक जोडपे राहत होते. काही दिवसांनी ठरलेला ऋतू आल्यावर टिटवी गर्भार राहिली. तिच्या प्रसूतीची वेळ जवळ आली तेव्हा ती टिटव्याला म्हणाली, "अहो, माझ्या प्रसूतीची वेळ आली आहे. म्हणून जेथे उपद्रव होणार नाही अशी जागा शोधून काढा. म्हणजे मी तेथे अंडी घालीन,"

" प्रिये, हा समुद्रप्रदेश रम्य आहे. या ठिकाणीच अंडी घाल." टिटवा म्हणाला.

" पण पौर्णिमेला भरती असते तेव्हा मत्त हत्तीसुद्धा आत ओढले जातात. म्हणून दूर कोठेतरी दुसरी जागा शोधून काढा ना!" टिटवी म्हणाली.

" अग, तुझे म्हणणे योग्य नाही." टिटवा हसून म्हणाला, " आपली अंडी पळवून नेण्याची समुद्राची काय ताकद आहे? ज्या भयंकर वणव्या-मुळे सर्व आकाश धुराने भरून जाते त्यात आपणहून प्रवेश करील असा मूर्ख कोण आहे? मत्त हत्तीची गंडस्थळे फोडून दमून जाऊन झोपलेल्या साक्षात यमासारख्या सिंहाला यमलोकाच्या दर्शनाची इच्छा करणाराच फक्त जागे करील! यमाच्या घरी स्वतः जाऊन 'शक्ती असेल तर घे माझा प्राण,' असे निर्भयपणे कोण म्हणू शकेल? सकाळी धुके पसरले असता आणि थंडगार वारा वहात असताना गुणदोष जाणणारा कोणता मनुष्य पाण्यात स्नान करून थंडी घालवू पाहील? तेव्हा चिंता न करता येथेच अंडी घाल. जो पराभवाच्या भीतीने आपली जागा सोडून जातो त्या माणसाच्या आईला पुत्रवती म्हटले तर वंध्या कोणाला म्हणता येईल?"

हे ऐकून समुद्र मनाशी म्हणाला, 'या क्षुद्र पक्ष्याचा काय हा गर्व! आकाश मोडून खाली पडेल म्हणून त्यास टेकू देण्यासाठी हे टिटवे पाय वर करून बसतात! परंतु आपल्या मनाच्या कल्पनेप्रमाणे कोण गर्व करीत नाही? मी जर याची अंडी पळवून नेली तर हा काय करील हे कुतूहल म्हणून तरी करून पाहण्यास हरकत नाही.' असा विचार करून तो स्वस्थ राहिला.

नंतर पुढे टिटवीने अंडी घातली आणि ते दोघे आपले अन्न शोधायला ले असता समुद्राने भरती आणून अंडी पळवून नेली. परत आल्यावर अंड्याची जागा रिकामी पाहून टिटवी रडत रडत टिटव्याला म्हणाली, " अरे मूर्खा, मी पहिल्यांदाच तुला सांगितले होते की, समुद्राच्या भरतीमुळे अंड्यांचा नाश होईल. आपण कोठेतरी लांब जाऊ; पण तू मूर्खासारखा अहंकारी झालास आणि माझे ऐकले नाहीस. आपले हित चिंतणाऱ्या

मित्रांचा सल्ला जो ऐकत नाही, तो मूर्ख काठीपासून सुटलेल्या कासवा-प्रमाणे मरण पावतो."

"हे कसे काय बुवा ?" टिटवा म्हणाला,

टिटवी कथा सांगू लागली...

## कथा तेरावी

# कासव आणि हंस

एका सरोवरात कंबुग्रीव नावाचे कासव राहत होते. संकट आणि विकट या नावाचे दोन हंस त्याचे निकटचे मित्र होते. रोज सरोवराच्या काठी येऊन ते देव आणि ऋषी यांच्याबद्दल गप्पागोष्टी करीत नि संध्याकाळ झाली की, आपल्या घरट्यात परत जात.

काही दिवसानी एकदा दुष्काळामुळे सरोवराचे पाणी हळूहळू आटू लागले. कासवाच्या दुःखामुळे दुःखी झालेले ते दोघे हंस म्हणाले, 'अरे मित्रा, हे सरोवर वाळून यात फक्त चिखलच राहिला आहे. त्यामुळे तुझे कसे होईल या विचाराने आमच्या हृदयात खळबळ माजली आहे !'

कंबुग्रीव कासव म्हणाला, "अरे, पाणी नसल्याने आमच्या जीविताची खात्री दिसतच नाही. तरी यातून एखादा उपाय निघतो का याचा विचार केला पाहिजे. संकटाच्या काळात धैर्य सोडता कामा नये. धीर धरल्यामुळे संकटातून सुटका होण्याचा संभव असतो. समुद्रात जहाज फुटते तेव्हा व्यापारी समुद्र तरून जाण्याची इच्छा करतोच. मनूनें सांगितले आहे की, बुद्धिमान मनुष्य बांधवांकरिता आणि मित्रांकरता नेहमी प्रयत्न करतो. कारण प्रयत्नांमुळेच संकट दूर होण्याची शक्यता असते. तुम्ही एखादी बळकट काठी किंवा घट्ट दोर शोधून आणा. पाण्याने खूप भरलेले एखादे

सरोवर शोधून काढा. मी काठी मध्यभागी दातांनी घट्ट धरून ठेवीन आणि तुम्ही दोघे ती काठी दोन्ही बाजूला धरून मला त्या सरोवराजवळ पोचवा."

ते हंस म्हणाले, "मित्रा, आम्ही तसेच करू बरे! पण तू मौनव्रत धरले पाहिजेस. नाहीतर काठीतून सुटून खाली पडशील."

याप्रमाणे व्यवस्था करून ते कासवाला घेऊन जाऊ लागले. जाता जाता त्यांना एक गाव दिसले. गावातील लोकांनी त्यांना पाहिले आणि ते आश्चर्याने एकमेकाला म्हणू लागले, हे पक्षी कोणती तरी चक्राकार वस्तू नेत आहेत, पाहा! पाहा!"

त्यांचा हा गोंगाट ऐकून कासवाला राहवले नाही. 'हा कसला गोंगाट' असे म्हणण्यासाठी त्याने तोंड उघडले तोच तो खाली पडला. तेव्हा गावकऱ्यांनी त्याचे तुकडे तुकडे करून टाकले!

"म्हणून मी म्हणाले की, हितकारक मित्रांच्या सल्ल्याप्रमाणे जो वागत नाही. तो मृत्यू पावतो.

"त्याचप्रमाणे अनागतविधाता व प्रत्युत्पन्नमती हे दोघे सुखाने राहू लागले. पण यद्भविष्य नाश पावला."

"हे काय आहे बुवा?" टिटव्याने विचारले.

टिटवी कथा सांगू लागली....

## कथा चौदावी

# तीन मासे

एका सरोवरात अनागतविधाता, प्रत्युत्पन्नमती, आणि यद्भविष्य या नावाचे तीन मासे राहत होते. एकदा ते सरोवर पाहून तेथून जात असलेले कोळी म्हणाले, "अरेच्या! या सरोवरात पुष्कळ मासे दिसतात.

आपल्याला आजपर्यंत हे कसे आढळले नाहीत ? आज तर आपल्याला पोटापुरते मिळाले आहेत. संध्याकाळही झाली आहे. उद्या सकाळी इकडेच यायचे हे नक्की !"

त्यांचे ते वज्राघातासारखे बोलणे ऐकून अनागतविधात्याने सर्व माशांना बोलावले. आणि तो म्हणाला, ' आपण सर्वांनी तो कोळी काय म्हणाला ते ऐकलेच असेल. म्हणून आज रात्रीच आपण जवळच्या सरोवरात जाऊ. शत्रू बलवान् असेल, तर अशक्तांनी पळून जावे किंवा किल्ल्याचा आश्रय घ्यावा. याशिवाय दुसरा मार्ग नसतो. उद्या सकाळी ते कोळी नक्कीच येतील. आणि माशांचा नाश करतील असे माझ्या मनात येत आहे ! सांप्रत येथे क्षणभरही राहणे योग्य नाही."

" अरे, तू खरे तेच बोललास." प्रत्युत्पन्नमती म्हणाला. " मलाही हेच योग्य वाटते तेव्हा दुसरीकडे जाऊ या. म्हटलेच आहे, परदेशात जाण्याची भीती वाटणारे लोक कावळे, क्षुद्र पुरुष, हरिण, षंढ लोक यांचेप्रमाणे स्वदेशातच मृत्यू पावतात. जो सर्व ठिकाणी जाऊ शकतो त्याने स्वदेशाच्या प्रेमामुळे तेथेच राहून का नाश करून घ्यायचा ? ' वडिलांची विहीर बरी, असे म्हणणाऱ्या क्षुद्र पुरुषांना नेहमी खारे पाणीच प्यावे लागते !"

त्यांचे हे संभाषण ऐकून यद्भविष्य मोठ्याने हसून म्हणाला, " तुम्ही एकत्र येऊन जो बेत केला आहे तो योग्य नाही. केवळ कोळ्यांच्या बोलण्यामुळेच वाडवडिलांपासून चालत आलेले हे सरोवर सोडून देणे कितपत योग्य आहे ? जर आयुष्यच संपले असेल, तर कोठेही गेले तरी मृत्यू हा ठेवलेलाच ! संरक्षण नसले तरी दैव तारते आणि संरक्षण असले तरी दैव मारते. रानात सोडलेला अनाथ जीव जगतो आणि खूप प्रयत्न करूनही घरात मरण येऊ शकते. म्हणून मी काही येणार नाही. तुम्हांला जे सुचेल त्याप्रमाणे तुम्ही करा."

त्याचा निश्चय पक्का आहे हे पाहून अनागतविधाता आणि प्रत्युत्पन्नमती आपल्या परिवारासह निघून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या कोळ्यांनी सर्व सरोवर शोधून यद्भविष्यासह सर्व मासे पकडून त्या सरोवरात मासेच शिल्लक ठेवले नाहीत.

अंडी फुटून गेल्यामुळे चिमणी खूप रडू लागली व दुःख करू लागली. एक सुतार पक्षी त्यांचा मित्र होता. तिच्या दुःखामुळे तो दुःखी झाला व तिचे रडणे ऐकून म्हणाला, " बाईसाहेब, उगीच का रडता ? मृत पावलेल्या, नष्ट झालेल्या आणि नाहीशा झालेल्या गोष्टीकरिता पंडित दुःख करीत नाहीत. शहाण्यांत आणि मूर्खांत हाच तर फरक असतो. या जगात प्राण्यांबद्दल शोक करू नये. जो मूर्ख त्यांच्याबद्दल दुःख करतो तो एकाचवेळी दोन दु.खे ओढवून घेतो. तुम्ही रडला तर मृत माणसाच्या प्रेताला तुमचे कफासहित अश्रू गिळावे लागतात. म्हणून न रडता मृताची उत्तरक्रिया नीट करावी. "

" हे सगळे खरे, " चिमणी म्हणाली, " पण त्या दुष्ट हत्तीने मदाने धुंद होऊन माझ्या अंड्यांचा नाश केला ! तू जर माझा खरा मित्र असशील, तर या नीच हत्तीला ठार मारण्यासाठी काहीतरी उपाय शोधून काढ. तो अंमलात आणल्यामुळेच माझे संततीच्या नाशाचे दुःख नाहीसे होईल. म्हणतातच की संकटात असताना ज्यांनी आपले अहित केले आणि कठीण परिस्थिती असताना जे कुजकेपणे हसले अशा व्यक्तीवर अपकार करण्याचे सामर्थ्य असेल तर त्या माणसाला पुनर्जन्माचा आनंद वाटतो ! "

"बाईसाहेब,तुम्ही खरे तेच बोललात !" सुतार पक्षी म्हणाला, "म्हटलेच आहे की, दुसऱ्या जातीचा असला तरी सकटांत मदत करतो तोच खरा मित्र ! मनुष्याच्या चांगल्या दिवसात सगळेच मित्र असतात ! पित्याची भक्ती करतो तोच खरा पुत्र ! कर्तव्य जाणतो त्यालाच सेवक म्हणावे. संकटात धाऊन येतो त्यालाच मित्र म्हणावे, आणि जी सर्व सुखे देते तिलाच पत्नी म्हणावे. आता माझ्या बुध्दीचा प्रभाव पाहा. परंतु वीणारव नावाची एक माशी माझी मैत्रीण आहे. तिला बोलावून आणतो म्हणजे मग तिच्या मदतीने त्या दुष्ट हत्तीला मारता येईल."

त्याप्रमाणे चिमणीला बरोबर घेऊन तो माशीकडे गेला आणि म्हणाला, ' ही चिमणी माझी मैत्रीण आहे. एका दुष्ट हत्तीने तिची अंडी फोडून टाकली. त्या हत्तीला ठार करण्याचा उपाय मी शोधत आहे. यात तू आम्हाला मदत केली पाहिजेस.'

माशी म्हणाली, ' मित्रा, याबाबत तू सांगायला का पाहिजेस ? मैत्रीची परतफेड करण्यासाठी मित्राला जे आवडते ते केलेच पाहिजे. मित्राच्या मित्राचे जे काम ते याहून निराळे थोडेच आहे ? हे सर्व खरे, तरीपण मेघनाद नावाचा बेडूक माझा मित्र आहे. त्यालाही बोलावून आणू आणि मगच काय ते करू. कारण आपले हितचिंतक, शास्त्र जाणणारे बुद्धिमान आणि मोठे लोक व विद्वान यांच्या सल्ल्याने केलेला बेत कधीही अयशस्वी होत नाही."

यानंतर ते तिघेही मेघनादाकडे गेले आणि त्यांनी त्याला सर्व हकिगत सांगितली. तो म्हणाला, " आपण सर्व रागावल्यानंतर त्या बिचाऱ्या हत्तीचे काय चालणार ? मी सांगतो ती युक्ती योजा. अग वीणारवे, ' तू दुपारच्या वेळी जा आणि मदाने उद्धट झालेल्या त्या हत्तीच्या कानाजवळ वीणानादासारखा आवाज कर. त्या आवाजामुळे, त्या आवाजाचे सुख अनुभवण्यासाठी तो अर्धवट डोळे मिटून घेईल.त्यावेळी सुतार पक्ष्याने आपल्या चोचीने त्याचे डोळे फोडावे. मी एका खोल खड्ड्याशेजारी परिवारासह बसून आवाज काढीन. तेव्हा तेथे सरोवर आहे असे समजून तहानेलेला तो हत्ती त्या खड्ड्याकडे पाणी पिण्याकरिता येईल, आत पडेल, आणि मरून जाईल! अशा प्रकारे आपण सहकार्याने वागलो तरच आपण वैऱ्याचा सूड घेऊ शकू. "

ठरल्याप्रमाणे त्यांनी आपली कामे केली. त्या माजलेल्या हत्तीने माशीचे गुणगुणणे ऐकून डोळे मिटले. सुतार पक्ष्याने त्याचे डोळे फोडले. बेडकाच्या आवाजानुसार तो जाऊ लागला व खड्ड्यात पडून मेला.

म्हणून मी म्हणते की " अनेकांच्या विरोधामुळे हत्तीसुद्धा मारता येतो ! "

टिटवा म्हणाला, " प्रिये ? तसेच करू या ! माझ्या मित्रमंडळींना घेऊन मी समूद्र कोरडा करीन."

असे ठरवून त्याने बगळा, सारस, मोर वगैरे पक्ष्यांना बोलाविले आणि तो म्हणाला, " मित्रांनो ! समुद्राने माझी अंडी पळवून मला पराभूत केले आहे ! तेव्हा या समुद्राला कोरडा करण्याचा उपाय शोधून काढा ! "

त्या सर्वांनी आपसात विचार केला आणि ते म्हणाले, " समुद्र शोषून घेण्याची आपली शक्ती नाही. मग व्यर्थ प्रयत्न कशाला करायचे ? जो निर्बळ शक्तीमान शत्रूबरोबर उद्धटपणामुळे युद्ध करतो त्याला दात तुटलेल्या हत्तीप्रमाणे माघार घ्यावी लागते. आपला सर्वांचा राजा गरुड आहे. त्याला आपल्या अपमानाची कथा सांगू. म्हणजे स्वजातीच्या पराभवामुळे तो रागावेल व सूड घेईल. नेहमीच्या मित्राला, गुणी सेवकाला, मनाप्रमाणे वागणाऱ्या पत्नीला, आणि बलवान धन्याला जर आपले दुःख निवेदन केले तर त्यातून सुखच मिळते ! तरी आपण सर्व गरुडाकडे जाऊ ! तोच आपला स्वामी आहे."

त्याप्रमाणे सर्व पक्षी गरुडाकडे गेले. त्यांचा चेहरा खिन्न झाला होता. आणि डोळ्यात अश्रू दाटले होते. करुण आवाजात, सुस्कारे टाकत ते म्हणाले, " अहो, तुम्ही आमचे स्वामी असताना या सज्जन टिटव्याची अंडी समुद्राने पळवून नेली. काय हा अनर्थ ! पक्षीकुल आता नष्टच झाले म्हणून समजा ! समुद्र आपल्या इच्छेप्रमाणे दुसऱ्या पक्ष्यांनाही मारून टाकील. म्हटलेच आहे की, एकाने अनिष्ट काम केलेले पाहून दुसराही तसेच काम करू लागतो. या जगात लोक विचार करणारे नसून गतानुगतिक आहेत ! लबाड, चोर, दुर्जन, दरोडेखोर आणि कट करणारे यांच्यापासून त्रास होणाऱ्या प्रजेचे रक्षण करणे जरूर आहे. राजा प्रजेचे रक्षण करण्यात तत्पर असेल, तर त्याला प्रजेच्या पुण्याचा सहावा भाग मिळतो. आणि रक्षण करीत नसेल तर पापाचा सहावा भाग घ्यावा लागतो ! प्रजेला होणाऱ्या पीडेचा संतापरूपी अग्नी राजाची संपत्ती, कुळ, आणि प्राण नष्ट केल्यावरच शांत होतो !

" ज्यांना भाऊ नसतील त्यांचा भाऊ राजाच ! व आंधळ्यांचे डोळे तोच ! आपल्या न्यायी वर्तनामुळे राजा सर्वांना आईबापांसारखा वाटतो. ज्याप्रमाणे माळी कोवळ्या अंकुरांना वाढवितो त्याप्रमाणे राजाने दान आणि मान देऊन प्रजेला सांभाळले पाहिजे. तरच त्याला फळ मिळेल ! प्रजेकडून राजाला सोने, धान्य, विविध वाहने, रत्ने वगैरे अनेक सुखाची साधने मिळतात. राजाने या प्रजेला सुरक्षित ठेवले नाही तर त्याला ही सुखे मिळणार नाहीत !"

हे सर्व ऐकून गरुड त्यांच्या दुःखामुळे दुःखी झाला आणि त्याला संतापही आला. त्याने मनात विचार केला, 'पक्ष्यांनी सांगितलेले खरे आहे! आजच जाऊन तो समुद्र शोषून टाकला पाहिजे!'

तो असा विचार करीत आहे तोच, श्रीविष्णूचा दूत तेथे आला आणि म्हणाला, "अरे गरुडा! भगवान् नारायणाने मला तुझ्याकडे पाठविले आहे. देवकार्याकरिता भगवंतांना अमरावतीला जायचे आहे. तेव्हा तू ताबडतोब चल!"

"अरे दूता! माझ्यासारखा करंटा सेवक भगवंतांना काय उपयोगी पडणार?" गरुड अभिमानाने म्हणाला, "तेव्हा तू जाऊन त्यांना सांग की दुसरा एखादा सेवक वाहनासाठी नेमावा. माझा नमस्कार भगवंतांना सांग! कारण म्हणतातच की, जो धनी सेवकाचे गुण जाणत नाही त्याच्या सेवेत राहू नये. नापीक जमीन नांगरण्याप्रमाणे अशा धन्याची सेवाही निष्फळ ठरते."

दूत म्हणाला, "अरे गरुडा! तू भगवंतांना असे उत्तर कधी देत नाहीस. भगवतांनी तुझा काही अपमान केला आहे का, ते सांग."

"भगवंतांनी आश्रय दिलेल्या समुद्राने आमच्या टिटवीची अंडी पळवून नेली." गरुड म्हणाला, "जर भगवान् त्याला योग्य शिक्षा करणार नाहीत तर मी भगवंताचा सेवक राहणार नाही. हा माझा निश्चय तू सांग! तू लवकर जा आणि त्यांना हा माझा निरोप दे."

दूताने गरुड रागावला आहे हे सांगितल्यानंतर भगवानांनी मनात विचार केला, 'गरुडाचे रागावणे योग्यच आहे. तेव्हा मी स्वतःच जातो आणि त्याचा सन्मान करून त्याला घेऊन येतो, 'शक्तिमान, कुलीन आणि भक्त असलेल्या सेवकाचा अपमान करू नये. त्याचे आपल्या मुलाप्रमाणे लाड करावेत. तरच स्वतःचे हित होते. राजा खूष झाला तर सेवकांना धन देतो; पण सेवकाचा सन्मान केला तर ते धन्यासाठी प्राणही देतात!'

असा विचार करून भगवान् गरुडाकडे स्वतः गेले. भगवंत घरी आलेले पाहून गरूडाने लाजेने मान खाली केली आणि प्रणाम करून तो म्हणाला, "भगवन्, तुमच्या आश्रयाने राहून उन्मत्त झालेल्या समुद्राने माझ्या सेवकाची अंडी पळविली आणि माझा अपमान केला आहे. तुम्हाला

कमीपणा यावयाला नको म्हणून मी त्याला शिक्षा केली नाही. नाहीतर मी त्याला केव्हाच कोरडा करून टाकला असता! धन्याच्या भीतीमुळे कुत्र्यांनाही लोक मारीत नाहीत. शिवाय, धन्याला कमीपणा येईल किंवा त्याचे मन दुखावले जाईल असे काम प्राण गेला तरी कुलीन सेवकाने करू नये."

" गरुडा. तू म्हणतोस ते खरे आहे." भगवान गरुडाला म्हणाले, " सेवकाच्या अपराधासाठी धन्याला दंड होतो. तर मग सेवकाचा अपमान व लाज ही मालकाने स्वतःचीच मानली पाहिजे. " चल तर, समुद्राकडून अंडी परत घेऊ, टिटव्यांचा मान राखू आणि नंतरच अमरावतीला जाऊ ! "

तेव्हा भगवंताने समुद्राची निंदा केली आणि अग्न्यास्त्र सज्ज करून ते म्हणाले, " अरे दुष्टा ! टिटव्यांना अंडी देऊन टाक. नाहीतर तुला कोरडा करून टाकीन !"

तेव्हा समुद्र घाबरला आणि त्याने टिटवीची अंडी परत केली. टिटव्याने ती पत्नीजवळ दिली.

" म्हणून मी म्हणतो की–शत्रूचा पराक्रम न जाणता जो वैर धरतो त्याला पराभव स्वीकारावा लागतो ! म्हणून पुरुषाने उद्योग करण्याचे प्रयत्न सोडू नयेत."

हे ऐकून संजीवकाने त्याला पुन्हा पुन्हा विचारले, " मित्रा, तो दुष्टबुद्धीचा आहे हे मला कसे कळावे ? आजपर्यंत उत्तरोत्तर वाढत्या प्रेमाने आणि मैत्रीने तो माझ्याशी वागत असे. तो माझ्यावर रागावलेला मी कधीच पाहिला नाही. तेव्हा खरे काय ते सांग. म्हणजे आत्मरक्षणासाठी मी त्याचा वध करण्याचा विचार करीन."

दमनक म्हणाला, " इतकेही ओळखत नाहीस ! त्याला प्रमाण कशाला हवे ? त्याचे डोळे रक्ताने लाल झालेले दिसतील. भुवया चढवलेल्या दिसतील. आणि तो जिभल्या चाटत तुझ्याकडे पाहत असेल. असा दिसला तर तो दुष्टबुद्धीचा आहे आणि तसे नसेल तर तो प्रसन्न आहे असे समज. आता मला निरोप दे. मी माझ्या आश्रयस्थानी जातो. आपल्यातील हे गुप्त रहस्य तू फोडू नकोस !

रात्र पडू लागली की, तुला जाणे शक्य असेल तर तू देशत्याग कर. कारण कुळाच्या रक्षणाकरिता एखाद्या व्यक्तीचा त्याग करावा, तसेच गावासाठी कुळ, जनपदासाठी गाव, आणि स्वतःच्या रक्षणासाठी पृथ्वीही सोडावी ! संकटात उपयोगी पडते म्हणून धनाचे रक्षण करावे, पत्नीच्या रक्षणासाठी धनही खर्च करावे; परंतु स्वतःचे सतत रक्षण करावे मग धन आणि पत्नी द्यावी लागली तरी हरकत नाही !

"बलवंत समोर आला तर देश सोडून जावे किंवा त्याला शरण जावे अशी नीती आहे. त्यातही देशत्याग करणे बरे ! किंवा साम, दाम वगैरे उपायांनी स्वतःचे रक्षण करावे. म्हटलेच आहे–पंडिताने आपले प्राण संभाळण्यासाठी हवे तर बायकामुलांनाही सोडून द्यावे. कारण प्राण राहिले तर बाकीचे पुन्हा मिळू शकते. विपन्नावस्थेत या किंवा त्या, चांगल्या किंवा वाईट उपायांनी स्वतःचा उद्धार करावा. धर्माचे आचरण समर्थ झाल्यावर करावे. जो धन वगैरे संभाळण्यासाठी प्राण देतो तो मूर्ख असतो. कारण प्राण गेले की मग सर्वच नष्ट होते."

असे सांगून दमनक तेथून करटकाकडे गेला. तो येताना पाहून करटक म्हणाला, "तू तिकडे काय करीत होतास बाबा ?"

"मी भेदनीतीचे बीज पेरले आहे !" दमनक म्हणाला, आता सर्व दैवाच्या हातात आहे. म्हणतातच की दैव प्रतिकूल असले तरी स्वतःच्या मनाचे समाधान करण्यासाठी व आपल्यावर दोष येऊ नये म्हणून शहाणे लोक काम करीतच राहतात. उद्योगी पुरुषश्रेष्ठाला लक्ष्मी प्रसन्न होते. क्षुद्र लोक नशिबाचा हवाला देतात. दैवावरचा भरवसा सोडून स्वतःच्या शक्तीनुसार पराक्रम करावा. प्रयत्न करूनही फळ मिळाले नाही तर त्यात दोष नसतो."

"तू भेदनीतीचे बीज तरी कोणते पेरले आहेस ? ते सांग ना."

"मी त्या दोघांना एकमेकांविरुद्ध खोटे सांगितले आहे. त्यामुळे आता ते दोघे एका जागी बसून एकमेकांविषयी गप्पागोष्टी करताना तुला दिसणार नाहीत."

करटक म्हणाला, "अरे, हे तू योग्य केले नाहीस ! एकमेकांबद्दल हृदयात प्रेम बाळगून ते सुखाने राहत होते, त्यांना तू क्रोधाच्या समुद्रात फेकलेस.

म्हणतातच की, जो साध्या आणि सुखात राहणाऱ्यांना उगीचच दुःखात पाडतो तो जन्मजन्मांतरी दुःखी होतो यात संशय नाही. शिवाय तुला भांडणे लावण्यातच गोडी असली तरीही हे योग्य नाही. एखाद्याचे वाईट करणे सर्वांनाच शक्य असते; पण उपकार करणे फार अवघड आहे. नीच मनुष्य दुसऱ्याच्या कार्याचा घात करू शकतो; पण तो ते कार्य स्वतः करू शकत नाही झंझावाताला झाड पाडणे शक्य असते परंतु, तो ते उभे करू शकत नाही."

दमनक म्हणाला, "तू नीतिशास्त्रात अगदी अडाणी आहेस म्हणून असे म्हणतोस. म्हटलेच आहे की, रोग आणि शत्रू जन्मतःच नष्ट केले पाहिजेत. ते वाढल्यानंतर मोठ्या शक्तिमानालाही मारून टाकतात त्याने आपले मंत्रीपद हिरावून घेतले आहे; म्हणून तो आपला शत्रूच आहे. वाडवडिलां-पासून चालत आलेले स्थान जो घेतो तो शत्रूच असतो. तो आपला हितचिं-तक असला तरी नष्ट केला पाहिजे. मी त्याला काही अपेक्षा न ठेवता अभय देऊन इकडे आणला. परंतु त्याने मला मंत्रीपदावरून हुसकावले ! म्हटलेच आहे की, सज्जनाने दुर्जनाला आपल्या जागी प्रवेश दिला तरी तो दुष्ट त्या सज्जनाच्या नाशाचा प्रयत्न करतो. म्हणून शहाण्या माणसांनी अधमांना आपल्याजवळ यायची सवडच देऊ नये. कारण घरात घुसलेला प्रियकर गृहस्थाचे स्थान मिळवू पाहतो असे लोक म्हणतात.

"तेव्हा मी त्याच्या मृत्यूचा उपाय शोधला आहे. तो मरेल किंवा तो देश तरी सोडून जाईल. माझे हे कारस्थान तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाच माहीत नाही. मी जे केले आहे ते योग्य आहे आणि आपला स्वार्थ साध-णारे आहे म्हटलेच आहे की, हृदय वज्रासारखे कठोर करून आणि बोलणे मात्र उसाच्या रसासारखे गोड करून अपकार करणाराला ठार करावे. मनात चलबिचल होऊ देऊ नये. शिवाय तो मेला तर आपल्याला भोजन मिळेल, आपले वैरही साधता येईल आणि मंत्रीपदही मिळेल. असे तीन फायदे यात असताना तू मठ्ठपणामुळे मला दोष का देत आहेस ?

"म्हटलेच आहे की, दुसऱ्याला त्रास देऊन स्वतःचा स्वार्थ साधणारे पंडित पुन्हा नामानिराळेच राहतात. वनातील चतुरक कोल्ह्याप्रमाणे त्यांचे चातुर्य कोणालाच समजत नाही"

"हे काय आहे बुवा" करटक म्हणाला.

दमनक कथा सांगू लागला—

## कथा सोळावी

# लबाड कोल्हा

एका वनात वज्रदंष्ट्र नावाचा सिंह राहत होता. चतुरक नावाचा कोल्हा आणि क्रौर्यमुख नावाचा लांडगा असे त्याचे दोन सेवक होते. ते त्याच वनात राहत आणि नेहमी त्याच्यामागे असत.

एके दिवशी एक उंटीण सिंहाने पाहिली. ती प्रसूतिकालच्या वेदनांमुळे बसली होती आणि तांडयातून चुकली होती. सिंहानें तिला पकडून तिचे पोट फाडले, तोच तिच्या पोटातून जिवंत पिल्लू बाहेर पडले ! उंटीणीच्या मांसामुळे सिंह आणि त्याचा परिवार तृप्त झाला. परंतु त्या अनाथ उंटीणीच्या पिल्लाला त्याने प्रेमापोटी घरी आणले आणि तो म्हणाल, "बाळा, माझ्याकडून किंवा आपल्यापैकी दुसऱ्या कोणाकडून तुला मृत्यूची भीती बाळगण्याचे कारण नाही. या वनात तू इच्छेनुसार सगळीकडे फिर. तुझे कान शंकूसारखे आहेत म्हणून तुझे नाव 'शंकूकर्ण' असे ठेवले आहे. तेव्हापासून ते चौघेजण एकत्र फिरत आणि एकमेकांना अनेक प्रकारच्या गोष्टी सांगून आनंदात राहत. शंकूकर्ण हो तरुण झाला आणि तो सिंहाला एक क्षणही सोडत नसे.

एकदा वज्रदंष्ट्र सिंहाचे एका मत्त हत्तीबरोबर युद्ध झाले. त्या हत्तीच्या दातांच्या प्रहारामुळे त्याच्या शरीरावर जखमा झाल्या. आणि तो चालू शकेना. भुकेने व्याकूळ होऊन तो म्हणाला, "अरे, तुम्ही कोणत्या तरी प्राण्याला घेऊन या म्हणजे या अवस्थेतही मी त्याला मारीन आणि तुमची आणि माझी भूक भागवीन."

ते तिघेही संध्याकाळपर्यंत वनात सर्वत्र फिरले पण त्यांना कोणताही प्राणी सापडला नाही, तेव्हा चतुरक विचार करू लागला की, या शंकूकर्णाला जर मारले तर सर्वांचे पुष्कळ दिवस पोट भरेल ! पण स्वामींनी याला मित्र मानला आहे व आश्रय दिला आहे. म्हणून ते याला मारणार नाहीत. तेव्हा माझ्या बुद्धिप्रभावाने स्वामींना असा बोध करतो

की, तो त्यामुळे याला मारील. म्हटलेच आहे की, या जगात बुद्धिमानांना आपल्या बुद्धीच्या साहाय्यामुळे कोणताही जीव अवध्य नाही आणि कोणतेही काम असाध्य नाही. म्हणून त्यांच्या बुद्धीचा उपयोग केला पाहिजे."

असा विचार करून तो शंकूकर्णाला म्हणाला, "अरे शंकूकर्णा, स्वामीला पथ्याचे मिळत नाही, म्हणून तो भूकेने पीडला आहे. स्वामी नसतील तर आपण सगळे नष्ट झालोच ! म्हणून स्वामीकरिता मी सांगतो ते ऐकून घे.

"अरे मग ताबडतोब सांग." शंकूकर्ण म्हणाला "तुझे सांगण मी नक्की ऐकेन. शिवाय ते स्वामीच्या हिताचे असेल तर शंभर पुण्यकर्म केल्याप्रमाणे होईल"

"दुप्पट परत करायच्या कराराने तू आपले शरीर स्वामीसाठी दे. तुला दुप्पट शरीर परत मिळेल आणि स्वामींचे प्राणही वाचतील."

"असे आहे काय ! मग यात माझाच फायदा आहे. मी तयार आहे असे स्वामींना सांग. पण यात धर्मराज जामीन हवा" शंकूकर्ण म्हणाला,

या प्रमाणे विचार करून ते सर्वजण सिंहाकडे गेले. चतुरक म्हणाला, "देव ! कोणताही प्राणी मिळाला नाही. आता भगवान सूर्यही अस्ताला गेला. स्वामी जर दुप्पट शरीर परत देतील तर त्या अटीवर हा शंकूकर्ण आपले शरीर द्यायला तयार आहे; पण धर्मराज जामीन राहिला पाहिजे."

"वा छान ! असे असेल तर फारच सुंदर ! या व्यवहारात धर्मराजाला जामीन देऊ या."

सिंह असे म्हणाल्यानंतर कोल्हा आणि लांडगा यांनी शंकूकर्णाला दोन्ही बाजूंनी फाडले. तो लागलीच मेला. नंतर वज्रदंष्ट्र चतुरकाला म्हणाला, "अरे चतुरका, मी नदीवर जाऊन स्नान आणि देवपूजा करून येतो. तोपर्यंत तू येथे नीट पहारा कर" असे म्हणून तो नदीवर गेला.

तो गेल्यावर चतुरकाने मनात विचार केला, "हा उंट आपल्याला एकट्यालाच कसा बरं भोजनासाठी मिळेल ?"

याप्रमाणे विचार करून तो क्रौर्यमुखाला म्हणाला, "अरे क्रौर्यमुखा, तुला खूप भूक लागलेली दिसते. स्वामी परत येत नाही तोवर तू या उंटाचे मांस खा. स्वामीजवळ तू निर्दोष आहेस असे मी सांगीन."

हे ऐकून त्याने थोडचाशाच मांसाची चव घेतली इतक्यात चतुरक म्हणाला, "अरे क्रौर्यमुखा, स्वामी परत येत आहे. तू उंटाला सोडून बाजूला बैस. म्हणजे तू मांस खाल्ले आहेस याची शंकाही त्याला येणार नाही."

सिंह परत आल्यावर उंटाकडे गेला तो उंटाचे काळीज नाहीसे झालेले त्याला दिसले. तेव्हा भुवया चढवून कठोर आवाजात त्याने विचारले, "या उंटाला कोणी उष्टे केले? त्यालाही मी मारून टाकीन!"

तो असे ओरडत असता क्रौर्यमुख चतुरकाच्या तोंडाकडे पाहत होता. तो जणू सुचवत होता की, "माझ्या बाजूने थोडेतरी बोल म्हणजे मला दिलासा मिळेल."

"माझ्या तोंडाकडे बघून काय उपयोग!" चतुरक हसून म्हणाला, "मला न जुमानता मांस खाल्लेस. आता त्या दुष्ट नीतीच्या वृक्षांची फळे भोग!"

हे ऐकून क्रौर्यमुख प्राण जाण्याच्या भीतीने लांब पळून गला.

इतक्यात वनातील रस्त्याने ओझी लादलेला उंटांचा तांडा येऊ लागला. सर्वात पुढच्या उंटाच्या गळचात एक मोठी घंटा बांधली होती. लांबून येणाऱ्या त्या घंटेचा आवाज ऐकून सिंह कोल्हचाला म्हणाला, "हा भयंकर आवाज कसला ऐकू येत आहे? बघ पाहू जरा. हा पूर्वी कधी ऐकला नव्हता!"

चतुरक थोडेसे अंतर गेला आणि लगेच परत येऊन म्हणाला, "स्वामी पळता येत असेल तर लवकर पळा."

"का मला घाबरवतो आहेस? काय आहे ते तरी मला सांग!" सिंह म्हणाला,

"स्वामी, तुझ्यावर रागावलेला हा धर्मराज येत आहे. याने माझा एक उंट अकालीच मारून टाकला म्हणून मी त्याच्याकडून हजार उंटाची वसूली करीन' असा निश्चय करून तो येत आहे. त्याचे बरोबर पुष्कळ उंटही आहेत व सर्वांत पुढच्या उंटाच्या गळचात मोठी घंटा बांधली आहे. तू मारलेल्या उंटाचे पूर्वजही सूड घेण्यासाठी त्याचे बरोबर आले लाहेत!"

हे सर्व ऐकून आणि सर्व लांबूनच पाहून सिंह मेलेल्या उंटाला तेथेच

सोडून प्राणभयामुळे पळून गेला. नंतर चतुरकाने त्या उंटाचे मांस हळूहळू पुष्कळ दिवस खाल्ले.

" म्हणून मी म्हणतो की, ' स्वतःचा स्वार्थ साधणारे पंडित नामानिराळे राहतात."

इकडे दमनक गेल्यानंतर संजीवक मनात म्हणाला, " अरेरे, मी हे काय केले! मी गवतखाऊ असून मांसाशन सेवन करणाऱ्याचा सेवक झालो. जो मनुष्य भलतीकडे जातो आणि ज्यांची सेवा करू नये त्यांची सेवा करतो, तो गर्भवती खेचरी प्रमाणे मृत्यूलाच मिठी मारतो. आता मी काय करू? कोठे जाऊ? मला शांती कशी मिळेल? किंवा त्या पिंगलकाकडेच जावे हे बरे! त्याला शरण गेल्यावर तो माझे रक्षण करील आणि माझे प्राण घेणार नाही. म्हटलेच आहे की, धर्मकार्य करताना दुर्भाग्यामुळे संकटे आली तर शहाण्यांनी विशेष नीती वापरून स्वतःचे रक्षण केले पाहिजे. अग्नीने भाजल्यावर अग्नीचा शेकच उपयोगी पडतो, अशी म्हण प्रसिद्धच आहे.

या जगात मनुष्य आपल्या कर्मांची फळे भोगतोच. मग ती शुभ असोत किंवा अशुभ. जे अटळ आहे ते होणारच आहे. तेव्हा यांत विचार करून उपयोग नाही. शिवाय दुसरीकडे गेलो तर मांसाहार करणारा उग्र पशू मला मारून टाकीलच. त्यापेक्षा हा सिंह बरा आहे. श्रेष्ठ लोकांबरोबर स्पर्धा करतांना संकटे आली तर ती उत्तमच! पर्वतावर टक्कर मारणाऱ्या हत्तींचे दात तुटले तर ते त्यांना भूषणावह असते.

लहान मनुष्य श्रेष्ठ लोकांकडून नष्ट झाला तरी त्याला प्रशंसा लाभते हत्तीच्या गंडस्थळावरील मद पिण्यासाठी बसलेला भुंगा हत्तीच्या कानाच्या फटकाऱ्यामुळे मरतो तरीही त्याची प्रशंसाच होते."

असे मनाशी ठरवून तो हळूहळू पिंगलकाकडे जाऊ लागला. जाता जाता विचार करू लागला, " घरात साप दडलेले असावेत, वनामध्ये वणवा पेटलेला असावा, सुंदर कमळामुळे सुशोभित झालेल्या सरोवरात सुसरी असाव्यात त्याप्रमाणेच राजांची घरे दुष्ट लोकांनी आणि खोटे बोलणाऱ्या लोकांनी वेढलेली असतात. म्हणून समुद्रात प्रवेश करावा त्याप्रमाणे भीतियुक्त व दुःखी मनाने लोक तेथे प्रवेश करतात."

असा विचार करीत तो गेला तेव्हा दमनकाने सांगितल्याप्रमाणेच रागावलेला पिंगलक त्याने पाहिला. म्हणून त्याने भीतीने आपले शरीर आखडून घेतले व नमस्कार न करताच तो लांब जाऊन बसला. पिंगलकाने त्याला उद्धटपणे बसलेला पाहून दमनकाने सांगितलेल्या गोष्टीवर त्याचा विश्वास बसला आणि त्याने रागाने संजीवकावर चाल केली. त्याच्या तीक्ष्ण नखांनी संजीवकाच्या पाठीला जखमा झाल्या. त्यानेही शिंगांनी त्याचे पोट फाडले आणि दूर जाऊन आपल्या शिंगाने त्याला मारण्याच्या इच्छेने तो युद्धासाठी सज्ज झाला. !

फुललेल्या पळसाच्या वृक्षाप्रमाणे ते दोघे रक्ताने रंगलेले दिसत होते ! आणि एकमेकांना मारण्याच्या पवित्र्यात उभे होते. हे पाहून करटक आक्षेप घेऊन म्हणाला, "अरे मूर्खा ! या दोघांमध्ये फूट पाडलीस हे चांगले नाही केलेस ! तुला नीतितत्त्वही समजत नाही. नीतिशास्त्र जाणणाऱ्यांनी म्हटले आहे की, ज्या गोष्टी दंडाने आणि युद्धाने साध्य होणाऱ्या असतात त्या सामनीतीने जो साध्य करतो तोच खरा नीतिकुशल मंत्री होय ! अल्प फळ मिळविण्यासाठी जे कठीण दंडनीती वापरतात व अयोग्य मार्गाने जातात ते मंत्री राज्यलक्ष्मी धोक्यात आणतात. आता समजा स्वामीचा घात झाला तर तुझ्या कारस्थानाचा काय उपयोग ! आणि योगायोगाने संजीवक मेला तरी तेही योग्य नाही.

"संजीवकाची अवस्था कठीण आहे, संशयास्पद आहे ! तेव्हा तो बहुधा मरणारच ! पण मूर्खा ! तू मंत्रीपदाची इच्छा कशी करतोस ? तुला सामनीती कळत नाही. तुझा विश्वास दंडनीतीवर ! पण तुझे मनोरथ वाया जाणार ! साम, दाम, दंड यापैकी दंड सर्वात जास्त पाप देणारा आहे. त्याचा उपयोग शेवटी करावयाचा असतो. जेथे सामनीतीने काम होत नाही तेथेच फक्त शहाणे लोक दंडनीती वापरतात. पित्त जर साखरेने शांत होत असेल तर कडू औषधाची जरूर नसते.

तुला मंत्रीपदाचा हव्यास आहे तेही योग्य नाही ! तुला मंत्र्यांच्या गुणांचा परिचय नाही. मंत्र्याजवळ पाच प्रकारचे गुण असावे लागतात. (१) कार्य सुरू करताना ते पूर्ण व्हावे म्हणून उपाय योजण्याचे चातुर्य (२) कार्य सिध्दीसाठी सैन्य व संपती याचा उपयोग ३) देशकाल परिस्थितीनुसार योग्य

निर्णय ४) आलेल्या संकटाचा प्रतिकार ५) इष्टकार्य शेवटास नेणे. पण तुझ्या या उपायांनी स्वामी किंवा मंत्री यांपैकी एकाचा किंवा दोघांचाही नाश निश्चित होणार ! तुझ्यात काही शक्ती असेल, तर या संकटातून बाहेर पडण्याचा उपाय शोधून काढ. सकट नाहीसे करण्यातच मंत्र्याच्या बुध्दीची परीक्षा होते. म्हटलेच आहे की, युध्द चालू असता मंत्र्याचे कौशल्य आणि ताप आला असता वैद्याचे कौशल्य समजते ! सर्व काही ठीक असताना सगळेच चतुर असतात !

" परतु मूर्खा ! तुझी बुध्दी उलटीच चालते ! म्हणून तुला या संकटातून मार्ग काढता येणार नाही. म्हणतातच की, ज्याप्रमाणे उंदीर अन्नाच्या भांड्यात उडी मारू शकतो; पण त्यातून बाहेर येऊ शकत नाही, त्याप्रमाणे नीच लोक दुसऱ्याचे काम बिघडवू शकतात. ते संकट दूर करायला ते असमर्थ असतात. किंवा हा तुझा दोष नसून तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवणाऱ्या स्वामीचाच आहे. म्हटलेच आहे की, नीच लोकांच्या सांगण्याप्रमाणे वागणारे राजे शहाण्यांनी दर्शविलेल्या मार्गांनी जात नाहीत. त्यामुळे ते सकटरूपी पिंजऱ्यात अडकतात. आणि त्या संकटातून कोणत्याही मार्गाने बाहेर पडणे त्यांना शक्य होत नाही.

" तू जर पिंगलकाचा मंत्री झालास तर कोणीही सज्जन त्याच्याकडे येणार नाहीत. म्हटलेच आहे की, राजा सर्वगुणसंपन्न असला आणि त्याचा मंत्री दुष्ट असला तर सज्जन त्याच्या आश्रयाला जात नाहीत. कारण सुसरीने भरलेल्या सरोवरातील चवदार आणि गोड पाणी लोक घेत नाहीत.

" सभ्य लोक परिवारात नसले म्हणजे स्वामीचाही नाश होऊन जाईल. म्हटलेच आहे की, धनुष्यबाणाचा उपयोग न करता विचित्र कथा सांगणाऱ्या सेवकाबरोबर जो राजा रमतो त्याचे शत्रू त्याच्या राज्यलक्ष्मीबरोबर रमतात. परंतु तुझ्यासारख्या मूर्खाला उपदेश करून काय उपयोग ? तो उपदेश गुण न ठरता दोषच ठरेल.

म्हणतातच की, न वाकणारे लाकूड वाकत नाही. आणि वस्तऱ्याने दगड फुटत नाही. त्या प्रमाणेच अयोग्य शिष्याला उपदेश करणे. सूचिमुखाच्या उपदेशाप्रमाणे वाया जाते."

" हे काय आहे बुवा ? " दमनक म्हणाला.

करटक कथा सांगू लागला.

## कथा सतरावी

# सूचिमुख पक्षी आणि वानर

एका डोंगराळ प्रदेशात वानरांचा एक कळप राहत होता. एकदा हेमंत ऋतूत भयंकर गार वाऱ्यामुळे त्यांची शरीरे कापत होती आणि पाण्याच्या सतत वृष्टीने ते इकडे तिकडे पळत होते आणि त्यांना स्वस्थपणा मिळत नव्हता. त्यातील काही वानरांनी अग्नीच्या ठिणग्याप्रमाणे दिसणाऱ्या लाल गुंजा गोळा केल्या आणि शेक घेण्यासाठी त्याच्यावर फुंकर मारू लागले. आणि गुंजाभोवती कोंडाळे करून बसले !

सूचिमुख नावाच्या एका पक्ष्याने त्यांचे हे व्यर्थ श्रम पाहिले आणि तो म्हणाला, " अरे वानरांनो, तुम्ही सर्व मुर्ख आहात ! हे निखारे नसून गुंजा आहेत. उगीच कष्ट का घेता ? त्यावर शेक घेऊन तुमची थंडी जाणार नाही. यापेक्षा वारा न येणारा वनप्रदेश, गुहा, किंवा डोंगराची कपारी शोधा. कारण अजूनही आकाश मेघांनी भरून गेलेले दिसत आहे ! "

तेव्हा त्यातील एक म्हातारा वानर म्हणाला, " अरे मूर्खा ! तुला याच्याशी काय करायचे आहे ? तू आपला जा कसा ! म्हणतातच की, जुगारात हरलेला, आपल्या कामात अनेकदा विघ्न आलेला, यांच्याबरोबर विवेकी माणसाने वाद घालू नये. त्याचप्रमाणे शिकार न मिळाल्यामुळे दमलेल्या शिकाऱ्याला आणि व्यसनी माणसाला जो मूर्ख उपदेश करतो, त्याचा पराभव ठरलेलाच असतो ! "

तोही त्या म्हाताऱ्या माकडाचे न ऐकता त्या वानरांना पुन्हा पुन्हा सांगू लागला, " अरे विनाकारण कशाला श्रम घेता ? "

तो आपली बडबड थांबवत नाही असे पाहून व्यर्थ श्रमामुळे संतापलेल्या एका वानराने त्याचे पंख पकडले आणि एका दगडावर आपटून त्याला ठार केले.

" म्हणून मी म्हणालो की, न वाकणारे लाकूड वाकत नाही आणि वस्तरा दगड फोडू शकत नाही. सापाला दूध पाजले तर विषच वाढेल. त्याप्रमाणे

मूर्खाला उपदेश केला तर तो शांत न होता जास्तच रागावतो. शिवाय वाटेल त्या मोठमोठ्याला उपदेश करू नये. कारण मूर्ख वानरामुळे एकाचे घरटे नष्ट झाले."

"हे कसे काय बुवा!" दमनक म्हणाला.

करटक कथा सांगू लागला.

## कथा अठरावी

# वानर आणि चिमणी

एका वनात एक शमीचे झाड होते. त्याच्या लोंबणाऱ्या फांद्यावर चिमणीच्या एका जोडप्याने घरटे बांधले होते. आणि ते तेथे आनंदानें राहत होते. त्यांचे आयुष्य सुखात चालले असताना एकदा हेमंत कालात थोडासा पाऊस सुरू झाला. त्यावेळी वारा आणि पाऊस याने त्रासलेला एक वानर तेथे आला आणि त्या झाडाखाली बसला. थंडीमुळे त्याचे शरीर कापत होते आणि दात एकमेकावर आपटून वीणेसारखा आवाज येत होता. त्याची अशी अवस्था पाहून चिमणी त्याला म्हणाली, "अरे तुला चांगले हातपाय आहेत. आकार तर चांगला पुरुषासारखा आहे. मग थंडीत काकडत कशाला बसलास? तुला घर बांधता येत नाही काय?"

हे ऐकून वानर रागाने म्हणाला, "अग, तू गप्प का बसत नाहीस? काय हे तुझे धारिष्ट!"

'ही आज माझा उपहास करीत आहे. ही दुराचारी स्वत:ला पंडित मानत आहे. आली मोठी उपदेश करायला. हिला मारून टाकलेली बरी!' असा मनात विचार करून तो तिला म्हणाला,

"बाळे, माझी काळजी नको हं करूस! ज्याची श्रद्धा असेल आणि

ज्याने विचारले असेल त्यालाच सांगावे. श्रद्धा नसलेल्याला सांगणे आणि अरण्यात रडणे सारखेच. आता जास्त काय सांगू ? " असे म्हणून तो वानर शमीच्या झाडावर चढला आणि त्याने चिमणीच्या घरट्याचे तुकडे तुकडे करून टाकले.

म्हणून मी म्हणालो की, वाटेल त्याला उपदेश करू नये. अरे मूर्खा, तू शिकलेला असून अडाण्यासारखा वागतोस ? पण हा तुझा दोष नाही म्हणा. सज्जन लोक शिकले तर ते गुण मिळवितात. पण दुर्जनांना कशानेच गुण मिळत नाही. पंडिताचा उपयोग अयोग्य जागी कसा होणार ? अंधारातील मडक्यात दिवा ठेऊन उपयोग असतो काय ? माझे म्हणणे उडवून देऊन तू व्यर्थ पांडित्य गाजवलेस. तुला आपले हित किंवा अहित कळत नाही. तू लायक नाहीस व व्यर्थ जन्म घेतलास ! म्हणतातच की, शास्त्रानुसार या जगात चार प्रकारचे पुत्र असतात. आईचे गुण घेणाऱ्या मुलाला जात म्हणतात, पित्याचे गुण घेणाऱ्या पुत्राला अनुजात म्हणतात, जो आई-बापांपेक्षा जास्त गुणसंपन्न असतो त्याला अतिजात म्हणतात आणि मूर्ख व अधम पुत्राला अपजात म्हणतात. तसा तू अपजात आहेस. दुसऱ्याचा नाश करण्यात दंग झालेल्या दुष्ट मनुष्याला यात आपलाही नाश होत आहे हे समजत नाही. रणांगणावर मस्तक तुटले तरी धड नाचतच असते. "

" धर्मबुद्धी आणि पापबुद्धी हे दोघेजण माझ्या माहितीचे आहेत. व्यर्थ पांडित्य दाखवून मुलाने धुरामुळे पित्याचा घात केला. "

" हे कसे काय बुवा ? " दमनक म्हणाला.

करटक कथा सांगू लागला....

## कथा एकोणिसावी

# धर्मबुद्धी आणि पापबुद्धी

एका गावामध्ये धर्मबुद्धी आणि पापबुद्धी असे दोन मित्र राहत होते. एकदा पापबुद्धी विचार करू लागला. " मी मूर्ख आणि दरिद्री आहे. म्हणून या धर्मबुद्धीला बरोबर घेतो आणि दुसऱ्या देशात जातो. तेथे याच्या आश्रयाने धन मिळवून नंतर मी याला फसवीन आणि सुखात राहीन, "

एके दिवशी पापबुद्धी धर्मबुद्धीला म्हणाला, " अरे मित्रा, तू म्हातारा होशील तेव्हा तुला कोणत्या आठवणी आठवतील ? तू दुसरे देश पाहिले नाहीस, तर तिथल्या हकीगती लहान मुलांना तू कशा सांगणार ? म्हणतातच की, पृथ्वीच्या पाठीवर फिरून अनेक देशांत जाऊन नाना भाषा आणि वेश जो पाहत नाही त्याचा जन्म व्यर्थ गेला. एका देशातून दुसऱ्या देशांत जो आनंदाने फिरत जात नाही, त्याला विद्या, संपत्ती आणि कला योग्य प्रकारे मिळत नाही. "

त्याचे बोलणे ऐकून धर्मबुद्धी आनंदित झाला. आणि एके दिवशी मोठ्या माणसांची परवानगी घेऊन ते परदेशी जायला निघाले. तेथे ते खूप फिरले आणि धर्मबुद्धीच्या प्रभावामुळे पापबुद्धीने पुष्कळ धन गोळा केले. ते दोघेही पुष्कळ धन मिळाल्यामुळे आनंदित झाले आणि घरी परत येण्यास उत्सुकतेने निघाले. म्हणतातच की, परदेशी राहणाऱ्यांना विद्या, धन, आणि कला मिळाल्यानंतर एक कोस राहिलेला आपला गाव शंभर कोस दूर आहे असे वाटते.

आपल्या गावाच्या जवळ आल्यानंतर पापबुद्धी धर्मबुद्धीला म्हणाला, " मित्रा, हे सर्व धन घरी नेणे योग्य नाही. कारण आपल्या कुटुंबातील आणि आप्त मंडळी आपल्याकडे नेहमी पैसेच मागत राहतील. म्हणून या निबिड अरण्यात ते कोठेतरी जमिनीत पुरून ठेवून आणि थोडेसेच धन घेऊन घरात प्रवेश करू. पुन्हा जेव्हा धनाची जरूरी भासेल तेव्हा आपण

दोघे इकडे येऊ. पाहिजे असेल तेवढेच धन आपण घेऊन जाऊ. म्हटलेच आहे की, शहाण्या माणसाने आपले थोडेसे धनसुद्धा कोणाला दाखवू नये. कारण धनाच्या दर्शनाने ऋषी-मुनींचेही मन फिरते. पाण्यातील अमीष मासे खातात आणि जमिनीवर पशू भक्ष्य खातात, पक्षी आकाशात सावज खातो; पण पैसेवाल्याला सर्वच ठिकाणी खातात !"

हे ऐकून धर्मबुद्धी म्हणाला, "मित्रा तू म्हणतोस तसेच करू." तसे करून ते दोघेही आपल्या घरी गेले आणि सुखाने राहू लागले.

एके दिवशी रात्री पापबुद्धी अरण्यात गेला. तेथील सर्व धन त्याने काढून घेतले, खड्डा बुजवला आणि तो आपल्या घरी गेला. नंतर एके दिवशी तो धर्मबुद्धीकडे गेला आणि म्हणाला, "मित्रा माझे कुटुंब पुष्कळ मोठे आहे. आणि पैसे नसल्यामुळे आम्ही त्रासून गेलो आहोत. तेव्हा त्या जागी जाऊन थोडेसे धन आणू या !"

तो म्हणाला, "ठीक आहे."

ते दोघेही त्या जागी गेले आणि खणून पाहतात तो भांडे रिकामे दिसले. नंतर पापबुद्धी कपाळ बडवत म्हणाला, "अरे धर्मबुद्धी, हे धन तूच चोरलेस ! दुसरे कोण चोरणार ! खड्डाही भरून ठेवलास. तेव्हा त्यातील अर्धे धन तू मला दे ! नाहीतर मी राजाला जाऊन सांगेन."

"अरे दुष्टा, असे बोलू नकोस." तो म्हणाला, "मी खरोखरच धर्मबुद्धीचा आहे. मी असली चोरी करणार नाही. धर्मबुद्धी असलेल्या माणसाला परस्त्री आईसारखी असते, दुसऱ्याचे द्रव्य मातीच्या ढेकळासारखे असते आणि तो सर्व प्राण्यांना स्वतःच्या आत्म्याप्रमाणेच पाहतो."

याप्रमाणे वाद घालत ते दोघे धर्माधिकाऱ्याकडे गेले आणि एकमेकाला दोष देऊ लागले. धर्मपीठावर बसलेल्या पुरुषांनी दिव्य करावयाचे ठरविले. तेव्हा पापबुद्धी म्हणाला, "हा योग्य न्याय झाला नाही. म्हणतातच की, वाद असेल तेव्हा प्रथम लेखी पुरावा पाहावा, तो नसेल तर साक्षी घ्याव्यात आणि साक्षीदार नसेल तरच दिव्य करावे, असे पंडित सांगतात. या वादविषयात वृक्षदेवता माझ्या बाजूची साक्षीदार आहे.आमच्यापैकी चोर कोण आणि साधू कोण हे ती सांगू शकेल."

"वा ! तू योग्यच बोललास." ते सर्वजण म्हणाले, "म्हटलेच आहे की, एखाद्या विवादात अंत्यज जरी साक्षीदार असेल तरी दिव्य करू नये. येथे तर देवता साक्षी आहे. आम्हालाही या विषयात मोठे कुतूहल वाटत आहे. उद्या सकाळी तुम्ही-आम्ही सर्व मिळून वनात जाऊ."

नंतर पापबुद्धी घरी गेला आणि आपल्या वडिलांना म्हणाला, "बाबा, मी धर्मबुद्धीचे पुष्कळ धन चोरले आहे. तुमच्या बोलण्यामुळे ते आपल्याकडेच राहील. नाहीतर ते द्रव्य आपला जीवही घेऊन जाईल."

तो म्हणाला, "बाळा, मी काय बोलू ते लवकर सांग. म्हणजे ते द्रव्य आपल्याकडेच स्थिर राहील असे मला करता येईल."

"बाबा, त्या प्रदेशात शमीचे एक प्रचंड झाड आहे. त्या झाडाला एक मोठी ढोली आहे. तेथे तुम्ही आताच जाऊन बसा, उद्या सकाळी मी जेव्हा 'आता सत्य ऐका !' असे म्हणेन तेव्हा तुम्ही सांगा की, "धर्मबुद्धी चोर आहे."

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान करून पापबुद्धी, धर्मबुद्धी आणि धर्माधिकारी यांच्यासह त्या शमीच्या झाडाजवळ गेला. आणि मोठ्याने ओरडून म्हणाला, "सूर्य, चंद्र, अग्नी, वायू, पृथ्वी, आकाश, पाणी, हृदय, यम, रात्र, दिवस, संध्याकाळ व प्रातःकाळ आणि धर्म मनुष्यांच्या प्रत्येक कर्माचे साक्षीदार असतात ! भगवती वनदेवते, आमच्यांपैकी कोण चोर आहे ते सांग !"

"अहो, ऐका हो ऐका. हे धन धर्मबुद्धीने चोरले." ढोलीतून पापबुद्धीचा पिता म्हणाला.

हे ऐकून ते सर्व राजपुरुष आश्चर्याने डोळे विस्फारून पाहू लागले. आणि धनाच्या चोरीबद्दल धर्मबुद्धीला काय शासन करावे यासाठी शास्त्र पाहू लागले.

इतक्यात धर्मबुद्धीने शमीच्या ढोलीभोवती पालापाचोळा जमवला आणि तो पेटवला. तो जळायला लागल्यावर पापबुद्धीचा पिता करुणावस्थेत ओरडत ढोलीतून बाहेर पडला. त्याचे अर्धे शरीर जळून गेले होते आणि डोळे फुटले होते !

तेव्हा त्या सर्वांनी ' ही काय भानगड आहे, ' असे विचारले. तेव्हा त्याने पापबुद्धीचा सर्व वृतान्त सांगितला आणि पश्चात्ताप दर्शवला. नंतर त्या राजपुरुषांनी पापबुद्धीला शमीच्या झाडावर टांगले आणि धर्मबुद्धीची प्रशंसा केली.

तो राजपुरुष धर्मबुद्धीला म्हणाला, "उपायांचा विचार करताना अपायांचा, कार्यहानीचाही विचार पंडितांनी करावा, नाहीतर मूर्ख बगळ्याच्या देखत मुंगसांनी बगळ्यांना मारून टाकले तसे होईल, "

" हे काय आहे बुवा ? " धर्मबुद्धीने विचारले.

ते राजपुरुष कथा सांगू लागले....

## कथा विसावी

# बगळा आणि मुंगूस

एका वनात वडाच्या झाडावर बगळ्यांचा एक थवा राहत होता. त्या झाडाच्या ढोलीत एक काळा साप राहत होता. तो बगळ्यांच्या पंख न फुटलेल्या पिल्लांना खाऊन आपला चरितार्थ चालवत असे.

एका बगळ्याला सापांनी आपली पिले खाल्लेली पाहून वैराग्य आले आणि तो एका सरोवराच्या काठी मान खाली घालून अश्रूभरल्या डोळ्यांनी उभा राहिला. त्याची अशी अवस्था पाहून खेकडा त्याला म्हणाला, " मामा, तू आज का रडतो आहेस ! "

बगळा म्हणाला, " मित्रा, काय करावं ? माझ्या दुर्दैवामुळे माझी पिले ढोलीतील सापाने खाऊन टाकली ! त्या दु:खाने दु:खी होऊन मी रडत आहे. त्याचा नाश करण्याचा एखादा उपाय असला तर मला सांग ! "

हे ऐकून खेकडा मनात म्हणाला, "हा आमचा जातीचा स्वभावतःच वैरी आहे. आता याला खरा–खोटा उपदेश करतो. त्यामुळे इतर सर्व बगळेही मरून जातील. म्हटलेच आहे की, आपले बोलणे लोण्यासारखे मऊ आणि हृदय मात्र निर्दय बनवून शत्रूला असे समजावून सांगावे की, ज्यामुळे तो त्याच्या वंशासह मृत्यू पावला पाहिजे."

नंतर तो म्हणाला, "मामा, असे असेल तर तुम्ही मुंगसाच्या बिळापासून सापाच्या ढोलीपर्यंत माशांचे तुकडे टाका. म्हणजे मुंगूस त्या मार्गाने जाईल आणि दुष्ट सापाचा नाश करील."

तसे केल्यावर माशांच्या तुकड्यांच्या अनुरोधाने मुंगूस गेले आणि त्याने काळा साप मारला पण नंतर त्या झाडाच्या आश्रयाने राहिलेले सर्व बगळेही त्याने हळू हळू खाल्ले !

म्हणून आम्ही म्हणतो की, उपायांचा विचार करताना अपायांचा विचार करावा. या पापबुद्धीने उपाय योजला पण अपायांचा विचार केला नाही. त्याचे त्याला फळ मिळालेच."

करटक म्हणाला, "अरे मूर्खा, तूही पापबुद्धीप्रमाणे उपायांचा विचार केलास, पण अपाय होईल हे तुला सुचले नाही. तू सज्जन नाहीस. तूही केवळ पापबुद्धीचाच आहेस. तू स्वामीचे प्राण धोक्यात आणलेस, यावरूनच मी हे जाणले आहे. तू तुझे कपट आणि दुष्टपणा स्वतःच उघडा केला आहेस. म्हणतातच की, मेघांचा आवाज ऐकून आनंदलेला मूर्ख मोर नाचला नसता तर प्रयत्न करूनही त्याचे गुह्य भाग दिसले नसते. तू जर महाराजांची अशी स्थिती केलीस तर आमचा काय पाड ! तेव्हा तू माझ्याजवळ राहू नकोस.

"म्हणतातच की, हजार शेराचा लोखंडी तराजू जर उंदीर खाऊन टाकतात. तेथे ससाणा नक्कीच मुलाला पळवून नेईल यात शंका नाही !"

दमनक म्हणाला, "हे काय आहे बुवा ?"

करटक कथा सांगू लागला...

## कथा एकविसावी

# वाणीपुत्र आणि तराजू

एका नगरात जीर्णधन नावाचा वाणीपुत्र राहात होता. त्याच्या जवळचे सर्व वैभव नष्ट झाले तेव्हा त्याने दुसऱ्या देशात जायचा विचार केला. तो मनात म्हणाला, " ज्या जागी किंवा ज्या देशात स्वत:च्या पराक्रमाने भोग भोगले तेथे वैभव नष्ट झाल्यावर राहणाऱ्या पुरुषाला अधम पुरुष म्हणतात. जेथे अहंकाराने राहून विलास व चैन केली तेथे जो दीनपणे राहतो त्याची सर्व लोक निंदा करतात. "

त्याच्या घरात वाडवडिलांपासून चालत आलेला लोखंडाचा तराजू होता. एका श्रेष्ठीच्या घरी तो ठेव म्हणून त्याने ठेवला आणि तो दुसऱ्या देशाकडे गेला. पुष्कळ दिवस परदेशात मनसोक्त फिरून तो पुन्हा आपल्या गावी आला आणि त्या श्रेष्ठीकडे जाऊन म्हणाला, " अहो शेटजी, मी ठेव ठेवलेला माझा तराजू परत द्या. "

" तुझा तराजू आता शिल्लक नाही. तो उंदरांनी खाऊन टाकला. " श्रेष्ठी म्हणाला.

जीर्णधन म्हणाला, " तो उंदरांनी खाल्ला असला तर तुमचा काय दोष ? हा जगाचा संसार असाच आहे. येथे कायम असे काहीच नसते ! असो. मी आता नदीवर स्नानासाठी जाणार आहे. तरी तुझा धनदेव नावाचा हा मुलगा माझ्याबरोबर स्नानाचे साहित्य घेऊन पाठव ना ! "

आपल्या सामानाच्या चोरीच्या शंकेने तो आपल्या मुलाला म्हणाला, " बाळा, हा तुझा काका तुला स्नानासाठी नेत आहे. तू स्नानासाठी तांब्या वगैरे सामान घेऊन याच्याबरोबर जा. "

म्हटलेच आहे की, काही तरी कार्य साधायचे असल्याशिवाय किंवा लोभ असल्याशिवाय केवळ भक्तीपोटी कोणताही माणूस कोणाचे प्रिय करीत नाही. ज्यावेळी कारण नसताना खूप आदर दाखविला जातो तेव्हा त्याबाबत शंका घ्यावी. शेवटी तेच सुखाचे ठरते.

तो वाण्याचा मुलगा स्नानाची भांडी घेऊन आनंदाने पाहुण्याबरोबर जाऊ लागला. नदीवर पोहचल्यावर जीर्णधनाने स्नान केले आणि त्या मुलाला डोंगराच्या गुहेत ठेवले. त्या गुहेच्या दारावर मोठा दगड बसविला आणि तो घरी तावडतोब परत आला.

श्रेष्ठीने त्याला विचारले, " अहो पाहुणे, तुमच्याबरोबर नदीकडे माझा मुलगा गेला होता. तो कोठे आहे ? "

" नदीकिनाऱ्यावर एका ससाण्याने त्याला पळवून नेले ! "

" अरे खोटारड्या, ससाणा कधी मुलाला पळवून नेऊ शकेल काय ? माझा मुलगा परत दे ! नाहीतर राजदरबारात जाऊन सांगीन."

" अहो सत्यवादी, जर ससाणा मुलाला नेऊ शकणार नाही तर उंदीरही लोखंडाचा तराजू खाऊ शकणार नाही. तुला मुलगा हवा असेल तर माझा तराजू परत दे." जीर्णधन म्हणाला.

याप्रमाणे वाद करीत ते दोघेही राजदरबारात गेले. तेथे श्रेष्ठी ओरडून म्हणाला, " अहो, काय हे अब्रह्मण्यं ! या चोराने माझा मुलगा पळवला. "

तेव्हा धर्माधिकारी म्हणाले, " अरे, या शेटजीचा मुलगा त्यांना परत दे ! "

" मी काय करू ? माझ्यासमोर नदीकिनाऱ्यावरून ससाण्याने मुलाला पळविले. "

" तू खरे बोलत नाहीस ! ससाणा मुलाला कसा पळवून नेऊ शकेल ?" ते धर्माधिकारी म्हणाले.

" मी काय सांगतो ते तर ऐका, " तो म्हणाला. " जर हजार शेर वजनाचा लोखंडाचा तराजू उंदीर खाऊन टाकतात तर ससाणा मुलाला पळवून नेईल यांत काय संशय ? "

ते धर्माधिकारी म्हणाले, " हे काय आहे ?" तेव्हा त्याने त्या सर्वांना पहिल्यापासून सगळा वृत्तांत सांगितला. तेव्हा ते धर्माधिकारी हसले आणि त्यांनी दोघांनाही समजावून तराजू आणि मुलगा ज्याचा त्याला देववला.

म्हणून मी म्हणालो की– " जेथे उंदीर तराजू खातात तेथे ससाणा मुलाला पळवून नेतो. "

"तेव्हा मूर्खा ! संजीवकाचा आनंद तुला सहन झाला नाही म्हणून तू हे कृत्य केलेस !" म्हटलेच आहे की, बहुधा अकुलीन लोक कुलवंताची निंदा करतात. स्त्रियांच्या प्रियकरांची दुर्दैवी स्त्रिया निंदा करतात. तसेच कंजूष दानशूराची, कुरूप रूपवानाची, भित्री माणसे तेजस्वी माणसांची दुःखी माणसे सुखी लोकांची, आणि मूर्ख मनुष्ये नाना शास्त्र शिकलेल्या पुरुषांची निंदा करीत असतात ! शिवाय मूर्ख पंडितांचा द्वेष करतात; निर्धन श्रीमंतांचा द्वेष करतात, पापी लोक व्रतस्थ लोकांचा आणि कुलटा स्त्रिया कुलवंत स्त्रियांचा द्वेष करतात.

"मूर्खा ! ज्याचे हित करणे आवश्यक होते त्याचेच तू अहित केलेस ! शहाणा शत्रू परवडतो, पण मूर्ख हितचिंतक नको ! वानराने राजाला ठार केले; पण चोराने ब्राह्मणाचे रक्षण केले."

"हे कसे काय बुवा ?" दमनक म्हणाला.

करटक सांगू लागला....

## कथा बाविसावी

# मूर्ख वानर

एका राजाचा एक वानर फार लाडका होता. तो राजाचा अंगसेवक असून त्याला अंतःपुरातही मज्जाव नव्हता. विश्वास असल्यामुळे तो कोठेही हिंडत असे. एकदा राजा झोपला होता. आणि वानर त्याला पंख्याने वारा घालत होता. त्यावेळी राजाच्या छातीवर एक माशी येऊन बसली. पंख्याने ती फटकारली तरी पुनः पुन्हा तेथेच येऊन बसत असे. स्वभावतःच तो

वानर उतावळा असल्यामुळे तो रागावला आणि त्याने एक धारदार तलवार घेतली आणि माशीवर वार केला. माशी उडून गेली. पण तलवारीमुळे एका राजाचे दोन राजे झाले आणि तो राजा मेला ! म्हणून ज्या राजाला दीर्घायुष्य हवे आहे त्याने मूर्ख सेवक ठेवू नयेत.

## कथा तेविसावी

# चोर आणि ब्राह्मण

" आता दुसरी ऐक ! "

" एका नगरात एक महाविद्वान ब्राह्मण राहात होता. पूर्वजन्मीच्या संस्कारामुळे तो चोऱ्या करीत असे. एकदा त्या गावात दुसऱ्या देशांतून चार ब्राह्मण बऱ्याचशा वस्तू विकण्यासाठी आले. त्यांना पाहून हा ब्राह्मण विचार करू लागला, " यांचे धन कोणत्या युक्तीने पळवावे बरे? " असा विचार करून त्याने त्या चार ब्राह्मणांना अनेक शास्त्रांतील ज्ञान सांगितले. आणि गोड गोड बोलून त्यांचा विश्वास मिळविला. आणि तो त्यांची सेवा करू लागला. म्हटलेच आहे की, रांड लाजते, खारट पाणी थंड असते, ढोंगी विवेकी होतो आणि धूर्त माणूस गोड बोलतो !

हा ब्राह्मण त्यांच्या सेवेत असताना त्या चौघांनी आपल्याजवळच्या सर्व वस्तू विकल्या आणि मौल्यवान् रत्ने विकत घेतली. त्याच्यासमोरच त्यांनी ती आपल्या मांडीत ठेवली आणि ते परतायच्या तयारीला लागले. ते आता जाणार हे पाहून त्या धूर्त ब्राह्मणाला मोठी काळजी पडली. तो मोठ्या खेदाने मनात म्हणाला, " अरेरे ! यांचे कांहीच धन माझ्या हाती लागले नाही. आता यांच्याबरोबर जाईन आणि रस्त्यात यांना एखादे विष देऊन मारीन आणि त्यांच्याजवळची सर्व रत्ने घेईन. "

असा विचार करून तो त्यांच्यासमोर करुण आवाजात रडून म्हणाला; "अरे मित्रांनो! तुम्ही मला एकट्याला सोडून जायची तयारी करू लागलात! माझे मन आपल्याबरोबर स्नेहपाशाने बांधले गेले आहे आणि तुमच्या विरहाच्या कल्पनेमुळेच माझे मन व्याकुळ झाले आहे, आणि अधीर झाले आहे. तेव्हा आपण माझ्यावर अनुग्रह करा आणि मला मदतनीस म्हणून तुमच्याबरोबर न्या!"

त्याची ही विनंती ऐकून त्यांचे हृदय करुणेने भरून गेले आणि त्याला बरोबर घेऊन ते आपल्या स्वदेशाकडे निघाले. जाता जाता ते पाचही जण पल्लीपूर गावातून जाऊ लागले. त्यांचा आवाज ऐकून तेथील कावळे सांगू लागले, "अरे भिल्लांनो, धावा, धावा! सव्वा लाखाची आसामी चालली आहे. त्यांना मारून त्यांचे धन घ्या."

कावळ्यांचे ओरडणे ऐकून भिल्ल धावून आले आणि त्यांनी त्या ब्राह्मणांना काठ्यांनी झोडपून काढले. त्यांचे सर्व कपडे काढले. आणि शोध घेतला. पण त्यांना काहीच धन सापडले नाही.

तेव्हा ते भिल्ल म्हणाले, "प्रवाशांनो! पूर्वी कधीच कावळ्यांचे बोलणे खोटे निघाले नाही. तेव्हा तुमच्याजवळ कोठे तरी धन लपविलेले असलेच पाहिजे, ते देऊन टाका! नाही तर तुम्हाला सर्वांना ठार करू, तुमची चामडी सोलू आणि प्रत्येक अवयव तपासून धन घेऊन जाऊ!"

भिल्लांचे हे असे बोलणे ऐकून तो चोर ब्राह्मण मनात विचार करू लागला, "या ब्राह्मणांना मारून त्यांचे शरीर तपासून हे रत्ने नेतील. त्याचप्रमाणे मलाही ठार करतील. मग मी या ब्राह्मणांच्या जवळ धन नाही असे सिद्ध करण्यासाठी मलाच प्रथम मारण्याबाबत भिल्लांना विनंती करतो माझ्या शरीरावर काही नाही असे पाहून या चौघांचे तरी प्राण वाचतील. म्हटलेच आहे की, "अरे बाळा, तू मृत्यूला कां भितोस? भीतीमुळे मृत्यू आपली सुटका करीत नाही! आज नाही तर शंभर वर्षांनी प्राण्याला मृत्यू निश्चित येणारच! पण गाईकरिता व ब्राह्मणांसाठी जो प्राण देतो तो सूर्यमंडळ भेदून जातो आणि परमगती मिळवतो."

मग निश्चय करून तो म्हणाला, "अरे भिल्लांनो! असे असेल तर मला आधी मारून तपास घ्या." त्याप्रमाणे भिल्लांनी त्याला मारले आणि त्यांच्या अंगावर द्रव्य नाही असे पाहून त्या चार ब्राह्मणांना सोडून दिले.

म्हणून मी म्हणालो की, "शहाणा शत्रू परवडला पण मूर्ख मित्र नको!"

असे ते बोलत असताना संजीवक आणि पिंगलक यांचे अगदी थोडा वेळ युद्ध झाले आणि पिंगलकाच्या तीक्ष्ण नखांच्या प्रहारामुळ संजीवक प्राण जाऊन पृथ्वीतलावर पडला.

त्याचे प्राण गेलेले पाहून त्याचे गुण आठवन पिंगलकाचे हृदय भरून आले. आणि तो म्हणाला, "अरेरे! मी पाप्याने संजीवकाला मारून अयोग्य गोष्ट केली. विश्वासघाताहून जास्त भयंकर असे दुसरे पाप नाही. म्हणतातच, की मित्रद्रोही, कृतघ्न आणि विश्वासघातकी लोक सूर्यचंद्र असेपर्यंत नरकात पडतात. देशाची भूमी गेली, किंवा हुशार सेवकाचा नाश झाला म्हणजे राजाचा नाश झाल्याप्रमाणेच आहे. तरीही या दोघांना समान समजणे योग्य नव्हे. कारण भूमी परत मिळवणे सोपे आहे, पण सेवक मात्र परत मिळणार नाही. मी त्याची दरबारात नेहमी स्तुती करीत असतो. आता त्यांच्या पुढे काय सांगू ? म्हटलेच आहे की, सभेत ज्याला पूर्वी गुणवान म्हटले त्याचे दोष बोलून दाखवू नयेत. नाहीतर प्रतिज्ञाभंगाचा दोष लागतो."

याप्रमाणे अनेक रीतीने तो शोक करीत असता दमनक तेथे आला आणि आनंदाने म्हणाला, "देव! बंड करणाऱ्या या गवतखाऊला मारल्यानंतर तू इतका व्याकुळ होऊन शोक करीत आहेस हे योग्य आहे काय ? राजांना हे शोभत नाही! म्हणतातच की पिता, भाऊ, मुलगा, पत्नी अथवा मित्र यापैकी कोणीही आपले प्राण घेऊ पाहतो तेव्हा त्याला मारण्यात पाप नसते. शिवाय दयाळू राजा, वाटेल ते खाणारा ब्राह्मण, निर्लज्ज स्त्री, दुष्टबुद्धीचा सेवक, प्रतिकूल दूत, चुका करणारा अधिकारी आणि काय करतो हे न समजणारा सेवक या सर्वांचा त्याग करणे योग्य असते.

तसेच ही राजनीती वेश्येप्रमाणे अनेक रूपे धारण करणारी असते. ती कधी खरे बोलेल, तर कधी खोटे ! कधी गोड बोलेल, तर कधी कठोर ! कधी हिंस्र असेल तर कधी दयाळू ! ती कधी कृपण असेल, तर कधी खूप द्रव्य खर्च करणारी असेल ! आणखी महान् असूनही मनुष्य शांत व त्रास न देणारा असेल तर लोक त्याची पूजा करीत नाहीत ! लोक नागाची पूजा करतात, त्याला खाणाऱ्या गरुडाची पूजा करीत नाहीत."

अशा प्रकारे दमनकाने पिंगलकाचे सांत्वन केले आणि त्यानेही संजीवकाबद्दलचा शोक सोडून दिला आणि दमनकाला मंत्रीपद देऊन तो राज्य करू लागला.

विष्णुशर्म्याने रचलेल्या पंचतंत्रातील मित्रभेद नावाचे पहिले तंत्र येथे समाप्त झाले.

□ □ □

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ...१०९८
विषय.. किशोर ५९५
BVBK-0401098

तंत्र दुसरे

# मित्र प्राप्ती